

॥ श्रीनाथ प्रसन्न ॥

# मागोवा

हालसिद्धनाथ-भक्त-परायण ब्रह्मीभूत दादांचे म्हणजे माझ्या आजोबांचे हे चरित्र आज भक्तजनांच्या हाती देताना अत्यानंद होत आहे.

काही काही गोष्टी अशा असतात की, त्या इतक्या सहजगत्या आणि आपोआप घडून जातात आणि त्या घडल्यावर त्यांचेकडे आपण जेव्हा मागे वळून पाहू लागतो किंवा त्याचा ' मागोवा ' घेतो, त्यावेळी ह्या गोष्टी इतक्या व्यवस्थित व उत्तम रितीने कशा घडल्या याचा आपल्यालाच अचंबा वाटतो. आणि मग लक्षात येते की या घटनांच्या मागे काहीतरी परमेश्वरी सूत्र असले पाहिजे. ती. कै. दादांच्या चरित्राचे लिखाण हे त्यांचे ढळढळीत आणि निःसंदिग्ध उदाहरणच आहे.

ती. कै. दादांचे हालसिद्धनाथांच्या साक्षात्काराने भरलेले चरित्र भक्तजनांच्या हाती द्यावे आणि त्यायोगे भक्तिमार्ग वाढवावा ही सुप्त इच्छा माझ्या वडिलांच्या ( श्री. शिपूरकर मामा ) मनात अनेक दिवस होती. ती. कै. दादांची जन्म शताब्दी जसजशी जवळ येत चालली तसतशी ही इच्छा त्यांच्या ठोड्डन उत्कटतेने प्रकट होऊ लागली, पण हे जमावे कसे ! तसे पाहिले तर माझ्या वडिलांना लिखाणाचा वा साहित्याचा यापूर्वी काही एक अनुभव नव्हता पण—

प्रा. म. अ. कुलकर्णी आपल्या कामाच्या व्यापातून चार दिवस सवड काढून आले काय, अन् माझ्या वडिलांनी त्याना अन्तःस्फूर्तीने दररोज पाच सहा तास बसून कै. ती. दादांचे चरित्राचे कथन केले काय, आणि ते त्यांनी त्या बरहुकूम लिहून घेऊन त्याची यथायोग्य मांडणी केली काय, अन त्यातून ह्या स्वयंभू चरित्राने आकार घेतला काय ! साऱ्याच गोष्टी आश्चर्यकारक घडल्या. ज्याप्रमाणे ' श्रीगुरु चरित्र ' पुढे शंभर दीडशे वर्षांनी सिद्धमुनींच्या साक्षात्काराने नामधारकानी गंगाधर तनयांच्या कडून लिहून घेतले, त्याचप्रमाणे ' रेवण सिद्धांचे ' नाम अखंडपणे, ज्याच्या वैखरीने आमरण धारण केले होते त्या ती. कै. दादांचे चरित्र माझ्या वडिलांच्या हातून हालसिद्धनाथानी लिहून घेतले असे म्हटले तरी अतिशयोक्ति होणार नाही. कारण माझे वडील ज्या अन्तःस्फूर्तीने प्रा. म. अ. कुलकर्णी यांना सांगत होते ते पाहिल्यावर जणू काय ती. कै. दादांच्या जीवनाचा चलत्-चित्रपट त्यांच्या अन्तः चक्षूपुढून सरकत असावा आणि त्यांच्या अंतःकरणातील अनंत त्यांच्या बुद्धीला अभिप्राय सुचवित असावा असे वाटत होते.

विशेषतः महाराष्ट्रात नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाच्या छायेखालीच वारकरी, दत्त, महानुभाव, आनंद, समर्थ इत्यादि संप्रदाय वाढले व विस्तार पावले. धर्मजागृती होऊन परंपरागत संस्कृतीचा विकास झाला.

## श्री रेवणनाथांचा अवतार

नवनाथ भक्तिसार ग्रंथामध्ये चौतीस, पस्तीस व छत्तीस या अध्यायांमध्ये श्री रेवणनाथांच्या अवतार कार्याची हकिगत आली आहे.

रेवा नदीच्या काठी अयोनी संभव असा हा नाथ बालक रूपाने अवतीर्ण झाला. सहनसारुक या शेतकऱ्यास हे बालक सापडले व त्याने या मुलाचे संगोपन केले. त्याला सारी कृषिकर्मे शिकविली.

एका चांदण्या रात्री दत्त महाराजांचा या मुलावर अनुग्रह झाला व त्यांनी त्यास एक सिद्धी दिली. या सिद्धीच्या सहाय्याने अन्नछत्र उघडून गोरगरिबांना ते मदत करू लागले. मच्छिंद्रनाथाचे आगमन झाले असता त्यांनी या मुलाचा चमत्कार पाहिला व हा नाथसंप्रदायातीलच एक श्रेष्ठ अवतार आहे हे ओळखले व दत्त महाराजांचेकडून या मुलावर पूर्ण कृपा करविली.

श्री दत्तमहाराजांनी रेवणनाथावर पूर्ण कृपा करून त्यास गिरनार पर्वतावर नेले. तेथे रसायनविद्या, कविता, छंद, वेदपाठ, ज्योतिष, व्याकरण, धनुर्विद्या, अस्त्रविद्या, वज्रविद्या, संजीवनी, वासवशक्ति आदींचे सामर्थ्य प्राप्त करून दिले.

## सरस्वती ब्राह्मणाच्या मुलांचा पुनर्जन्म

माणदेशात विटे या गावी सरस्वती ब्राह्मण या नावाचा एक गृहस्थ आपल्या जाह्नवी नावाच्या स्त्रीसह संसार करीत होता. या दोघांना सहा अपत्ये झाली. परंतु त्यापैकी प्रत्येक अपत्य जन्मल्यानंतर अवघ्या चारपाच दिवसातच मरण पावले होते.

या सरस्वती ब्राह्मणाला सातवा पुत्र झाला व तो बारा दिवस जगला. त्यामुळे मोठ्या आनंदाने त्याने या मुलाचे बारसे साजरे केले. त्याच्या भाग्य-वशात रेवणनाथ महाराज संचार करीत त्या भागात आले होते. त्याच दिवशी भिक्षेसाठी ते ब्राह्मणाच्या घरी आले. सरस्वती ब्राह्मणाने रेवणनाथांचा मोठ्या

आदराने सत्कार केला. त्यांना आग्रहाने आपल्या घरी ठेवून घेतले. त्याच रात्री ते मूल अकस्मात मरण पावले. मातापिता शोक करू लागले. तेंव्हा रेवणनाथांनी ते कलेवर तीन दिवस सांभाळून ठेवण्यास सांगितले व आपल्या सामर्थ्यावर यमपुरीस जाऊन मुलाचे प्राण परत आणतो असे आश्वासन दिले. विविध अस्त्रे जपून ब्रह्मा, विष्णु, महेश, शिवगण आदींचा रेवणनाथाने पराभव केला आणि मुलाचे प्राण परत मिळविले. इतकेच नव्हे तर जुन्या सहाही मुलासह ते परत आले.

सारंगी, जोगीन्रा, निजानंद, नयननाथ, यदुनाथ, निरंजन व गहिनी अशा आपल्या सात शिष्याकडून पंथप्रसाराचे व दीनोद्धाराचे कार्य केले. अशा आशयाची माहिती नवनाथ भक्तिसार ग्रंथात सांगितलेली आहे.

* * *

## रेवणनाथ, काडसिद्ध व हालसिद्ध

रेवणनाथ, काडसिद्ध व हालसिद्ध ही तिन्ही नावे एकाच नाथाची आहेत.

रेवणनाथाचे शिष्य मरुळसिद्ध व हालसिद्धाचे शिष्यही मरुळसिद्धच आहेत. जेथे जेथे हालसिद्धाचे व रेवणनाथाचे ( रेवणसिद्धाचे ) स्थान आहे तेथे तेथे मरुळसिद्ध यांचेही शेजारीच स्थान असते.

या संदर्भात महत्त्वाची अशी एक हकिगत प्रसिद्ध आहे.

करवीर प्रांती माई या नावाची एक योगिनी राहात होती. नाथपंथास ती विरोध करी. सव्वा खंडीचे वीष तिने तयार करून ठेवले होते. नाथपंथी सिद्ध या भागात येताच माई त्याची परीक्षा घेई. 'तयार केलेले जहरी वीष प्राशन करावे अथवा नाकात कवड्या घालून दळण कांडण करीत कारागृहात राहावे' अशी तिची अट होती. त्याप्रमाणे असंख्य सिद्धांचा पराभव करून तिने त्या सर्वांस बंदिवासात टाकले होते.

करवीर क्षेत्र हे दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध आहे. रेवणनाथांचे शिष्य मरुळसिद्ध संचार करीत करीत करवीर क्षेत्री आले. ते नाथपंथी दिसताच त्याना पकडून आणून वीष प्राशन करावे अथवा नाकात कवड्या घालून बंदिवासात रहावे असे माईने सांगितले. तेंव्हा मरुळसिद्धाने 'आण ते वीष'

म्हणून आपले भिक्षापात्र पुढे केले. इतक्यात ' ते जालीम वीष आहे प्राशन करू नका ' असे बंदिवासातील सिद्धांनी त्यास सांगितले. हा सल्ला ऐकताच एक क्षणभर मरुळसिद्धांनी आपले तोंड माघारी फिरवले. त्यावेळी त्या माईने नाथांची अवहेलना करणारे उद्गार काढले. ते ऐकताच मरुळसिद्ध प्रक्षुब्ध झाले व ' माई भिक्षा घाल ' अशी मागणी केली. ' लिंगार्पणमस्तु ' असे म्हणत माईने घातलेले वीष, आपल्या गुरूचे स्मरण करून प्राशन करून टाकले. गुरुकृपेने त्या विषाचे अमृतात रूपांतर झाले.

सिद्धयोग्यांचा माईने चालविलेला हा छळ पाहून मरुळसिद्धाना अतिशय राग आला तथापि ' मला गुरूचा आदेश नाही म्हणून माईला भस्म करीत नाही ' असे सांगून मरुळसिद्ध तेथून रेवणसिद्धांचेकडे आले व नाथास सकल वृत्तांत कथन करून तुरुंगात पडलेल्या योगीसिद्धांची मुक्तता करण्याबद्दल प्रार्थना केली.

तेंव्हा रेवणनाथ महाराज आपल्या सर्व शिष्यासह करवीरक्षेत्री येऊन दाखल झाले. हातातील त्रिशूळ संतापाने जमिनीत रोवून ' माई भिक्षा घाल ' अशी त्यांनी आरोळी ठोकली. नाथांचे ते रौद्र स्वरूप पाहाताच माई घाबरून गेली. तोच ' माई भिक्षा घाल ' असे पुन्हा एकवार महाराज गर्जून बोलले. तेंव्हां हातातील ओगराळ्याने माईने तयार केलेले ते सव्वा खंडीचे वीष घातले. ' लिंगार्पणमस्तु ' असे म्हणत महाराजानी ते सर्व वीष प्राशन करून टाकले.

नाथांची परीक्षा घेणाऱ्या माईचा महाराजानी पराभव केला. तिला भस्म करून तिची किन्नरी करून ती वाजवीत बसले. यावरूनच श्री रेवणनाथास माईगे काडिद्दा- म्हणून काडसिद्ध असे लोक म्हणू लागले.

आपली परीक्षा या योगिनीकरवी प्रत्यक्ष पार्वतीनेच पाहिली हे महाराजांनी अंतरज्ञानाने ओळखले. अंगाचा दाह शांत करण्यासाठी त्यांनी पार्वतीचाच धावा केला. त्याबरोबर पार्वती भाकेस धावून आली. तीच भागूबाई होय. रेवणनाथाच्या स्थानाजवळच भागूबाईचेही स्थान आढळून येते.

रेवणनाथांना गायीचे दूध अतिशय प्रिय आहे. कानडीत हाल म्हणजे दूध. दुग्ध प्राशनाने जे प्रसन्न झाले ते हालसिद्ध. म्हणून हालसिद्ध या नावाने विशेषतः कर्नाटकात रेवणनाथ महाराज ओळखले जातात. रेवणनाथांनी आपले

बरेचसे कार्य कर्नाटक भागातच केले आहे. हिंदू, जैन, लिंगायत, मुसलमान असे सर्व थरातील व जातीतील हजारो भक्त अद्यापि करवीर व कर्नाटक भागात आढळतात.

*　　*　　*

### घोसरवाड येथे आगमन

श्री हालसिद्धनाथांची म्हणून पुढील मुख्य स्थाने सुप्रसिद्ध आहेत. १) ऐरणी ( मोंगलाई ) २) कंकणवाडी ( रायबाग महाल ) ३) नणदी ( चिकोडी तालुका ) ४) घोसरवाड ( शिरोळ तालुका ) ५) कारिकोळ ऊर्फ सिद्धापूर हट्टी ( तिकोटे तालुका ) ६) अप्पाची वाडी ( चिकोडी तालुका ).

घोसरवाड व अप्पाचीवाडी ही दोन्ही ठिकाणे हालसिद्धनाथांच्या आगमनाने, वास्तव्याने व साक्षात्काराने गेली दोन अडीचशे वर्षे प्रसिद्ध आहेत.

श्री हालसिद्धनाथांचा अवतार प्रत्यक्ष इ. स. १६८२ ते १७७६ असा झाला असावा. १७७६ मध्ये ते घोसरवाड येथे प्रकट झाले.[१]

घोसरवाड येथे शिंदे देसाई इनामदार यांचे घराणे आहे. मूळ संस्थापकापासून पाचव्या पिढीतील भिकाजीराव देसाई यांची पत्नी सावित्रीबाई होत. सावित्रीबाई या महान पतिव्रता होत्या. त्यांच्या भक्तीला प्रसन्न होऊन श्रीहालसिद्धनाथ घोसरवाड येथे प्रकट झाले.

दूधगंगा नदीच्या काठी घोसरवाड या गावी शिंदे देसाई-इनामदार यांच्या मालकीचे मोठे कुरण आहे. या कुरणात गुरे चारण्यासाठी गावातील मुले जात असत. तेथे महाराज प्रथम प्रगट झाले. मुलांना आपल्याकडे बोलावून त्यांच्या इच्छेप्रमाणे आपल्या झोळीमधून खाऊ काढून ते मुलांना देत असत. मुलेही या नादाने पहाटे लवकर उठून कुरणात गुरे घेऊन जात असत. हळूहळू ही बातमी गावांत सर्वत्र पसरली. सावित्रीबाईना ही बातमी कळताच त्यांनी स्वतः जाऊन महाराजास आपल्या वाड्यात बोलावून आणले. वाड्यात

---

१ इ. स. १७७६ च्या सुमारास सावित्रीबाई घोसरवाड येथे हयात होत्या. मूळ वंशावळी पाहून हा आधार घेतला आहे.

सदरेजवळ एक खोली आहे तेथे त्यांची राहाण्याची व्यवस्था केली. सावित्रीबाई या सती अनुसयेप्रमाणे थोर साध्वी होत्या. त्यांचे कुलदैवत शंभू होते. त्याची त्या एकनिष्ठेने पूजाअर्चा, भक्ति करीत असत. मात्र त्यांना संततीचा अभाव होता.

नेहमीप्रमाणे शंभूची एकाग्र मनाने पूजा करीत असता त्यांना वाटले की 'आपल्याला एक मुलगा असता तर फार चांगले झाले असते.' ही इच्छा व्यक्त होताच एक गोंडस असे मूल त्यांच्याकडे धावत, रांगत आले. मातृभावनेने उचंबळून येऊन सावित्रीबाईनी त्या बालकास हृदयी धरले आणि काय आश्चर्य ! सावित्रीबाईना पान्हा फुटला व त्यांनी त्या बालकास स्तनपान करविले.

अशा तऱ्हेने रेवणनाथ महाराजांच्या सामर्थ्याची व चमत्काराची पूर्ण ओळख सावित्रीबाईना पटली. बालक रूपाने नाथमहाराज सावित्रीबाईचे स्तनपान करीत असत. असा काही दिवस कार्यक्रम चालला असता. भिकाजीराव देसाई यांचेकडील काही लोकांच्या मनात किल्मीष आले. व त्यांनी 'हा कोणी बंगाली जादूगार असून त्याने आपल्या पत्नीस वशीकरण केले आहे' अशा आशयाचे कुविचार सांगून भिकाजीरावांचा बुद्धिभेद केला. त्यामुळे भिकाजी-रावांच्या मनात पापबुद्धि निर्माण होऊन त्यानी महाराजाना ठार मारण्याचे ठरविले.

एके दिवशी सावित्रीबाई सती अनुसयेप्रमाणे या बालकास स्तनपान करवीत असता त्या खोलीभोवती शिपायांनी गराडा घातला. अशावेळी ते बालक एकदम सर्वांना खोलीबाहेर दिसू लागले. तेव्हा शिपायांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा क्षणार्धात ते बालक वाड्याच्या बुरजावर दिसू लागले. पुढे वाड्याच्या पटांगणात दिसू लागले. तेव्हां सारे शिपायी त्याचेमागे पकड-ण्यासाठी धावू लागले. महाराजांनी आपले खरे रूप प्रगट केले व ते गावा-बाहेर पडले. तेव्हा घोड्यावर स्वार होऊन शिपायांनी पाठलाग सुरू केला.

पाठलाग होत होत महाराज चिकोडी तालुक्यातील आप्पाचीवाडी येथ-पर्यंत धावत आले व तेथील केवड्याच्या बनात ते गुप्त झाले. त्यावेळी पाठलाग करणाऱ्या शिपायापैकी काही जणांचे डोळे गेले. काहीजण लुळेपांगळे झाले तर काहीची घोडी मेली. घोसरवाड येथे भिकाजीरावांचेही डोळे गेले.

या सर्व प्रकारामुळे सावित्रीबाईना अत्यंत दुःख झाले. 'महाराजांचे पुन्हा दर्शन झाल्याखेरीज तोंडात पाणी घेणार नाही.' असा निश्चय करून त्यांनी उपोषणास प्रारंभ केला. भिकाजीरावांनाही आपल्या कृत्याचा पूर्ण पश्चात्ताप झाला. सात दिवस उपोषण झाल्यावर महाराजांनी सावित्रीबाईना दर्शन दिले. मात्र वाड्यात राहावयास न जाता (सध्या जेथे स्थान आहे तेथे) वाड्याशेजारीच निंबाचे एक झाड होते त्याखाली त्यांनी आपला मुक्काम केला. भिकाजीरावानी प्रार्थना करताच त्यास पूर्वीप्रमाणे दृष्टि प्राप्त करून दिली. गाईच्या दुधावर महाराज तेथे राहू लागले. म्हणून हालसिद्ध या नावाने ते घोसरवाड येथे प्रसिद्ध पावले.

सावित्रीबाईचेकडूनच ते गाईचे दूध नियमीतपणे महाराजांचेकडे पाठविले जात असे. एकदा एका हुजऱ्याने त्यात भाताची शिते टाकून महाराजांना ते दूध दिले. महाराजांनी ते दूध ओतून देण्यास सांगितले तेव्हा ती भाताचीं शिते दृष्टीस पडली. अशा परिस्थितीत विविध तऱ्हेने ह्यांचा छळ सुरू झाला. तेव्हां त्रासून जाऊन त्यानी गुप्त होण्याचे ठरविले. जमिनीमध्ये महाराज गुप्त होत असतानाच सावित्रीबाई व भिकाजीराव यांनी नाथास थांबविले व राहण्याची विनंती केली. त्या दोघांचा भक्तिभाव पाहून महाराज त्यांचेवर प्रसन्न झाले व पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला आणि आपल्या काही जटा त्याना प्रसाद म्हणून दिल्या.[१] "तुमच्या घराण्यावर माझी कृपादृष्टि राहील. होणाऱ्या मुलास माझे नाव ठेवा." असे सांगून महाराज गुप्त झाले. महाराजांच्या आशीर्वादाने लवकरच सावित्रीबाईना पुत्र झाला. त्यांनी त्याचे नाव सिद्राम (सिद्धेश्वर) असे ठेवले. सध्या हयात असलेल्या वारसदाराचे नावही सिद्राम हेच असून सध्याची नववी पिढी चालू आहे. सावित्रीबाईची समाधी दूधगंगा नदीच्या काठी असून हालसिद्ध नाथांची पालखी वर्षामधून दोनदा तेथे भेटीसाठी जात असते.

श्री नाथमहाराज वाड्याजवळ जेथे गुप्त झाले तेथे सावित्रीबाईनी देऊळ बांधले. ते ग्रामदैवत म्हणून प्रसिद्ध आहे.


१. या जटा श्री. देसाई यांनी सोन्यात मढवून ठेवल्या होत्या. आजारी माणसा वरून त्या उतरल्या असता रोगी बरा होत असे. लढाईच्या वेळी त्या बरोबर नेल्या असता शत्रु सैन्यास यांचे सैन्य विराट दिसू लागल्याने ते एकदम घाबरून, पळून जात असे. असे सांगतात.

## गोविंदपंत दादांची मूळ परंपरा

बाबुराव खंडो कुलकर्णी हे गोविंदपंत दादांचे पणजोबा होत. ते दत्तभक्त होते. नृसिंहवाडी येथें ते दर पौर्णिमेस दत्तदर्शनासाठी जात असत. त्याना संतति नव्हती. त्यामुळे एकदा नवस म्हणून ते घोसरवाडपासून नृसिंहवाडी-पर्यंत दंडवत घालीत गेले.

त्यावेळी नृसिंहवाडी येथे श्रीनारायणस्वामी होते. त्यांनी दत्तमहाराजां-कडून, घोसरवाडहून दंडवत घालीत येणाऱ्या बाबुरावांचे ओट्यात श्रीफल आशीर्वाद म्हणून दिले. पुढे वर्षभरात बाबुरावांना पुत्ररत्न झाले. त्याचे नाव त्यांनी खंडोपंत असे ठेवले. खंडोपंतांना पुढे तीन मुले झाली. दत्तोपंत, चिमाजीपंत व राघोपंत ही त्यांची नावे. चिमणाजीपंत यांना गोविंदपंत, बाळाजीपंत व श्रीपादपंत अशी तीन मुले व आकूबाई आणि गंगूबाई अशा दोन मुली झाल्या. गोविंदपंतदादांचेपासून श्री हालसिद्धनाथाचा या घराण्यांशी विशेष संबंध आला.

गोविंदपंत दादा यांचा जन्म श्री शके १७७३ मध्ये कार्तिक शु. ११ शुक्रवार उत्तरा भाद्रपद नक्षत्र, प्रथम चरण, मीन रास, दुपारी १२ वाजता असा झाला.




गोविंदपंत दादा यांचा लहानपणापासूनच ईश्वर भक्तिकडे कल होता. १८७५–७६ च्या सुमारास घोसरवाड भागात दुष्काळ पडला होता. त्यामुळे घोसरवाड येथील लट्ठे घराणे, बस्तवडे घराणे, कुंभते घराणे, खोत घराणे येथील काही मंडळी पोट भरण्यासाठी देशांतरास जाण्यास निघाली. जाते वेळी श्री हालसिद्धनाथाच्या देवळात दर्शनासाठी हे लोक गेले. नाथांच्या वियोगाच्या जाणिवेने सर्वजण रडू लागले. तेव्हा नाथानी ह्या सर्वांना सांगितले की, " अरे मी

तुमच्याबरोबर राहीन. तुमचे रक्षण करेन. जेथे मुक्काम करण्याविषयी मी आज्ञा देईन तेथेच तुम्ही राहा. तुमचे कल्याण होईल."

आज्ञेप्रमाणे लोक निघाले व मजल दरमजल करीत कुरुंदवाड स्टेटमधील, तिकोटे तालुक्यातील, कारीच्या झाडाच्या माळावर आले. तेथेच मुक्काम करण्याची नाथांची आज्ञा झाली. आज्ञेप्रमाणे तेथे राहून लोक कालक्रमणा करू लागले.

एके दिवशी रात्री काही चोर येऊन या लोकांचे बैल चोरून नेऊ लागले. तेव्हा "भक्तांनो उठा, चोर आलेत. मी हुसकतो बघा त्यांना" असे सांगून महाराजांनी लोकास जागे केले. लोक उठून पाहातात तो चोर घाबरून पळू लागलेले त्यांच्या दृष्टीस पडले.

एके दिवशी त्या माळावरील घूत ( वारुळ ) उकरून पाहाण्यासंबंधी महाराजांनी लोकांना आज्ञा केली. त्याप्रमाणे वारूळ उकरताच तेथे एक देवाची सुंदर मूर्ती आढळली. त्या ठिकाणी महाराज प्रगट झाले व त्यांनी लिंगाप्पा पुजारी याच्या घराण्यावर कृपा केली. या घराण्याकडे त्या मूर्तीच्या पूजेची व्यवस्था दिली. ती अद्यापि चालू आहे. पुढे कुरुंदवाड सरकारकडून येथील खोत व कमते घराण्यांना इनाम जमिनी मिळाल्या. हे लोक देवाचे मानकरी आहेत. हेच कारिकोळ होय.

* * *

कारिकोळ येथील पालखी दर बारा वर्षांनी घोसरवाड येथे आणण्याची प्रथा होती. त्याप्रमाणे घोसरवाड येथे पूर्वी पालखी आल्यावर धरोघर भंडारा, नैवेद्य आदि होत असे. या पालखीचा साधारणपणे दोन तीन महिने मुक्काम राहात असे.

कारिकोळची ही पालखी एकदा घोसरवाड येथे आली असता अगदि लहान असलेल्या गोविंदपंत दादांना या पालखीचे फारच आकर्षण निर्माण झाले. सकाळ संध्याकाळ पूजाआरतीचे वेळी दादा पालखीजवळच बसून राहात. मुक्काम संपल्यावर पालखी कारिकोळास परत जाणेस निघाली. तेव्हा दादांना अतिशय दुःख झाले व 'देवा तू आता मला कसा भेटणार ?' असे म्हणून

रडू लागले. त्यावेळी त्यांना नाथांनी दृष्टांत देऊन सांगितले की 'मी येथे देवळात आहे. रोज दर्शनासाठी येत जा' त्या वेळेपासून दादा न चुकता वाड्यातील देवळात दर्शनासाठी जाऊ लागले. या कालातच दादांना संचारावस्था सुरू झाली. त्यावेळी त्यांचे वय अदमासे दहाच्या आतच होते.

* * *

घोसरवाड येथे दर रविवारी बाजार भरत असे. दादांचे वडील दादांना खाऊसाठी म्हणून प्रत्येक रविवारी दोन पैसे देत असत. दादा त्यातील एका पैशाचे चिरमुरे व एक पैशाचा कापूर आणून नाथास अर्पण करीत असत. एका रविवारी वडिलांचेकडून दादांना पैसे मिळाले नाहीत. तेव्हा दुकानदाराकडून दादांनी उदारीने चिरमुरे व कापूर आणून आपला नियम पाळला. दुसरे दिवशी वडिलांचेकडून पैसे मिळताच ते देण्याकरिता दादा दुकानदाराकडे गेले. तेव्हा दुकानदार म्हणाला "काल्च तुमच्या मित्राने मला पैसे आणून दिले.' दादांनी आपल्या मित्राकडे चौकशी केली तेव्हा आपल्याला यातील काहीही माहीत नसल्याचे त्याने सांगितले! यावेळेपासून आजतागायत दर रविवारी चिरमुऱ्यांचा प्रसाद वाटण्याची प्रथा दादांचे घराण्यात आहे.

* * *

दिवसेंदिवस दादांचे मनात हालसिद्धनाथांची भक्ति वाढत चालली. त्यांचे विशेष लक्ष नसे. जेवले तर जेवले, नाही तर नाही. झोपले तर तीन तीन दिवस झोपूनच रहात असे होऊ लागले. त्यामुळे घरातील वडील मंडळींना यांचेबद्दल काळजी वाटू लागली.

एकदा 'देवास पाहावयास जाऊ या' असे सांगून आपल्या मित्रमंडळीस घेऊन दादा देवाचे शोधात रानावनातून भटकत होते. याप्रमाणे भटकत असता त्यांना रानात संचार झाला. याचवेळी एका वारुळामध्ये भला मोठा नाग साप प्रवेश करीत होता. संचारावस्थेतच दादा धावत त्या वारुळापाशी गेले व त्या नागास त्यानी ओढून बाहेर काढले. सापाने दादांचे हातास जोर जोराने विळखे घातले. अशावेळी अचानक संचार नाहीसा झाला.

दादा भानावर येऊन पाहातात तो आपल्या हातास नागाने विळखे घातलेले ! दादांनी मनातल्या मनात देवाचा धावा केला. तत्क्षणी नाग वेटोळे काढून निमूटपणे निघून गेला.

अशा एकाहून एक चमत्कृतिपूर्ण हकिगती ऐकून व पाहून आपला मुलगा वेडा पिसा होतो की काय अशी चिंता त्यांच्या वडिलांना वाटू लागली.

इकडे दादांची संचार अवस्था वाढत गेली व पुढे त्याना वाचासिद्धी झाली.

* * *

सावित्रीबाईंच्या सहाव्या पिढीतील परशुरामपंत यांच्या पत्नीचे नाव गंगाबाई असे होते. त्यांना दोन मुली होत्या. थोरल्या मुलीचे नाव चंद्राक्का असे होते. त्यांना नणदी येथील देसाई घराण्यात दिले होते.

चंद्राक्का प्रथम वेळी प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले. त्या मुलाचे नाव बाळासाहेब असे ठेवले होते. बारशानंतर एके दिवशी बाळासाहेब एकाएकी अत्यवस्थ झाले. त्या लहान मुलाने स्तनपान सोडले. ते एकसारखे रडू लागले. त्याची टाळू पडली. वैद्यानेही आशा सोडली. बाळासाहेब यांच्या मातोश्री व आजी चिंताक्रांत झाल्या. त्यावेळी गंगाबाईना एकदम आठवले की गोविंदपंतदादावर श्रीहालसिद्धनाथांची कृपा असून त्याला वाचासिद्धी आहे. म्हणून आपले वाड्यातील कारभारी चिमणाजीपंत (दादांचे वडील) यांना गोविंदपंतास बोलावून आणा असे सांगितले.

हे दादांना कळताच आपल्यावर व पर्यायाने देवावरही काही तरी बोल येईल या भीतीने ते घरी लपून बसले. त्याच रात्री दादांना दृष्टांत देऊन नाथांनी सांगितले की 'अरे मी कैलासास जाऊन बाळासाहेबांचे आयुष्य वाढवून आणले आहे. त्याना जाऊन भंडारा देऊन येजा.' एवढी आज्ञा मिळताच दादा वाड्यात गेले. इकडे वाड्यात गंगाबाई व चंद्राक्का चिंताक्रांत होऊनच बसल्या होत्या. मनापासून त्या देवाचा धावा करीत होत्या. दादांनी त्यांचे हाती भंडाऱ्याची पुडी दिली. तो भंडारा लावताच बाळासाहेबास एकदम उतार पडला व काही वेळातच ते पूर्वीप्रमाणे खेळू लागले. या घटनेने गंगाबाई व चंद्राक्का यांची देवावर अढळ श्रद्धा बसली.

पुढे बाळासाहेबही या देवाचे भक्त बनले. नणदी येथेही हालसिद्धनाथाचेच एक जुने स्थान असून तेथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात यात्रा भरत असते.

* * *

दादांचे शिक्षणाकडे लक्ष नसल्याने आपला मुलगा अडाणीच राहातो की काय अशी चिंता त्यांच्या वडिलांना वाटणे स्वाभाविकच होते. तरी आपल्या मनातील चिंता त्यांनी गंगाबाईजवळ अनेक वेळा व्यक्त केली.

तेव्हा गंगाबाई या लहान मुलांस वारंवार आपल्याकडे बोलावून घेत. गोड शब्दांनी त्याला शिकण्यासंबंधी सांगत. तसेच आपलेपणाने त्याचेकडून काही कामेही करून घेत. दादा त्यांनी सांगितलेली कामे नीटनेटकेपणाने व उत्तम तऱ्हेने करीत असत. गंगाबाईचा त्यांनी पुढे एवढा विश्वास संपादन केला की आपल्या तिजोरीच्या किल्ल्याच त्या दादांचेकडे देत असत.

गंगाबाईच्या आग्रहाच्या सांगण्यामुळे दादा अभ्यासाकडे लक्ष देऊ लागले. त्यावेळी मुलकी ( मराठी सातवी ) परीक्षेच्या अभ्यासासाठी इंचलकरंजी येथे या मार्गातील विद्यार्थ्यांना जावे लागत असे. त्याप्रमाणे दादानाही इचलकरंजीस जाणे भाग पडले.

-या काळात दादा दररोज न चुकता वाड्याजवळील देवळात हालसिद्धनाथाचे दर्शनास जात असत. शिक्षणासाठी आपण इचलकरंजीस गेल्यास आपली व देवाची ताटातूट होणार या कल्पनेने त्यांना गहीवरून आले. मोठ्या कष्टाने त्यांनी घोसरवाड सोडले. ते लाटेच्या माळापर्यंत चालत आले तरी डोकीत तोच विचार थैमान घालीत होता. मन शोकाकूल होऊन त्याना एकदम रडू कोसळले. त्यांचा पायच पुढे पडेना. “ देवा, तुला सोडून मी कसा जाऊ ! ” असे म्हणून ते ओक्साबोक्सी रडू लागले.

अशा वेळी तेथे एकाएकी घोसरवाड येथील हालाप्पा पुजारी भंडाऱ्याची पिशवी व हातात वेताची काठी घेऊन तेथे आला व त्याने दादांना भंडारा देऊन “ हा भंडारा जपून तुझ्या जवळ ठेव ” असे सांगितले. दादांनी तो भंडारा घेऊन आपल्या रुमालाच्या शेवटात घट्ट बांधला आणि इकडे तिकडे पहातात तो त्या माळावर हालाप्पा पुजारीच नव्हे तर कोणीही

मनुष्य दिसेना. हालाप्पा पुजाऱ्याच्या रूपाने देवानेच येऊन आपल्याला भंडारा दिला अशी दादांच्या मनाची खात्री झाली.

इचलकरंजी येथे अभ्यासासाठी व राहणेसाठी दादांनी एक स्वतंत्र खोली घेतली होती. तेथेच शेजारी एका ब्राह्मण बाईचे घरी जेवावयास ते जात असत. ही ब्राह्मणबाई अत्यंत गरीब होती. अशा दोनचार विद्यार्थ्यांना जेऊ घालून ती आपला चरितार्थ कसातरी चालवीत असे.

हालाप्पा पुजाऱ्याच्या रूपाने देवाने दिलेला भंडारा दादांनी आपल्या रुमालाच्या शेवटातच बांधून ठेवला होता. नेहमीप्रमाणे त्या बाईच्या घरी दादा जेवावयास गेले. स्वयंपाकास थोडा अवकाश होता. तोवर खुंटीस रुमाल काढून ठेवून दादा मित्रांचेबरोबर गप्पा मारण्यात रंगले. इकडे त्या बाईने स्वयंपाक तयार केला परंतु वरणात घालणेस तिच्याकडे हळद नव्हती. दादांच्या रुमालाच्या टोकास बांधलेला भंडारा तिने पाहिला व उठून सावकाश रितीने ती पुडी काढून घेतली आणि तिने तो भंडारा वरणात घालून टाकला.

दादा खोलीवर जाऊन पाहातात तो भंडाऱ्याची पुडी रुमालाचे शेवटात नाही ! देवाने दिलेला आपला भंडारा हरवला याबद्दल त्यांना अतोनात दुःख झाले. तेव्हा कडुनिंबाच्या पाल्याचा रस घेऊन त्यावर त्यांनी उपोषणास आरंभ केला. महाराजांचे दर्शन झाल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचे नाही असा निश्चय केला. याप्रमाणे सात दिवस निघून गेले.

त्यावेळी पंचगंगेस पूर आला होता. सातवे दिवशी दादांना स्वप्न पडले. स्वप्नात महाराजानी त्यास आपल्याबरोबर बोलावून घेतले व पुराचे पाण्यात गळ्याइतके पाणी येई तो नेवून उभे केले. आणि ‘ आता जेवणार आहेस की पाण्यात बुडवू ? ’ असा प्रश्न केला. त्यावर ‘ जेवतो ’ असे आश्वासन दिल्यावर स्वारी गुप्त झाली. दादा जागे झाले. पाहातात तो अंगावरील धोतर भिजून गेलेले होते.

* * *

देवासमोर अथवा पालखीसमोर दादा विशिष्ट प्रसंगी गुंडाचे व हत्याराचा खेळ खेळत असत. या खेळाचे व एकंदर वर्तनाचे स्वरूप पाहून दादाचे

वडिलांचे मन वारंवार सशंक होई. त्याना वाटे हा काय प्रकार आहे? संचार म्हणून हा नाचतो काय? गुंडाने खेळतो काय?

त्याने असे खेळावयास जाऊ नये म्हणून दादांना त्यांचे वडिलांनी एका खोलीत कोंडून बाहेरून कडी घातली. त्यावेळी आत खोलीत जोराचा संचार झाला व दादा दाराला टक्कर देऊ लागले. आपोआप कडी निघून दार उघडले गेले व धावत जाऊन दादा नेहमीप्रमाणे देवासमोर गुंड खेळले.

* * *

एकदा दादांचे वडील पोथी वाचीत बसले असता एकाएकी त्यांच्या पायात कळ घातली. ती कळ काही केल्या थांबेना.

तेव्हा दादांना संचार होऊन 'अरे ही कळ माझी (देवाची) आहे. आत्ताच्या आत्ता बरी करू का बोल?' असे वडिलांना विचारले.

दादांचे वडील घाबरले. त्यांना काय उत्तर द्यावे हे क्षणभर सुचेना. स्वयंपाक घरात चूल पेटलेली होती. संचारावस्थेतच दादा घरात गेले व त्यांनी ओंजळ भरून निखारे आणले. आणि ते वडिलांच्या पायावरून उतरून टाकून दिले. चमत्कार असा कळ ताबडतोब थांबली!

संचारावस्थेतच त्यानी पुन्हा 'तुझ्या मुलाच्या हाताला फोडनीड उठलेत का बघ' असें सांगितले. सर्वांनी दादांचे हात पाहिले पण त्यांना काहीही झाले नव्हते.

या प्रकारानंतर दादांच्या संचारावस्थेबद्दल त्यांच्या वडिलांचे मनात कधीही शंका निर्माण झाली नाही.

* * *

चिमणाजीपंतांचे शेतात एके रात्री चोर शिरले व ते उत्तम आलेला जोंधळा कापून नेऊ लागले.

दादा आपल्या वडिलांचे जवळ झोपले होते. त्यावेळीच दादांना एकदम संचार झाला व त्यांनी चिमणाजीपंतास जागे करून 'अरे तुझ्या शेतात चोर येऊन पीक तोडीत आहेत बघ. ऊठ.' असे सांगितले. तेव्हा चिमणाजीपंत जागे झाले व देवास म्हणाले, 'महाराज, एवढ्या रात्री मी आता शेतात क्या

जाऊ ? मी जाईतोपर्यंत चोर तेथे राहातील काय ? आपणच आपल्या सामर्थ्याने त्यांना हुसकून लावण्याची कृपा करा. '

त्यावर सुमारे पाचदहा मिनिटे दादांचा संचार थोडा सौम्य झाला व पुन्हा पूर्ववत् जोराने सुरु झाला. ' अरे, चोरांना बुजवून आलो बघ. खळ्याएवढे तोडले असून टाकून पळालेत बघ. ' असे त्यांनी सांगितले.

दुसरे दिवशी दादांचे वडील शेतात जाऊन पाहातात तो खरेच पीक खळ्याएवढे तोडलेले होते व जागच्या जागी टाकून पळून गेल्याचे आढळले.

या घटनेने चिमणाजीपंताच्या मनाची खात्री झाली व त्यांचा या देवावरील विश्वास दृढतर झाला.

* * *

दादांना कित्येकदा बसल्या जागीच डुल्की लागत असे. अशा वेळी कित्येकदा त्यांच्या तोंडून पुढे घडणाऱ्या घटनांबद्दलचे सूचक उद्गार निघत असत.

एके दिवशी संध्याकाळी अशी किंचितशी गुंगी त्यांना लागली असता झोपेतच ( संचारावस्था होऊन ) ' सीताराम पत्तारद घात ऐतो ' ( सीताराम सोनाराचा घात झाला रे ' ) असे म्हणू लागले. शेजारीच वडील होते त्यांनी महाराजास विचारले, ' देवा, सीताराम सोनाराचे काय झाले ? ' त्यावर ' अरे, उद्या सूर्योदयापूर्वी तो मरण पावेल बघ. ' असे सांगितले.

दादांच्या वडिलांनी हे सांगणे खरे की खोटे ठरते हे पाहावयाचे ठरवले. ताबडतोब एक इसम सीताराम सोनाराचे घरी पाठविला. तेव्हा सोनार घरी काम करीत बसलेला त्याने पाहिला. त्याच इसमास चिमणाजीपंतानी रात्री एकदा व पहाटे एकदा सीतारामाची चौकशी करून येण्यास सांगितले.

पहाटे चौकशीकरिता ठेवलेला मनुष्य चिमणाजीपंताकडे आला व त्याने सीताराम सोनार सुखरूप असून तो रात्री ठीक होता व पहाटे उठून गुऱ्हाळावर रसऊस आणण्यास गेला आहे असे सांगितले.

सीताराम सोनार घरी रसऊस घेऊन सूर्योदयापूर्वीच आला आणि त्याला एकाएकी ढाळ वांत्या होऊन दहा मिनिटाचे आत मरण पावला. सांगितल्याप्रमाणे सोनाराच्या मृत्यूची सूचना खरी ठरली.

* * *

घोसरवाड येथे श्रीहालसिद्धनाथाची पालखी प्रत्येक वर्षी दिवाळीस व दसऱ्यास दादांचे घरासमोर येत असे. पालखी येताच दादा देवाची आरती वगैरे करून एक रुपयाची खडिसाखर प्रसाद म्हणून सर्वांना वाटीत असत.

आणलेली सगळी खडीसाखर दादा वाटून टाकतात म्हणून त्यांच्या वडिलांनी एकदा थोडी खडीसाखर काढून घेऊन, मुलांना देण्यासाठी, ती एका भांड्यात घालून आपल्या कपाटात ठेवून दिली. या प्रकारची दादांना काहीही कल्पना नव्हती.

दोनतीन दिवसांनी घरातील दादा सोडून सर्व माणसे आजारी पडली. त्यावेळी चिमणाजीपंतांनी देवाला प्रश्न विचारला की 'घरातील सर्व माणसे आजारी पडली आहेत त्यांना बरे केव्हा वाटेल ?'

त्यावर संचारात उत्तर मिळाले 'अरे कपाटात लपवून ठेवलेली खडिसाखर संपली की आपोआप सर्वांना बरे वाटेल!'

तेव्हा झाल्या घटनेचा चिमणाजीपंताना पश्चात्ताप झाला व त्यांनी पुन्हा एक रुपयाची खडीसाखर आणून वाटताच तात्काळ सर्वांना बरे वाटले.

* * *

दादांच्या आईने श्रीहालसिद्धनाथास सोन्याचा चार आणे भाराचा तुरा वाहीन असे मागून घेतले होते. त्याप्रमाणे स्वतः जवळच्या पैशातून गावच्या सोनारास चार आणे भाराचा तुरा तयार करण्यास सांगून पैसे दिले.

सोनाराने चार आणे भाराचे सोन्याचे पैसे घेतले व तुरा मात्र दोन आणे भाराचा करून देऊन फसवले.

पुढे हा सोनार एकाएकी पाय घसरून पडला व त्याच्या गुडघ्याची वाटी निसटली. अनेक तऱ्हेचे औषधोपचार करून पाय बरा होईना व झालेली जखम भरून येईना.

दादाना एकदा संचार झाला असता तो सोनार आला व त्याने 'माझा पाय केव्हा बरा होईल ?' असे विचारले.

'चार आणे भार सोन्याचे पैसे घेऊन दोन आणे भार सोन्याचा तुरा करून दिलास म्हणून ती जखम आहे. तुरा करून घाल म्हणजे पाय बरा होईल!'

असे संचारात त्याला उत्तर मिळाले. तेव्हा त्या सोनाराने पुन्हा चार आणे भार सोन्याचा तुरा तयार करून वाहाताच त्याच्या पायाची जखम बरी होऊन पाय पूर्वीप्रमाणे झाला.

विशेष म्हणजे, हा तुरा तयार करून वाहिल्याचे दादांची आई व सोनार या दोघांव्यतिरिक्त कोणासही ठाऊक नव्हते. दादांच्या अचूक सांगण्याने सर्वांना आश्चर्य वाटले.

* * *

लग्न करून संसार बंधनात पडावे असे दादांचे मनात नव्हते. देवाची पूजा-अर्चा करीत ईश्वरचिंतनात रममाण व्हावी ही ओढ त्यांना लहानपणापासूनच लागली होती.

सुमारे पंधराव्या वर्षी आईवडिलांच्या आग्रहामुळे त्यांनी लग्नास होकार दिला. घोसरवाड येथेच अनंत भटजी नांवाचे एक सत्शील गृहस्थ होते. त्यांना एक कन्या होती. या मुलीशी दादांचे लग्न ठरले.

लग्नाचे आधले दिवशी दादांना एकाएकी धनुर्वात झाला. ती अवस्था पाहून सर्वजण घाबरून गेले. विशेषतः 'आपल्या एकुलत्या एका मुलीचे भवितव्य काय?' या कल्पनेने मुलीचे वडील तर अतिशय हवालदिल होऊन गेले.

त्या वेळी दादांना एकदम संचार झाला व 'असे भक्ताला संकटातून मुक्त करण्यासाठी आलो रे' असे देवाने सांगितले व अक्षरशः सर्वांगावर बुकया मारून धनुर्वात काढून टाकला. थोड्या वेळातच दादा नेहमीप्रमाणे बोलूचालू लागले. दुसरे दिवशी ठरलेल्या मुहूर्तावर त्यांचे लग्न निर्विघ्नपणे पार पडले.

* * *

दादांचे वडील वृद्ध झाले होते. तोंडातील दात पडलेले असल्याने त्यांना जेवताखातांना फार त्रास होत असे.

एकदा जेवतांना ते सहज म्हणाले, 'आज घरी एखादी दुभती म्हैस असती तर हा त्रास तरी कमी झाला असता. दूध भाकरी कुस्करून खाल्ली असती...

तेवढ्यात दादांना संचार झाला व त्यांनी सांगितले, 'उद्याच्या उद्या तुझ्या दारात म्हैस बांधतो बघ.'

दुसरे दिवशी अशी घटना घडली. दादांच्या वडिलांनीच एक रेडी अर्धेलीने काही वर्षांपूर्वी एका बाईस दिलेली होती. तिची दोन वेते होताच रेडी परत करावयाची असे ठरले होते.

त्या बाईस आठदहा रुपयांची नड होती. त्यामुळे ती बाई आपल्याकडील रेडी घेऊन दादांचे वडिलांकडे आली व ' मी अडचणीत आहे मला दहा रुपये द्या. ' असे म्हणू लागली. त्यावेळी म्हशीची किंमत पन्नास, साठ रुपये असे. दहा रुपये तिला दिले व घरी दुभती म्हैस आली. महाराजांनी सांगितलेले शब्द खरे ठरले.

* * *

दूधगंगा नदीचे काठी दादांच्या मालकीचे एक शेत आहे. दादा त्या शेतात देखरेखीसाठी रोज एक चक्कर टाकून येत.

या रानात घरच्या गाईचा एक चांगला खोंड बांधलेला असे. एकदा त्याला चरण्यासाठी सोडावे या विचाराने दादांनी त्याच्या गळ्यातील दावे सोडले. त्यावेळी तो खोंड अवचितपणे बुजला व त्याने दादांच्याच अंगावर चाल केली. दादांना खाली पाडून त्यांना तो घोळसू लागला. आता या पाड्याच्या तावडीतून आपण काही सुटत नाही या कल्पनेने दादांनी महाराजांचा धावा करण्यास प्रारंभ केला. त्यावेळी ताबडतोब दादांच्या अंगी संचार झाला व दादांनी त्या त्रिथरलेल्या खोंडाच्या नागपुडीत दोन्ही बोटे खुपसून त्याला जोरात ढकलून पाडले. खोंड पुन्हा अंगावर चालून आला. तेव्हा संचारावस्थेतच दादांनी त्याच्याशी टक्कर दिली. एक धोंडा घेऊन त्याच्या डोकीत घातला. तेव्हा तो खोंड घाबरून धावत पळत, घरच्या दावणीत येऊन उभा राहिला.

दादांच्या डोक्यास चांगलाच मार लागून ठिकठिकाणी खरचटले होते व रक्तही आले होते. या प्राणघातक हल्ल्यात केवळ महाराजांच्याच कृपेने दादा वाचले.

* * *

पालखीसमोर अथवा देवासमोर संचारावस्था झाली म्हणजे दादा देवासमोर तल्वारीचा व गुंडाचा खेळ खेळत असत.

तलवारीचे खेळात उत्तम धार असलेले तलवारीचे पाते पोटावर मारुन घेत. धावाबरोबरच पुजारी पोटावर भंडारा फेकतो त्यामुळे हत्यार खेळणाऱ्यास इजा होत नाही.

एका प्रसंगी दादा असाच, स्वतःच्या घरापुढे, हत्याराचा खेळ खेळत असता एका विटाळशी असलेल्या स्त्रीचा स्पर्श चुकून त्यांना झाला. त्याबरोबर ते तलवारीचे लखलखीत पाते खस्सदिशी पोटातच घुसले. आतडी बाहेर पडली. ते भयंकर दृश्य पाहाताच दादांच्या आईने हंबरडाच फोडला.

त्यावर एका हाताने ती आतडी सावरीत दादा ओरडले. 'विटाळशीचा स्पर्श झाला आहे. आधी ताबडतोब डोक्यावरून पाणी ओत.'

तेंव्हा डोक्यावरून दोन घागरी पाणी ओतले. त्यावेळी पूर्वीपेक्षाही जोरात संचार झाला व भंडारा मागून घेऊन ती आतडी आत कोंबून त्यावरून भंडारा फासताच पोट पूर्वीप्रमाणे झाले. मात्र तलवारीच्या वाराचा मोठा वण दादांच्या पोटावर अखेरपर्यंत होता.

हे दृश्य प्रत्यक्ष पाहिलेले लोक अद्यापि हयात आहेत.

* * *

भावी काळात घडणाऱ्या घटनाबद्दल महाराज दादांचेकडून भविष्य वदवून सूचना देत असत.

दादांच्या वडिलांना एकदा संचारावस्थेत 'तीन मुलाच्या बापा इकडे ये' अशी हाक मारली व तुझ्या तीन मुलापैकी 'पहिल्याचा व तिसऱ्याचा वंश वाढेल व मधला लडबडेल' असे सांगितले. त्याप्रमाणे गोविंदपंतदादा व श्रीपादपंत यांचा तेवढा वंश वाढला व बाळाजीपंताचा वंश वाढला नाही.

* * *

श्रीपादरावाचे कुटुंब बाळंत झाले असतां एकदा घरी दादांना संचार झाला व 'अरे पाळण्याची दोरी तुटली रे तुटली' असे त्यांनी सांगितले.

पुढे थोड्या दिवसानंतर श्रीपादरावाचे पहिले कुटुंब आजारी पडून मुलासह मरण पावले.

* * *

दादांचे वडील घोसरवाडकर सरकारांचेकडे काम करीत असत. वयाच्या सुमारे पासष्ट, सहासष्ट वर्षापर्यंत त्यांची प्रकृती उत्तम होती. एकदा ते कचेरीतून काम करून नेहमीप्रमाणे संध्याकाळी घरी परत आले.

त्याचवेळी दादांना अचानक संचार झाला व ते वडिलांच्या गळी पडून रडू लागले.

'अरे तुला बोलावणे आले आहे. आता गेले पाहिजे रे' असे त्यांनी सांगितले. पुढे महिनाभरातच कॉलऱ्याने दादांचे वडील वारले.

मृत्युसमयी चिमणाजीपंतानी आपल्या मुलांना जवळ बोलाविले व दादांना, 'या सर्वांना सांभाळा' असे सांगितले. त्याप्रमाणेच दादांनी अखेरपर्यंत आपल्या भावंडांचा आत्मीयतेने सांभाळ केला.

* * *

घोसरवाडकर घराण्यातील गंगाबाईनी पोटी पुत्र संतान नसल्यामुळे एका मुलास दत्तक घेतले होते. त्यावेळी सर्व इस्टेट कोर्ट ऑफ् वॉर्डसच्या ताब्यात होती व मुंबई हायकोर्टात काम चालले होते. वडिलांचे पश्चात दादा घोसरवाडकरांचेकडे काम करीत होते.

या कामाचे संदर्भात एका अधिकाऱ्याच्या सल्ल्यासाठी दादा कोल्हापुरास आले होते.

कोल्हापुरात त्यावेळी कुंभारस्वामी नावाचे दत्तावतारी संत वास्तव्य करून होते. त्यांच्या दर्शनासाठी दादा गेले असता कुंभारस्वामींनी दादांना अतिशय ममतेने जवळ बोलवून घेतले. प्रसाद देऊन 'ज्या कामासाठी आला आहेस ते काम होईल जा.' असे सांगितले त्याप्रमाणे हे दत्तकप्रकरणाचे काम मुंबई हायकोर्टात गंगाबाईचे प्रमाणे झाले.

* * *

कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या ताब्यात घोसरवाडकरांचेकडील इस्टेट असताना श्री. गोल्विडेकर, दत्तोपंत कुंभोजकर आदि मंडळी व्यवस्थेकरिता नेमलेली होती. त्यामधील दत्तोपंत कुंभोजकर हे चिमड संप्रदायातील नामधारक असून चांगले साधक होते.

दादांना संचारात, 'अरे कुंभोजकरास बरोबर घेऊन चिमडास जा व गुरुपदेश घेऊन ये.' असा आदेश मिळाला.

त्यावेळी चिमड येथे नारायण महाराज यरगट्टीकर हे होते. आपल्या अध्यात्म क्षेत्रातील अधिकाराने अनेक साधक व मुमुक्षूंना ते कैवल्याचा मार्ग दाखवीत होते.

चिमड संप्रदाय हा रेवणनाथ महाराजांचाच संप्रदाय होय. त्यामुळेच दादांना येथील गुरुपदेश घेण्याचा आदेश झाला. त्याप्रमाणे दादा, दादांचे चुलत बंधूंचे चिरंजीव मल्हारपंत हे दत्तोपंत कुंभोजकरांचे बरोबर चिमडास गेले आणि त्यांनी गुरुपदेश घेतला.

मल्हारपंत कुलकर्णी हे सध्या चिमड संप्रदायामधील एक चांगले साधक आहेत.

* * *

गुरुपदेश घेतल्यानंतर दादा मधून मधून चिमडास जाऊन येत असत. त्या वेळी नारायण महाराजास मुलगा नव्हता.

चिमड येथे दादा गेले असता तेथे त्यांना एकदा संचार झाला. त्या वेळी चिमड येथील भक्त मंडळींनी 'नारायण महाराजांना मुलगा नाही. पुढे ही परंपरा कोण चालवणार ?' असा देवास प्रश्न विचारला.

तेव्हा संचारात "महाराजास मुलगा होईल." असे सांगून ओट्यात नारळ घातला. त्याप्रमाणे पुढे वर्षभरातच नारायण महाराजास मुलगा झाला.

* * *

आपल्या वडिलांचे पश्चात दादा घोरवाडकर सरकारांचे वाड्यात कारकून म्हणून काम करीत होते.

दसऱ्याचे वेळी घोरवाड येथे देवाची पालखी प्रथम वाड्यात भागूबाईचे भेटीस येते व नंतर सोने लुटण्यासाठी पुढे जाते.

एका दसऱ्याचे प्रसंगी गोल्विडेकर कारभाऱ्यांनी कारकुनांना सुटी न देता आपआपले काम करावयास लावले. साहजिकच इतरांबरोबर दादांनाही दिवसभर कचेरीत काम करीत बसावे लागले.

इकडे देवळात नाथांची पालखी सोने लुटण्यास जाण्यासाठी तयार होऊन भागूबाईचे भेटीसाठी, ढोल, झांजा यांचा आवाज करीत वाड्यात आली. ढोलांच्या तालासरसी दादांच्या हातातली कागद लेखणी कंप पावू लागली व जोराचा संचार झाला. ढोलांची रिदमी वाढली त्याबरोबर सदरेवरून मधल्या चौकात दादांनी धाडकन् उडी टाकली व तेथे हत्यार आणि गुंड यांचा खेळ जोरात झाला.

गोलिवडेकर कारभारी हा खेळ पाहून थक होऊन गेले. त्यावेळेपासून दसऱ्याचे दिवशी कारकूनांना कचेरीस सुटी मिळू लागली.

* * *

दादांना एकूण सहा आपत्ये झाली. तीन मुले व तीन मुली. १९१४ साली त्यांना एक मुलगा झाला त्यावेळी 'हे तुझे शेवटचे अपत्य आहे. त्याला माझे नांव ठेवा.' असे संचारात सांगितले त्याप्रमाणे मुलाचे नांव अप्पाराव असे ठेवले. नंतर १९१४ सालच्या जुलई महिन्यात दादांच्या पत्नी मरण पावल्या.

तेथून पुढे दादांच्या आयुष्यातील वेगळ्या पर्वास प्रारंभ झाला.

* * *

घोसरवाड येथे एकदा प्लेगाची साथ आली होती. त्याच्या भयंकर जोरामुळे गावातील लोक रानात जाऊन झोपड्या बांधून राहू लागले.

त्याच सुमारास पुढे नवरात्र होते. म्हणून दादांनी देवाला कौल लावून विचारले. 'नवरात्र करून मग रानात राहावयास जाऊ की आधी?' त्यावर नवरात्र करून नंतर राहावयास जावे असा कौल झाला. त्याप्रमाणे दादा आपल्या कुटुंबियासह गावातच राहिले.

पण थोड्याच दिवसात दादांची मुलगी गोदूताई हिला प्लेगाची बाधा झाली. तिचे हातपाय लुळे पडले. ताप उतरेना. नाडीही लागेना इतकी ती अत्यवस्थ झाली. आता थोड्या वेळात ही मुलगी मरणार अशीच सर्वांची कल्पना झाली.

तेवढ्यात शिवाजी पवार नावाचा शेजारी मुलीला पाहाण्यासाठी म्हणून घरी आला. त्याने उंबऱ्यात पाऊल ठेवताच त्याला एकदम संचार झाला व 'माझ्या परवानगीशिवाय कशी मरते मरू दे बघू' असे म्हणून त्याने तिथेच पडलेल्या राखेतील एक चिमूट उचलून मुलीच्या तोंडात घातली. थोड्या वेळात मुलीचे ओठ हलू लागले मग जीभ हलू लागली. तिने डोळे उघडले. व ती पूर्ण शुद्धीवर आली. थोड्या दिवसातच ती या साथीच्या आजारातून बरी झाली.

* * *

एकोणीसशे सोळाच्या सुमारास घोसरवाड तेथे नारूची साथ आली होती. दादांच्या एका पायास दोन तीन ठिकाणी नारू झाला होता. त्यामुळे पाय

सुजून बंद झाला होता. हालचालही करता येत नव्हती. हिंडणे-फिरणे तर वर्जच होते. दादा अंथरुणावर अगदी पडून होते.

त्यावेळची कारिकोळ येथील पालखी गावात आली आणि नेहमीप्रमाणे दादांचे घरासमोर येऊन उभी राहिली. बाहेर ढोलाचे वगैरे आवाज होताच दादांना एकदम जोराचा संचार झाला व दादा अंथरुणातून ताडकन उठले. पालखीसमोर येऊन नेहमीप्रमाणे गुंडाचा व तलवारीचा खेळ खेळले.

त्यावेळी पायातील जखम फुटून त्यातून रक्त, पू, नारू बाहेर पडून पाय आपोआप बरा झाला. दादा नेहमीसारखे हिंडू फिरू लागले.

*　　　*　　　*

घोसरवाड येथे दर रविवारी देवाला नैवेद्यासाठी, देवळातील पुजाऱ्याकडे दूध देऊन येण्याची प्रथा आहे.

दादांची मुलगी गोदूबाई इच्याकडे ही कामगिरी एकदा आली. घरातील दूध घेऊन ती देवळात गेली. त्यावेळी देवळात पुजारी नव्हता म्हणून बाहेरूनच दूधाचा नैवेद्य दाखविल्यासारखे करून गोदूबाई दूध घेऊन घरी परत आली.

त्या दिवशी रात्री दादांचे स्वप्नात देव गेला व त्याने 'अरे आज, तुझ्या लेकीने मला दूध दिले नाही बघ' अशी तक्रार केली.

दुसरे दिवशी सकाळी उठल्याबरोबर दादांनी लेकीला हाक मारून विचारले, 'गोदे काल देवाला दुधाचा नैवेद्य दाखवला नाहीस ?'

त्यावर 'देवळात पुजारी नव्हता. मला देवळातील भांड्यात दूध नेऊन ओतण्याची भीती वाटली म्हणून बाहेरूनच नैवेद्य दाखवून परत आले' असा तिने खुलासा केला.

*　　　*　　　*

घोसरवाडकरांचेकडे नोकरीस असताना वसुलीसाठी दादांना ठिकठिकाणी हिंडावे लागे. त्याप्रमाणे ते एकदा कुंडल, पलूस (सांगली) या भागात काही कुळांचेकडे गेले होते.

त्यावेळी पलूस येथे धोंडिबुवा नावाचे एक अवतारी विदेही अवस्थेला पोहोचलेले साधू होते. अतिशय लहरी, छांदिष्ट व फटकळ म्हणून ते सर्वांना परिचित होते.

त्यांचे दर्शन घ्यावे या हेतूने दादा कुंडल स्टेशनवर उतरले. त्याच वेळी एक फौजदारही तेथे उतरले. त्यांनाही धोंडिबुवांचे दर्शनासाठीच जावयाचे होते. त्यामुळे दोघांनी मिळून टांगा केला व ते दोघे पलूसला जाऊन पोहोचले.

या फौजदारास मूलबाळ नव्हते म्हणून धोंडिबुवांचा आशीर्वाद व प्रसाद घ्यावा या हेतूने ते आले होते. गावात येताच दोघे टांग्यातून उतरले व धोंडिबुवांचा शोध करू लागले.

धोंडिबुवा एका उकीरड्याचे कडेला, डोकीस कानटोपी, अंगात सदरा, लंगोटी लावलेली, हातात भली मोठी काठी व एक लोटके अशा नेहमीच्या अवतारात बसलेले दिसले.

त्यांना पाहाताच फौजदाराने गडबड करून दर्शनासाठी आधी त्यांचे पायावर आपले डोके ठेवले. तेव्हा धोंडिबुवानी आपल्या हातातल्या काठीने एक जोराचा तडाखा त्याच्या पाठीत हाणला व संतापाने म्हणाले, 'चल दूर हो. किती स्त्रियांना फसवलेस, किती पापे आणि भ्रष्टाचार केलास आणि माझ्याजवळ मुलगा मागायला येतोस ?'

हे दृश्य पाहाताच दादा चार पावले दूरच राहिले. तेव्हा धोंडिबुवा त्यांचेकडे पाहून हसत हसत म्हणाले, 'अरे येरे ये. बोसरवाडला रोज तुझी माझी भेट होत असते की नाही ? ये इथे जवळ ये' असे म्हणून त्यांनी लोटक्यातील एक केळ दादांचे हाती प्रसाद म्हणून ठेवले.

'आपणही प्रसाद घ्यावा' म्हणून दादांनी आग्रह करताच धोंडिबुवानी आपण एक केळ घेतले. भाकरीचा एक तुकडा प्रसाद म्हणून दादांचे हाती दिला व 'निर्विघ्नपणे तुझे काम होईल जा' असे सांगितले. दादा पुन्हा एकवार दर्शन घेऊन कामासाठी परत फिरले.

* * *

दत्त संप्रदायातील टेंबेस्वामी यांच्या भेटीची आठवण तर विशेष संस्मरणीय आहे.

दादा टेंबेस्वामींच्या दर्शनासाठी वाडीस गेले असता त्या दोघांची प्रथम दृष्टिभेट झाली आणि दोघांच्याही डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. कितीतरी वेळ दोघे एकमेकाकडे टक लावून पाहात होते.

'आशीर्वाद आहे. आनंद आहे' असे म्हणत टेंबेस्वामींनी दादांना आशीर्वाद व प्रसाद दिला होता.

* * *

घोसरवाडकर इनामदारांच्याकडे काम करीत असता दादांनी सावित्रीबाईनी बांधलेल्या देवळाची दुरुस्ती केली. देवास दागदागीने, पालखी, मोर्चेले, अब्दागिरी इत्यादी गोष्टी केल्या,

* * *

घोसरवाडकर इनामदारांचे वाड्यावर पूर्वी पहारेकरी म्हणून राणोजी नाईक या नावाचे गृहस्थ काम करीत असत. ते सात्त्विक प्रवृत्तीचे व मोठे हालसिद्ध भक्त होते.

रोज पहाटेच्या वेळी हालसिद्धनाथ महाराज घोड्यावरून आलेले व गेलेले त्यास दिसत असे. महाराजांची स्वारी दृष्टीस पडतांच 'महाराज' असे म्हणून ते नमस्कार करीत.

या राणोजींचे आईवडील त्यांच्या लहानपणीच वारले होते. त्यामुळे त्यांचे पालनपोषण त्यांचे चुलतेच करीत होते. राणोजी वीस वर्षांचे होताच त्यांचे लग्न करण्यात आले.

लग्न झालेवर राणोजीस नपुंसकत्त्व असल्याचे कळले. तेव्हा घरच्या सर्वांनी त्याची भयंकर निर्भत्सना आरंभिली. 'असा जन्माला येण्यापेक्षा मेला असतास तर बरे झाले असते' असे सर्वजण बोलू लागले. हे सर्वांचे बोलणे राणोजीस मनस्वी लागले व त्याने आत्महत्त्या करावयाचे ठरविले.

देवडीवर रात्रभर पाहारा केला. नेहमीप्रमाणे पहाटे नाथमहाराज यांचे दर्शन होताच त्यांना ते म्हणाले 'महाराज मला मरायला परवानगी द्या.'

तेव्हा महाराजांनी 'कशासाठी रे ?' असा प्रश्न केला. त्यावर घडलेली सर्व हकिगत त्याने दुःखिकष्टि होऊन सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले, 'चल, देवळात गादीला कौल लाव.' त्या आज्ञेप्रमाणे कौल लावताच तो उजवा मिळाला.

'तीन दिवसांचे आत तुला पुरुषत्त्व येईल जा. मात्र ही हकिगत कोणालाही सांगू नकोस. सांगशील तर डोळेच जातील' असे सांगून महाराज निघून गेले.

पुढे राणोजीस मुलेबाळे झाली. त्याच्या वृद्धापकाळापर्यंत प्रपंचसुख त्याने आनंदाने उपभोगले.

वयाच्या साठ पासष्ठाव्या वर्षापर्यंत त्याने ही हकिकत कोणासही कळू दिली नव्हती.

घोसरवाड व आसपास गोविंदपंतदादांची कीर्ति सर्वत्र पसरली होती. देवाची पूर्ण कृपा असलेले भक्त म्हणून ते सर्वांस प्रियही झाले होते. आपल्या आयुष्यातील ही गुह्य गोष्ट या अधिकारी माणसाजवळ आपण सांगावी असे राणोजीस वाटले व न राहून त्याने हा चमत्कार व दैवी कृपासामर्थ्याची हकिगत दादांना सांगितली. हकिगत सांगून होताक्षणीच राणोजीचे दोन्ही डोळे गेले.

त्या वेळी दादांना एकदम संचार झाला व "अरे हा चमत्कार कोणालाही सांगू नकोस. सांगशील तर डोळे जातील. अशी तुला ताकीद केली होती की नाही ?" असे देवाने विचारले.

त्यावर राणोजी भक्तिकळवळ्याने म्हणाले, ' महाराज, ही माझ्या आयुष्याची कथा तुझ्या आवडत्या व पूर्ण कृपादृष्टी असलेल्या भक्तालाच सांगितली मला राहवले नाही म्हणून बोललो. माझे डोळे गेले तरी चालतील, पण तुझा महिमा सर्वांना कळू दे. "

राणोजीचा भक्तिभाव पाहून संचारात दादांनी त्यांच्या डोळ्यावरून हात फिरवला. तेंव्हा त्यांना पुन्हा दृष्टि प्राप्त झाली.

* * *

घोसरवाडकर इनामदारांचे वाड्यात रामा भिरडे नावाचा एक नोकर बागेवर माळी म्हणून काम करीत होता. तो नेहमी वाड्यात बागेतून फुले आणून देत असे. पहाटे उठून आंघोळ करी. बागेतील फुले तोडी. वाड्यात नेऊन देई व त्यातील काही फुले घेऊन हालसिद्धनाथाचे देवळात जाऊन देवास वाही.

असा बारा वर्षेपर्यंत त्याचा नियम अखंडपणे चालला.

या रामा भिरडेस मूलबाळ झाले नव्हते. एकदा पहाटे फुले वाहातांना मनातल्या मनात देवाला म्हणाला 'बारा वर्षे न चुकता तुला फुले घालतो आहे मला मुलगा दिलास तरच यापुढे तुझी पूजा करीन नाही तर पूजा बंद !'

त्या दिवशी रात्री दादांचे स्वप्नात देव गेला व म्हणाला 'अरे रामा भिरडे मला शिव्या देतोय बघ. त्याला सांग वर्षाच्या आत तुला मुलगा देतो म्हणून.'

त्याप्रमाणे पहाटेस दादा उठले व रामा भिरड्याचे घरी जाऊन त्याला म्हणाले, 'रामा, काल देवाला काय काय शिव्या दिल्यास ?'

तेव्हा भिरड्याने सर्व हकिगत सांगितली. त्यावर दादानीही त्याला देवाचा आशीर्वाद सांगितला.

पुढे वर्षाचे आत रामा भिरडे यास मुलगा झाला. त्याने मुलाचे नाव हालाप्पा असे ठेवले.

* * *

दरवर्षी विशाळीस दादा सर्व धनगर मंडळीस जेवण घालीत असत.

एकदा जेवण तयार करणाऱ्या माणसांनी भाजीत घालण्यासाठी पाटीभर कांदे मागितले.

तेव्हा दादांनी एका गड्यास बोलावून सांगितले, 'अरे कृष्णा, माळ्याकडे जा व पाटीभर कांदे मागून आण. कांदे देईल तर मुलगा होईल' असे सांग.

कृष्णा माळ्याने आनंदाने कांदे पाठवून दिले. वृद्धापकाळी त्याला मुलगा झाला.

* * *

लाट येथे शंकरराव कुलकर्णी नावाचे एक गृहस्थ हालसिद्धाचे भक्त होते. दादा घोसरवाड येथे असतांना ते नियमितपणे देवदर्शनास व भजनास येत असत.

एकदा लाटेला एका इसमाचा खून झाला. या भानगडीत शंकररावावर आरोप ठेवून त्यांना अटक करण्यात आली.

त्यानंतरच्या रविवारी भजन सुरू करताच दादांना संचार झाला व त्यांनी इतर भक्तांना सांगितले 'अरे माझ्या लाटेच्या भक्तावर संकट आले आहे रे. पण लोण्यातून केस अलगद बाजूला काढावा त्याप्रमाणे भक्ताला बाजूला काढतो. सुटका होण्यापूर्वी त्याला दृष्टांत देईन' असा निरोप सांगा.

त्याप्रमाणे शंकरराव कुलकर्णी यास निरोप कळविला. या खटल्यात ते निर्दोषी सुटले. त्याना सुटकेपूर्वी सांगितल्याप्रमाणे दृष्टांतही मिळाला.

* * *

लाट येथे रामा अरगे नांवाचा देवाचा भक्त होता. त्याच्या भावजयीने पोटी पुत्र नसल्याने एक मुलगा दत्तक घेतला व कोर्टातून दत्तकाचे हक्क मिळवले.

रामा अरगेने या दत्तकाविरुद्ध कोर्टात अपील केले व देवाला या कामाविषयी विचारले. तेव्हा 'तुझ्यामनासारखे होईल जा' असे सांगून भंडारा दिला.

पण कोर्टात दत्तक शाबीत होऊन हे काम त्याच्या विरुद्ध झाले.

तेव्हा रामा अरगे देवाकडे आला व त्याने देवाला विचारले 'देवा तू सांगितलेस काम मनासारखे होईल म्हणून पण निकाल तर विरुद्ध लागला.

'अरे वर अपील कर. काम तुझ्या मनासारखेच नक्की होणार.' असे देवाने सांगितले.

त्याप्रमाणे वर अपील करावयाचे आहे असे रामाने आपल्या वकीलास सांगितले. तेव्हा वकिलाने त्याला वेड्यात काढले. 'कामात काही तथ्य नाही. अपील करून काही उपयोग व्हावयाचा नाही. फुकट पैसे खर्च होतील असा सल्लाहि त्यांनी दिला.

रामाने सांगितले, 'माझे पैसे खर्च होऊ देत. वर आपील करा.'

त्याप्रमाणे वरच्या कोर्टात अपील केले पण त्याही कोर्टात निकाल विरुद्ध लागला.

पुन्हा रामा आरगे देवाकडे आला तेव्हा देवाने सांगितले 'अरे वर अपील कर; यश नक्की मिळेल.'

त्या प्रमाणे रामाने हायकोर्टात अपील केले. तारखा पडू लागल्या. रामाने देवाला प्रार्थना केली. 'देवा तुझ्या सांगण्याप्रमाणे अपील केले आता यश मिळालेच पाहिजे.'

'अरे यश मिळेल रे. दुसऱ्या नाही तिसऱ्या तारखेला काम तुझ्या मनाप्रमाणे होईल.' असे सांगून दादांनी त्याला भंडारा दिला.

हा भंडारा घेऊन रामा आरगे हायकोर्टात गेला. जबाबासाठी उभा राहाताच त्याने आधी जवळचा भंडारा कोर्टात सर्वत्र फुंकला. तेव्हा लोक हसू लागले.

अशा दोन तारखा कशातरी चालल्या आणि दत्तक घेतलेला मुलगा अकस्मात मरण पावला व अपेक्षित इस्टेट रामा आरगेस मिळाली. देवाने दिलेला शब्द खरा ठरला.

पुढे रामाने खोताचे घरातील देवास पालखी व गोंडे वगैरे करून वाहिले.

* * *

घोसरवाड येथील भक्त मंडळीपैकी काहीनी पंढरपुरास जाणेचे ठरविले त्या सर्वांचे बरोबर दादांचे बंधू श्रीपतराव व बहीण गंगूबाई यांनीही जायचे ठरविले.

पंढरपुरास जाण्याविषयी सर्वांनी देवाकडे परवानगी मागितली. देवाने परवानगीचा भंडारा दिला व 'अरे मी तुम्हाला वाटेत भेटेन माझी ओळख धराल काय ?' असे विचारले.

'हो ओळख धरू' असे सर्वांनी सांगितले.

त्यावेळी मिरजेपासून बार्शीलाईट रेल्वे सुरू झालेली नव्हती. त्यामुळे आधी पुण्यास जाऊन तेथून पंढरपुरास जावे लागे. त्याप्रमाणे सर्वजण पुण्यापर्यंत आले व एका धर्मशाळेत उतरले.

तेथे एक वाघ्या (मल्हारीचा सेवक) आला व त्याने नानांना (श्रीपतरावांना) सर्व भविष्य सांगितले. विशेषतः गतायुष्य वा घरच्या गोष्टी अगदी तंतोतंत सांगितल्याने नानांना त्या पटल्या. व त्यांनी एक रुपाया काढून त्या वाघ्याला दिला. तेव्हा बरोबरचे सर्वजण नानांना बोलू लागले, 'असे पुणेरी भामटे जमून तुमचे वाटेल ते भविष्य सांगतील ! रुपाया त्याला दिलात ? काय म्हणावे तुमच्या भोळेपणाला ?' असे सर्वजणच म्हणू लागले. लोकांचे हे निंदाव्यंजक बोलणे त्या वाघ्याने ऐकले व 'हा घ्या तुमचा रुपाया' असे म्हणून रुपाया टाकून तो निघून गेला.

ठरल्याप्रमाणे त्या दिवशीच गाडी गाठून सर्वजण पंढरपुरास निघाले. आणि प्रवासात सर्वांना रक्तशौचाची हगवण सुरू झाली. काहीकेल्या थांबेना. औषधोपचारही चालेना. त्यामुळे पंढरपुरास न जाताच सर्वांना परत फिरावे लागले.

घोसरवाडला परत आल्यावर सर्वांनी देवाला विचारले, 'देवा, तुझी परवानगी घेऊनच आम्ही पढरपुरास गेलो आणि प्रवासातच हा त्रास का झाला ! देवदर्शनही न घेताच परत यावे लागले !'

त्या वेळी दादांना संचार झाला व त्यांनी सांगितले, 'अरे वाटेत मी तुम्हाला भेटल्यावर ओळख धरतो म्हणून सर्वांनी सांगितलेत. पण मला पुणेरी भामटा ठरवून मला दिलेला रुपायाही परत घेतलात. खरे की नाही ? म्हणूनच सर्वांना त्रास झाला.'

त्यावर प्रत्येकाने आपल्याकडील एकेक रुपाया घालून देवाला साखर वाटली तेंव्हां सर्वांची प्रकृती पूर्वीप्रमाणे बरी झाली.

*  *  *

दादांचे घरांतील एक म्हैस व एक गाय व्याली होती. प्रथेप्रमाणे या दोन्ही वेतांचे दूध दीपत धरून त्याचे तूप देवाला अर्पण करण्यासाठी घरी साठवून ठेवले होते.

एकदा भक्त-मंडळी घरी जमली असता, दादांना या दीपताच्या तुपाची आठवण झाली व त्यांनी घरी विचारले, 'देवाला ते तूप नेऊन दिले की नाही ?'

त्यावर भक्त-मंडळी दादांना म्हणाली, 'आम्ही सगळे त्या देवाचे भक्तच आहोत ते तूप आम्हाला वाढा.' सर्वांचा हट्ट पाहून जेवतेवेळी ते तूप वाढून टाकले.

'दुसरे दिवशी दोन्ही जनावरांची धार काढून एका मोठ्या गाडग्यात घालून थारोळ्यात [ जमिनीत खड्डा काढून ] तापत ठेवले. ते गाडगे आपो आपच थोडे उचलले गेले व सबंध पालथे झाले. हा चमत्कार भक्तांनी डोळ्यानी पाहिला.

दादा म्हणाले " देवाचे तूप देवालाच द्यायला पाहिजे. त्याचाच हा चमत्कार आहे. " दुसरे दिवशी पुन्हा दीपत धरून त्या दुधाचे तूप देवाला देण्यात आले.

*  *  *

पुढे गोविंदपंतदादांनी मुलांच्या शिक्षणाच्या सोईसाठी सांगलीस राहाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दादांनी सांगली येथे पांजरपोळात नोकरी पत्करली व ते सांगलीस राहावयास इ. स. १९१८ मध्ये आले.

त्यावेळी सांगली येथील प्रसिद्ध सराफ गोपाळराव डकिडवे हे पांजरपोळ या संस्थेचे मॅनेजर म्हणून काम पाहात होते. या गोपाळरावांना माधवराव नावाचा एकुलता एक मुलगा होता.

तो एकदा अकस्मात आजारी पडला. औषधोपचार खूप केले पण त्याचा ताप कमी होईना. डॉक्टरानी आपली असमर्थता कबूल केली तेंव्हा गोपाळराव

अतिशय निराश झाले. त्यावेळी दादांचेकडे येऊन 'मुलाला कधी बरे वाटेल?' असे त्यांनी विचारले.

दादांनी त्यांना संचारात सांगितले 'अरे घोसरवाडच्या देवाचे तीर्थ व अंगारा रोज न चुकता आणून मुलाला घाल म्हणजे मुलगा बरा होईल. कैलासाला जाऊन त्याचे आयुष्य वाढवून आणतो बघ.'

त्याप्रमाणे गोपाळराव डकिडवे यांनी आठ दिवस खास घोडेस्वार घोसरवाडास पाठवून रोज तीर्थ अंगारा आणण्याची व्यवस्था केली. व मुलाला नियमितपणे तीर्थ अंगारा दिला. आठ दिवसांनी मुलगा बरा झाला. गोपाळरावांना अतिशय आनंद झाला. त्यांनी बरेच दिवस देवाला नंदादीप ठेवला होता.

* * *

दाजीसाहेब देशमुख या नावाचे एक गृहस्थ दादांचेकडे नेहमी सांगलीस भजनासाठी येत असत. त्यांनी देवावरून पदे केली आहेत. दाजीसाहेबांचे वैद्य या नावाचे एक मित्र होते. ते गोंदवलेकर महाराजांचे शिष्य होते. सध्या ते माधवनगर येथे राहात आहेत.

दादा सांगलीस असतांना दर गुरुवारी व रविवारी भजन होत असे.

श्री. वैद्य यांना मूलबाळ नव्हते. तेव्हा दाजीसाहेबांनी त्यास सांगितले, 'गोविंदपंतांचेकडे जाऊन यासंबंधी प्रश्न विचारून पाहू या.

तेव्हा श्री. वैद्य म्हणाले, मी गोंदवलेकर महाराजांचा भक्त आहे. गोंदवलेकर महाराजांनी कृपा करावी व मुलगा द्यावा. इतरांना मी कोणालाही प्रश्न विचारणार नाही.'

या संभाषणाचेवेळी श्री. वैद्य यांच्या पत्नी तेथे होत्या. त्या म्हणाल्या. 'प्रश्न विचारण्याचे राहू दे भजनाला तरी जाऊ या.' त्याप्रमाणे दाजीसाहेब देशमुखांचे बरोबर श्री. वैद्य सहकुटुंब भजनास आले.

भजनानंतर दादांना संचार झाला. आणि लगेच 'अरे, गोंदवलेकर महाराजांच्या शिष्यास बोलाव' असे म्हणून हाक मारली. तेव्हा श्री. वैद्य पुढे आले. 'अरे, गोंदवलेकर महाराजांचीच आज्ञा आहे रे. आशीर्वादाचा नारळ घालतो. मुलगा होईल जा.' असे सांगून त्यास नारळ दिला.

पुढे वर्षाचे आत वैद्यांना मुलगा झाला.

* * *

सांगलीचे प्रसिद्ध वकील गणेश कोंडो गोडबोले यांच्या मेव्हण्यास मुलगा नव्हता. गोडबोले यांच्या सासूबाई एकदा भजनाचेवेळी आल्या. दादांना संचार झाल्यावर 'माझ्या मुलाला मुलगा केव्हा होईल?' असा त्यांनी प्रश्न विचारला.

संचारात आशीर्वादाचा नारळ दादांनी त्यांना दिला. तेव्हा नातू झाल्यावर घोसरवाड येथे येऊन पालखीसमोर त्याला आडवा घालीन असे त्यांनी मागून घेतले.

आशीर्वादाप्रमाणे पुढे वर्षाभरात नातू झाला.

परंतु घोसरवाड येथे येऊन पालखीसमोर मुलाला घालण्याचा नवस त्या विसरल्या. अशी आठ दहा वर्षे गेल्यावर तो मुलगा वेड्यासारखा वागू लागला. औषधोपचार व इतर अनेक उपाय केले पण त्याचा भ्रमिष्टपणा कमी होईना.

तेव्हा त्या वृद्ध स्त्रीस दृष्टांत देऊन महाराजांनी नवस फेडण्याची आठवण करून दिली. लगेच ती नातवाला घेऊन घोसरवाड येथे आली. नवस फेडून देवाला तिने एक मोठे चांदीचे ताट व दोन वाट्या अर्पण केल्या. त्यातच भर घालून दादांनी पुढे हालसिद्ध नाथाचा एक चांदीचा सुंदर मुखवटा तयार करून घेतला. तो घोसरवाड येथे अद्यापि पूजेत आहे.

* * *

इचलकरंजी येथील घोरपडे घराण्यातील गोविंदराव व विनायकराव हे जवळचे ( चुलते–पुतणे ) भाऊबंद होते. इचलकरंजीच्या जहागिरीचा वारसा आपल्याला मिळाला पाहिजे या हेतूने विनायकराव विशेषकरून प्रयत्न करीत होते. त्यांच्या खटपटीस यश यावे यासाठी कोल्हापूरकर विनायकरावास मदत करीत असत.

या संदर्भात देवाला प्रश्न विचारावा या हेतूने गोविंदराव व विनायकराव दोघेही दादांचेकडे आले. 'आमचा एक गुप्त प्रश्न आहे. त्याचे उत्तर द्यावे' अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यावर संचार होऊन दादांनी त्यांना उत्तर दिले, 'अरे डोंगराला कासरा घालणार आहेस. बसेल खरे तुटेल!'

तेव्हा 'महाराज हे काम आपल्या आशीर्वादाने व्हायलाच पाहिजे. आपण यश द्या' अशी प्रार्थना दोघांनी केली. तेव्हा उत्तर मिळाले 'अरे एक दिवस तरी तुला गादीवर बसवेन.' माझा शब्द खरा ठरेलच.

पुढे इचलकरंजीकर बाबासाहेब घोरपडे यांनी दुसऱ्याच एका लहान मुलास दत्तक घेतले. त्याचे लग्न होऊन त्याला दोन मुले झाली व या मुलांच्या मुंबीही झाल्या.

गोविंदराव घोरपडे नियमीतपणे अमावास्येस दादांचेकडे येत असत. वर सांगितल्याप्रमाणे हकिगत घडल्यावर 'आता विनायकराव कसला गादीवर बसतो ? देवाने सांगितलेले खोटेच ठरणार असे ते म्हणू लागले.' त्यावर पुन्हा संचारात उत्तर मिळाले 'अरे अजून अवकाश आहे रे. माझे वचन खोटे ठरणार नाही.'

यावर काय करावे ? या विचाराने देवाची परीक्षा पाहाण्यासाठी कौल लावावा या हेतूने गोविंदराव, विनायकराव, शंभूनाना कुंभोजकर इत्यादी दहा-पंधरा मंडळी मिळून आप्पाचेवाडीस गेली. त्यांनी दादांनाही आग्रहाने बरोबर घेतले.

घुमटात बसून सर्वांनी प्रार्थना केली आणि कौल मागितला. सकाळपासून दुपारपर्यंत सर्वजण बसून राहिले. पण कौलाचे उत्तर काही मिळेना.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. ऊन फार तापत होते, म्हणून सर्वांनी मिळून सात मोटेच्या विहिरीवर स्नानासाठी जायचे ठरविले. दादांचेसह सर्वजण विहिरीत आंघोळीसाठी उतरले मात्र-त्या विहिरीत मोठे चार-पाच बोगदे ( मोकळ्या जागा ) आहेत. त्या बोगद्यातून संचार झाल्याप्रमाणे सिंहनाद ऐकू येऊ लागला. निदान पाच सात वेळा हा नाद सर्वांनी स्पष्टपणे ऐकला. सर्वजण घाबरून गेले. तेव्हा दादांनी नाथाना हात जोडून विनंती केली, महाराज आज्ञा व्हावी.' —तेवढ्यात इतर काही लोक तेथे आले. तेव्हा तो आवाज एकदम गुप्त झाला. सर्वजण आंघोळ करून परत घुमटात गेले. घुमटात पोहोचताच दादांना जोरात संचार झाला व ते म्हणाले, 'अरे आताच सर्वांना माझी प्रचीति दिली आहे. माझी परीक्षा कसली पाहाता ! दिलेले वचन खोटे ठरणार नाही ध्यानात ठेवा !'

कालांतराने तो दत्तक व त्याची दोन्ही मुले एका पाठोपाठ एक मरण पावली. यावर पुन्हा वारस चौकशी सुरू झाली. कोल्हापूर दरबारने पोलिटिकल एजंटच्या संमतीने एक कमिशन नेमले. त्यानी विनायकराव हाच खरा वारस आहे अशी शिफारस केली.

एकोणीसशे सत्तेचाळीसमध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर इचलकरंजीची जहागीर कोल्हापुरकरांचे ताब्यात गेली. कोल्हापूरकर विनायकरावास पूर्वीपासूनच अनुकूल होते त्यामुळे त्यांनी विनायकरावास गादीवर बसवले.

पुढे संस्थानाबरोबर ही जहागीरही प्रजासत्ताक राज्यात खालसा झाली ही गोष्ट वेगळी. परंतु महाराजांनी सांगितल्याप्रमाणे काही काळ का होईना विनायकराव गादीवर बसले!

* * *

पुणे येथे श्री. खंडेराव साठे या नावाचे एक प्रसिद्ध सी. आय्. डी. इन्स्पेक्टर होते. त्यांचा या देवाचे सांगण्यावर फार विश्वास होता. ते दरवर्षी यात्रेसही येत असत.

एकदा संचार झाला असता महाराजांनी साठे यास विचारले, 'अरे मी तुला भेटायला पुण्याला येणार आहे. माझी ओळख धरशील काय ?' तेव्हा साठे यांनी 'नक्की ओळख देईन' असे सांगितले.

एकदा खंडेराव साठे जंगली महाराज रोडवरून आपल्या कामासाठी जात असता एक अंगावर गोधडी घेतलेला, डोकीच्या जटा वाढलेला, वेडपिसा मनुष्य त्यांच्याजवळ आला व 'मला भूक लागली आहे रे मला काही तरी दे' असे म्हणून पैसे मागू लागला.

साठे यानी खिशात हात घालून पाहिले तो पैसे नव्हते. तेव्हा साठे म्हणाले 'माझ्या खिशात पैसे नाहीत. मी गडबडीने तसाच आलो.' त्यावर तो गृहस्थ साठे यांना म्हणाला, 'अरे खिशात एका कोपऱ्यात चार आणे आहेत बघ.' त्यावर साठे यानी खिशाचा कोपरा चाचपून पाहिला तेव्हा खरोखरीच एक पावली त्यांचे खिशातून निघाली. ती त्यानी त्या इसमास दिली व ते पुढे गेले.

थोड्या वेळाने या घटनेतील रहस्य त्यांच्या लक्षात आले व पुन्हा हा इसम कोठे दिसतो का म्हणून लगेच साऱ्या जंगली महाराज रोडवर त्यांनी शोधून पाहिले परंतु ह्या व्यक्तीचा पत्ता लागला नाही. आपल्याला भेटून पैसे मागणारा दुसरा कोणीही नसून आपणास सांगितल्याप्रमाणे रेवणनाथ महाराजच ते असले पाहिजेत अशी त्यांची खात्री झाली व त्यांनी ही हकिकत आपल्या डायरीत त्या तारखेस साद्यंत लिहून ठेवली.

पुढे यात्रेच्या वेळी नेहमीप्रमाणे श्री. साठे आले. दादांना संचार होताच 'अरे साठेला बोलाव' असे सांगून देवाने विचारले 'अरे मी तुला सांगितल्याप्रमाणे जंगलीमहाराज रोडवर भेटलो की नाही ? तुझ्याकडून चार आणे मागून घेतलेत रे !' अशी बरोबर खूण सांगितली. खंडेराव साठे यानी बरोबर आपली डायरी आणलेलीच होती. ती त्यांनी इतर भक्तांना दाखवली.

खंडेरावांची या देवावर खूप भक्ति होती. त्यांनी देवास चांदीची अब्दागिरी केलेली होती.

* * *

एकदा खंडेराव साठे यांच्या आग्रहावरून दादा पुण्याला गेले होते. दादांना हालसिद्धनाथाचा संचार होतो. ते कोणत्याही प्रश्नाचे अचूक उत्तर सांगतात. मनातील कोणताही प्रश्न ओळखतात... इत्यादी गोष्टी खंडेरावांनी आपल्या मित्रमंडळींना सांगितल्या होत्या.

साठे यांच्या मित्रांनी दादांचे हे सांगणे खरे की खोटे याची परीक्षा घ्यावी असे ठरविले. एका कागदावर मनातील तीन प्रश्न लिहून ते पाकीटात घालून बंद करून ठेवायचे व दादांनी ते प्रश्न कोणते आहेत ते ओळखून त्यांची उत्तरे दिली तर हा त्यांचा संचार खरा मानायचा असे त्यांनी ठरविले.

इकडे दादांना भजन झालेवर नेहमीप्रमाणे संचार झाला. साठे यांनी आपल्या मित्रांची इच्छा सांगितली. तेव्हा संचारात दादा म्हणाले, 'अरे हे कलियुग आहे. गुप्त प्रश्नांचे उत्तर सांगणेस परवानगी नाही. जे विचारावयाचे ते उघड विचारा उत्तर मिळेल. शिवाय या लोकांनी देवाची अशी काय भक्ति केली आहे. म्हणून देवाने यांचे गुप्त प्रश्नही सांगावेत ?'

तेव्हा खंडेराव साठे म्हणाले, 'देवा तुझा महिमा मी रोज यांना सांगतो. त्यांचेसाठी म्हणून नाही तर आमच्या भक्तिकरिता त्या गुप्त प्रश्नांचे उत्तर सांग.' अशी प्रार्थना ऐकताच हसत हसत देवाने सांगितले, 'ते बंद पाकीट समोर आण.' त्या पाकिटाकडे पाहात महाराज म्हणाले, 'अरे यात तीन प्रश्न आहेत. एक स्वराज्याबद्दलचा. दुसरा आपल्या वकिली व्यवसायाचा व तिसरा मुलीच्या लग्नाचा ! फोड पाकीट !' जमलेल्या इतर मंडळींनी पाकीट

फोडून पाहिले तो बरोबर तीनही प्रश्न तसेच होते. त्या तीन्ही प्रश्नांची उत्तरे
दादांनी सांगितली.

या घटनेमुळे तेथे जमलेल्या सर्व लोकांची देवाच्या सामर्थ्याबद्दल खात्री पटली.

* * *

कोल्हापूर संस्थानामध्ये कुलकर्णी वतने काढून घ्यावीत असा कायदा झाला.
त्याप्रमाणे कोल्हापूर संस्थानामधील प्रत्येक गावामधून ही वतने काढून
घेण्यात आली.

त्यावेळी हातकणंगले येथे गोपाळराव कुलकर्णी हे काम पहात होते. त्यांचे
हातून सरकारी कामाचा एक अत्यंत महत्त्वाचा कागद गहाळ झाला होता.
सर्व ठिकाणी त्यांनी तो शोधला परंतु तो कागद सापडला नाही. त्यामुळे संशया-
वरून गोपाळरावांस अटक करण्यात आली. व त्याचे सर्व उत्पन्न जप्त केले

त्यावेळीं अटकेत असताना गोपाळरावांनी मामलेदारास विनंती केली
की, 'सांगली येथे गोविंदपंतदादा घोसरवाडकर यांचा सध्या मुकाम आहे.
माझी त्यांच्या सांगण्यावर अतिशय श्रद्धा आहे. माझ्या हातून गळपटलेला
कागद कोठे सापडेल हे ते नक्की सांगू शकतील. तेव्हा त्यांचेकडे जाण्यास मला
परवानगी द्यावी.'

त्याप्रमाणे मामलेदाराने दोन शिपाई, एक कारकून यास बरोबर देऊन
स्पेशल टॅक्सी करून सांगलीस जाण्यास परवानगी दिली.

या घटनेची काडिमात्र हकिगत सांगलीस कोणासही कळली नव्हती. रविवारी
नेहमीप्रमाणे भजन वगैरे होताच दादांना संचार झाला. सर्वांचे प्रश्न सांगून झाले.
तेव्हा नेहमीप्रमाणे शेजारती म्हणण्यासाठी भक्त गडबड करू लागले. तेव्हा
संचारातच दादांनी सांगितले, 'अरे, शेजारती आताच करू नका. माझा
हातकणंगल्याचा भक्त संकटात सापडला आहे. तो प्रश्न विचारण्यासाठी आता
येथे येणार आहे. त्याची वाट बघा.'

थोड्याच वेळात दोन शिपाई एक कारकून यांच्यासह गोपाळराव कुलकर्णी
तेथे येऊन दाखल झाले. दादांचे अंगी संचार होताच. गोपाळरावांनी येऊन
देवाचे घट्ट पाय धरले व सर्व हकिगत सांगितली आणि म्हणाले 'महाराज, तो
कागद नेमका कोठे आहे तेवढे कृपा करून सांगा. कागद सापडला नाही तर

मला शिक्षा होणार. माझी अब्रू जाणार!' तेव्हा महाराज म्हणाले, 'अरे कलियुगात एवढ्या गुप्त गोष्टी सांगण्यास परवानगी नाही.' त्यावर गोपाळराव कळवळ्याने म्हणाले, 'महाराज अब्रू घालवून शिक्षा भोगित जगण्यापेक्षा मला तूच मारून टाक!' ही अवस्था पाहून महाराजांना त्याची दया आली व ते म्हणाले, 'या प्रश्नाचे उत्तर पहाटे चार वाजता देईन!'

पहाटे चारपर्यंत गोपाळराव व इतर भक्त दादांचे शेजारीच भजन करीत बसले. पहाटे बरोबर चार वाजता दादांना संचार झाला व 'अमूक अमूक नंबरच्या शिडीवर अमूक कप्यात तीन गाठीचे एक दप्तर आहे. त्याला लाल चिटाचे कापड आहे. त्यात तीन कामे आहेत त्या कागदांच्या पोटात हा कागद आहे जाऊन बघ जा' असे सांगितले.

त्याप्रमाणे शिपाई, कारकून व गोपाळराव सकाळी मामलेदाराकडे गेले व सदर हकिगत सांगितली. मामलेदारानी रेकॉर्ड खोलीत गोपाळरावास आंत सोडण्यापूर्वी त्याची संपूर्ण झडती घेऊन त्याचेजवळ कागद नाही याची खात्री करून घेतली, व त्यास आत सोडले. खरोखरीच दादांनी सांगितल्याप्रमाणे विशिष्ट शिडीवर तीन गाठीचे लाल चिटाचे फडक्याचे दप्तर होते ते सोडून पाहिले त्यात तीन कामांचेच कागद होते व त्यातील कागदाच्या पोटात हा हरवलेला कागद बरोबर सापडला!

गोपाळरावांना अतिशय आनंद झाला. एका मोठ्या संकटातून त्यांची सुटका झाली. पुढे अखेरपर्यंत ते या संप्रदायात होते. त्यानी हातकणंगले येथे आपल्या वाड्यात देवाचा मुखवटा बसवला. तेथेही देवाची पालखी येई. काही वर्षे हातकणंगले येथे देवाचा मोठा उत्सव साजरा होत असे.

* * *

गोपाळराव कुलकर्णी, गोविंदराव घोरपडे इ. मंडळी दर अमावास्येला भजनासाठी दादांचेकडे येत असत.

गोविंदराव घोरपडे यांचेकडे अण्णाभटजी वझे (तमदलगेकर) हे काही कामानिमित्त आले होते. या अण्णा भटजींना २५ वर्षे पोटशूळाची व्यथा होती. म्हणून गोविंदरावांनी त्यास सांगितले की, 'आम्ही सर्वजण गोविंदपंत-दादा घोसरवाडकर यांचेकडे भजनासाठी जाणार आहोत. त्यांना संचार होतो

व ते कोणत्याही अडचणीचे निवारण करण्याचा मार्ग सांगतात. तुम्ही आमचेबरोबर चला. ही पोटशूळाची व्यथा कधी जाईल हे विचारून घ्या.'

त्यावर अण्णा भटजी म्हणाले, 'गेली २५ वर्षे ही व्यथा मला जडलेली आहे. ही जावी म्हणून मी अनेक अनुष्टाने, जपजाप्ये केली. अनेक ज्योतिष्यांना विचारले. अनेक वैद्यांकडून औषधे घेतली यापैकी कशाचाही उपयोग झाला नाही. कुठला देव काय सांगणार आहे? माझा कर्मभोग काय देव काढून घेणार आहे काय?'

त्यावर गोविंदराव घोरपडे यांनी आग्रहाने त्यांना आपल्या गाडीत बरोबर घेतले व जवळ जवळ जबरदस्तीनेच भजनासाठी आणले.

भजन वगैरे होताच नेहमीप्रमाणे दादांना संचार झाला व आधी त्यांनी अण्णाभटजींनाच समोर बोलावून विचारले 'अरे कुठला देव तुझा कर्मभोग काढून घेणार आहे म्हणून विचारतोस तर मग इथं कोणत्या हेतूने आला आहेस?'

आपण गोविंदराव घोरपडे यांचे घरी त्राग्याने उच्चारलेलेच शब्द देव आपल्याला विचारीत आहे हे पाहून अण्णा भटजी चकित झाले. देवाला हात जोडून म्हणाले 'महाराज, पंचवीस वर्षे या व्याधीने मी वैतागून गेलो आहे. त्या त्रासामुळे अज्ञानपणाने मी तसे बोलून गेलो क्षमा करा.'

'अरे, तुझा पोटशूळ आत्ताच्या आत्ता राहावयास पाहिजे की राहात राहात बंद झाला असता चालेल?' असे महाराजांनी अण्णा भटजींना विचारले.

तेव्हा अण्णा भटजी म्हणाले 'आत्ताच्या आत्ताच राहायला पाहिजे.'

त्यावर महाराजांनी त्यास तोंड उघडण्यास सांगितले व त्यांचे तोंडात भंडाऱ्याची चिमट घातली.

दुसरे दिवशी सर्व भक्तमंडळी प्रसादासाठी राहिली होती. त्यात घोरपडे यांचेबरोबर अण्णा भटजी होतेच. दादांनी आचाऱ्यांकडून पोटशूळास बाधक असे सर्व तेलकट, तुपकट. आंबट असे पदार्थ मुद्दाम करावयास सांगितले. इतर भक्त मंडळींबरोबरच पंक्तीत अण्णा भटजींचेही पान वाढून आग्रह कर करून सर्वांनी अण्णा भटजींना ते सर्व पदार्थ खावयास लावले.

अण्णा भटजींची नेहमीची सवय अशी की जेवण होताच थोड्या वेळाने त्रास सुरू होई व जेवलेले सर्व अन्न त्यांना ओकून पाडून टाकावे लागे. अशा उलट्या आज तर नक्कीच कराव्या लागणार या कल्पनेने पाण्याचे तांबे भरून घेऊन अण्णा भटजी वाट पाहात बसले. अर्धा तास गेला, तास गेला-दोन तास झाले पण एकही उलटी झाली नाही.

अण्णा भटजींची पोटशूळाची व्यथा सांगितल्याप्रमाणे कायमची बंद झाली. पुढे हेच अण्णा भटजी, हिरवे तेल, म्हशीचा चीकही पिऊन पचवू लागले. ... जवळ जवळ नव्वद वर्षांपर्यंत ते जगले.

याप्रमाणे ही पोटशूळाची व्यथा बरी होऊन काही महिने लोटले. एकदा घरातील कपाट झाडीत असता पूर्वी पोटशूळावर ते घेत असत त्यांतील काही औषधाच्या पुड्या त्यांचे हाती लागल्या. या पुड्या फुकट टाकून कशाला द्या. या विचाराने त्यानी त्यातील एक पुडी घेतली व बाकीच्या नीट जपून ठेवल्या. त्याबरोबर त्याच दिवसापासून त्यांची पोटशूळाची व्यथा पूर्वीप्रमाणेच सुरू झाली. पुढे अण्णा भटजी अमावस्येस भजनास आले व 'देवा, माझी व्यथा पुन्हा सुरू झाली की' म्हणून तक्रार सांगू लागले.

त्यावर देवाने हसत हसत उत्तर दिले 'अरे कपाटातील जपून ठेवलेले औषध संपले म्हणजे व्यथा संपून जाईल.' या उत्तराने अण्णा भटजीना आपली चूक कळून आली व त्यांनी पोटशूळावर पुन्हा कसलेही औषध घेतले नाही.

आपली पंचवीस वर्षांची ही जीवघेणी व्यथा देवाच्याच कृपेने कायमची नाहीशी झाली यामुळे अण्णा भटजी न चुकता भजनास व यात्रेस येत असत. देवाच्या या उपकारातून कसे मुक्त व्हावे या कल्पनेने त्यांनी देवाला एकदा विचारले 'महाराज तुमची विशेष सेवा करावी अशी माझी फार इच्छा आहे. पण मी तर दरिद्री माणूस. मला मार्ग दाखव व माझे हातून सेवा करवून घे.'

तेव्हा महाराजांनी त्यास 'अरे माझ्यावरून (देवावरून) पदे, आरत्या कर.' अशी आज्ञा केली. तेव्हा अण्णा भटजी म्हणाले, 'देवा मला काव्यातील काहीही गम्य नाही. छंद, शास्त्र काहीच येत नाही.'

त्यावर महाराजांनी त्यास पुन्हा तोंड उघडण्यास सांगून चिमूटभर भंडारा

त्यांचे तोंडात घातला आणि सांगितले की ' तुला माझा दृष्टांत होईल व काव्य लिहिण्याची स्फूर्ति मिळेल. '

सांगितल्याप्रमाणे अण्णा भटजींना दृष्टांत झाला व त्यांनी श्रीहालसिद्ध-नाथांचेवरून विविध पदे रचली. ती पदे आजही सांप्रदायिक भजनात नित्य म्हटली जातात.

* * *

दत्तोपंत कुलकर्णी कुंभोजकर हे दादांचे परम स्नेही होते. त्यांची हालसिद्ध-नाथांचेवर अलोट भक्ति होती. ते आपल्या मुला-बाळासह सांगली येथे राहावयास गेले असता एकदा अकस्मात आजारी पडले व अत्यवस्थ झाले. त्यावेळी ' मला गोविंदपंतदादांची भेट घडवा ' हाच त्यांनी ध्यास घेतला.

त्याप्रमाणे त्यांच्या चिरंजीवांनी दादांचेकडे येऊन निरोप सांगताच दादा तातडीने सांगलीस गेले. तेथे दादांना संचार झाला ' अरे कैलासाला जाऊन दोन वर्षे आयुष्य वाढवून आणले आहे रे ' असे सांगून भंडारा दिला.

त्याप्रमाणे दोन वर्षे दत्तोपंत कुंभोजकरांच्या प्रकृतीस काहीही अपाय झाला नाही. दत्तोपंत चिमड संप्रदायातील श्रेष्ठ साधक होते. ते नित्य नियमाने नामस्मरण करीत असत.

दोन वर्षानंतर एका शुक्रवार एकादशीचे दिवशी साधनास बसण्यापूर्वी त्यांनी आपल्या पत्नीस विचारले ' आज एकादशी आहे, मी नदीला स्नानाला जाणार आहे. तू येणार आहेस काय ? '

त्यावर ' तुम्हीच जाऊन या ' असे त्यांच्या पत्नीने उत्तर दिले. ' ठीक आहे. ' असे म्हणून दत्तोपंतानी अंगावरून धोतर पांघरून घेतले व नित्य नेमास प्रारंभ केला. जवळ जवळ तास होऊन गेला. नेहमीची त्यांची चहा घेण्याची वेळ झाली म्हणून त्यांना इतरांनी हाक मारली. हालवून पाहिले तो हातात माळ घेऊन नामस्मरणासाठी आसन घालून बसलेल्या अवस्थेतच दत्तोपंतांचे निर्याण कधीच झाले होते.

त्यांचे चिरंजीव कै. शंभुनाना हे अखेरपर्यंत या देवाचे भक्त होते. या ग्रंथात सांगितलेल्या सर्व आठवणींना ते साक्षी होते. तीन वर्षापूर्वी त्यांचे देहावसान झाले. श्री अनंतराव व श्री नारायणराव कुंभोजकर हे श्री. हालसिद्धनाथाचे परमभक्त असून ही सर्व मंडळी घोसरवाड व अप्पाचीवाडी येथे येत असतात.

* * *

कारिकोळ हे तिकोटे तालुक्यातील गाव असून पूर्वी ते कुरुंदवाड संस्थानचे हद्दीत येत असे. कारिकोळ तिकोटे येथे बाळाजीपंत फळापूरकर हे मामलेदार म्हणून त्यावेळी काम करीत असत.

कारिकोळ येथे श्रीहालसिद्ध नाथाचे एक छोटे देऊळ होते. मात्र ते जागृत देवस्थान असल्यामुळे असंख्य भक्त या देवास येत. नागाप्पा धनगर हा देवाचा पुजारी होता. त्याने एकदा संचारात बाळाजीपंतास ' हालसिद्धाप्पाचे देऊळ बांध म्हणजे तुझी व्यथा नाहिशी होईल असे सांगितले. बाळाजीपंतास मूळव्याधीची अत्यंत त्रासदायक अशी व्यथा होती. बाळाजीपंतही देवाचे भक्त होते. त्यांनी कारिकोळ येथे हालसिद्धाचे मोठे देऊळ बांधले व देवास नंदादीप ठेवला. देऊळ पूर्ण होताच बाळाजीपंतांची व्यथा नाहिशी झाली.

बाळाजीपंत तिकोटे येथे राहून आपले काम पाहात असत. त्यांच्या पत्नीची या देवावर अलोट श्रद्धा होती. त्या तिकोट्याहून चार मैल चालत जाऊन दर रविवारी त्या देवाचे दर्शन घेऊन येत व मगच अन्न ग्रहण करीत.

एका रविवारी बाळाजीपंत व गावचे पाटील सकाळीच बुद्धिबळे खेळण्यास बसले. जेवणाची वेळ टळून गेली तरी खेळ संपेना. इकडे देवदर्शनास जाण्याची त्यांच्या पत्नीला ओढ लागलेली. खेळ पूर्ण करून बाळाजीपंतांना जेवण आटोपण्यास बराच वेळ लागला. डोक्यावर सूर्य चांगलाच तापत होता. अशा परिस्थितीतच उपाशी पोटी देवदर्शनासाठी बाळाजीपंताच्या पत्नी अनवाणी निघाल्या. पायास व डोकीस चटके बसू लागले. जीव कासावीस होऊन, भोवळ येऊन रस्त्यातच त्या पडल्या.

त्या वेळी तिकोट्याच्या पाटलांसारखाच वेश असलेला एक गृहस्थ आपला घोडा घेऊन लगबगीने तेथे आला व त्या स्त्रीस म्हणाला, ' बाळाजीपंतानीच घोडा घेऊन मला पाठविले आहे. या घोड्यावर आपण बसा व कारिकोळला चला. '

त्यावर त्या म्हणाल्या, ' माझा चालत जाण्याचाच नियम आहे. देवाचे दर्शन झाल्याखेरीज मी घोड्यावर बसणार नाही. हळूहळू त्या उठल्या व मोठ्या कष्टाने कारिकोळास जाऊन पोहोचल्या. देवदर्शन घेतले व मग त्या घोड्यावर बसून तिकोट्यास परत निघाल्या. घोड्याचा लगाम धरून तो मनुष्य

तिकोट्यापर्यंत आला. वाडा जवळ येताच तो म्हणाला, मी घोडं बांधून येतो तवर तुम्ही पुढं व्हा!'... बाई आपल्या घरी येऊन पाहातात तो सोप्यावरच आपले मालक व तिकोट्याचे पाटील बुद्धिबळाच्या खेळात रमलेले. तेव्हा आश्चर्याने त्या म्हणाल्या 'मी घोडं बांधून येतो तुम्ही पुढं व्हा असं आत्ताच तर सांगून घोडं बांधायला गेलात आणि इकडं येऊन डाव केव्हा मांडलात?'

तेव्हा बाळाजीपंत म्हणाले 'अहो सकाळपासून आम्ही इथेच खेळत बसलोय. खेळ संपलाही नाही व आम्ही उठलोही नाही!'

त्यावर घडलेली सर्व हकिगत बाळाजीपंताच्या पत्नीने त्या दोघास सांगितली तेव्हा सर्वजण आश्चर्यचकित झाले. संकटप्रसंगी देव कळवळ्याने कसा धावून येतो याची त्यांना प्रचीतीच आली.

* * *

बळवंतराव डफळापूरकर यांचे चिरंजीव माधवराव हे तिकोट्यालाच पुढे मामलेदाराचे हाताखाली हेडक्लार्क म्हणून काम करू लागले. या माधवरावास गोविंदपंतदादांची मुलगी गोदूबाई दिली होती. गोदूताईस लागोपाठ सात आठ मुलीच झाल्या होत्या.

दादा अधून मधून कारिकोळ येथेही देवास जात असत. एकदा ते कारिकोळ येथे गेले असता त्यास संचार झाला त्यावेळी तेथील पुजाऱ्याने 'माधवरावास अद्यापि मुलगा नाही. मुलगा कधी देणार?' असे विचारले. त्यावर 'इथला देवळातला माझा नंदादीप बंद पडला आहे तो चालू करायला सांग म्हणजे माधवरावाला मुलगा देतो' असे संचारात सांगितले.

'आधी मुलगा दे मग नंदादीप ठेवतो' असे माधवराव म्हणू लागले. तर 'आधी नंदादीप ठेव मग मुलगा देतो' असे देव म्हणू लागला. त्यावेळी माधवरावाकडून नंदादीप ठेवण्याची हमी एका पाटलाने घेतली तेव्हा गोविंदपंत दादांनी माधवरावास आशीर्वादाचा नारळ दिला. वर्षभरातच माधवरावास मुलगा झाला. राजाभाऊ हे त्याचे नाव. मुलगा होताच माधवरावांनी नंदादीप ठेवला. आजतागायत हा नंदादीप चालू असून राजाभाऊ डफळापूरकर व त्यांची मुलेबाळे अप्पाचेवाडीस व कारिकोळास नियमाने येतात.

* * *

एके दिवशी दादांना आकाशातून संचार करीत जाणाऱ्या दिव्य पुरुषांचे दर्शन झाले. रुद्राक्षमाळा धारण केलेल्या, जटा बांधलेल्या. अतिशय तेजःपुंज दिव्य पुरुष होते ते. आकाशातून तेजकिरण टाकीत काही मंत्र सांगत निघाले होते.

दादांना पाहून ते थांबले व म्हणाले, 'अरे सात दिवसात तुझ्या देवाने आयुष्य वाढवून आणले तर जगशील' असे बोलून 'एकी न्हारे धर्म करारे अरिष्ट जातिल सारी' असे सांगत निघून गेले.

दादांना ही सूचना ऐकून आश्चर्य वाटले. त्यांनी आपल्या आप्तेष्टांना, मित्रांना, भक्तमंडळींना पत्रे लिहून बोलावले व घडलेली हकिगत सांगितली. सर्वजण जमले व ते रोज भजन करून देवाला प्रार्थना करीत. असे सहा दिवस निघून गेले. सातव्या दिवशीही दुपारपर्यंत दादांना काहीही झाले नाही. आता अरिष्ट जवळ जवळ टळले म्हणून सर्वजण आनंदाने गप्पा मारीत बसले. त्यावेळी अकस्मात दादांना खोकल्याची जोराची उबळ आली व एकदम प्राण कासावीस होऊन ते निचेष्ट पडले. सर्वजण घाबरून गेले. कोणासही काही सुचेना. त्यावेळी एकाने गडबडीने भंडारा आणून दादांना लावला व भजन म्हणावयास प्रारंभ केला. तेव्हा ताबडतोब दादांना संचार व हळूहळू मान हलू लागली. थोड्याच वेळात जोराचा संचार होऊन 'अरे कैलासाला जाऊन चौदा वर्षे आयुष्य वाढवून आणले रे' असे देवाने सांगितले. त्याप्रमाणे दादांचेवरील हे अरिष्ट टळले. सर्व भक्तमंडळीस आनंद झाला व त्या दिव्यपुरुषांची सूचनाही खरी ठरली.

* * *

बापू भटजी वाकणकर हे हालसिद्धनाथाचे भक्त भजनासाठी दादांचेकडे नेहमी येत असत. या बापू भटजींच्या मुलीचे लग्न ठरले.

भजन झाल्यावर दादांना संचार झाला व बापू भटजींना बोलावून 'अरे तुझ्या मुलीचे लग्न अमुक एका विशिष्ट तिथी, वार, नक्षत्रावरच कर' असे सांगितले. त्याप्रमाणे सांगितलेला मुहूर्त बापू भटजी यांनी मुलाकडच्या मंडळींना कळविला. त्या मंडळींनी ज्योतिष्यांना विचारले तो नेहमीच्या पंचांगात त्या तिथी नक्षत्रांवर मुहूर्त अजिबात नव्हता.

सांगलीला त्यावेळी वेदशाळा चालू होती. तेथील ज्योतिष पंडितांनी देखील त्या दिवशी मुहूर्त नाही असेच सांगितले. तेव्हा मुलाकडचे लोक त्या

दिवशी लग्न लावणेस तयार होईनात. मग बापू भटजी या सर्व मंडळींना घेऊन दादांचेकडे भजनाचे दिवशी आले. दादांना संचार झाल्यावर त्यांनी प्रश्न विचारला, 'महाराज, आपण सांगता त्या तिथी नक्षत्रावर तर पंचांगामध्ये मुहूर्त मिळत नाही मग हे लग्न कसे लावायचे ?

तेव्हा संचारातच दादांनी त्यांना अरे, 'मुहूर्त चिंतामणी' या ग्रंथातील अमूक अमूक पानावरील टीप वाचून पहा. त्या सांगितलेल्या योगावर या मुलीचे लग्न केल्यास तिच्या कुंडलीतील दोष नाहीसा होऊन तिचा संसार सुखाचा होईल !' असे सांगितले.

मुलाकडील लोकांनी वेदशाळेत जाऊन 'मुहूर्त चिंतामणी' हा ग्रंथ काढून सांगितलेल्या पानावरील टीप पाहिली. ती वर सांगितल्याबरहूकूम होती. तेव्हा त्यांची खात्री पटली व ते लग्न दादांनी सांगितलेल्या मुहूर्तावरच झाले. मुलीचे आयुष्य व संसार सुखाचा झाला.

या घटनेत विशेष हे की दादांना ज्योतिषशास्त्राची काहीही माहिती नव्हती व 'मुहूर्त चिंतामणी' हा ग्रंथ तर त्यांनी कधी पाहिलाही नव्हता.

श्री. बापू भटजी वाकणकर हे गृहस्थ अद्यापि हयात असून ते अप्पांचे वाडीस यात्रेस येत असतात.

* * *

माधवराव कुलकर्णी भोजकर या नावाचे एक गृहस्थ दादांचेकडे येत असत. त्यांनी पाच लग्ने केली पण त्या पाचही बायका मरण पावल्या व त्यांना पुत्र लाभला नाही.

'अरे, दोन अक्षराच्या गावची मुलगी तुला मिळेल' असे दादांनी त्यांना संचारात एकदा सांगितले. त्याप्रमाणे माधवरावाचे जत येथील एका मुलीशी सहावे लग्न झाले.

सहाव्या लग्नानंतर 'तुला मुलगा होईल' असे सांगून संचारात त्यांना आशीर्वादाचा नारळ दिला होता. पुढे माधवरावांची पत्नी गरोदर राहून प्रसूतकाल जवळ आला. त्यावेळी भोजकरांनी मूल जन्माला येण्याच्या आधी आपल्या घरासमोर मांडव वगैरे घालून मुलाच्या बारशाची जोरदार तयारी केली. त्यांचा उतावीळपणा पाहून लोक म्हणू लागले 'आता याला मुलगा

झाला तर केवढी फजिती होणार ! ' पण मोजकर म्हणत ' दादांनी मला संचारात सांगितलेले आहे ते खरे ठरणारच.' पुढे त्यांची पत्नी प्रसूत झाली व सांगितल्याप्रमाणे त्यांना मुलगाच झाला. या मुलाचे नाव त्यांनी गुरुनाथ असे ठेवले व देवाची पालखी वगैरे आणून मोठ्या थाटात-उत्सव साजरा केला.

* * *

हातकणंगले येथील गोपाळराव कुलकर्णी यांना महत्त्वाचा कागद सांपडण्याची हकिगत या पूर्वी आलेलीच आहे. एका फार मोठ्या संकटातून देवाने आपल्याला वाचवले म्हणून गोपाळरावांनी पुढे देवाचा मुखवटा तयार करून तो देव्हाऱ्यावर ठेवला. त्याची पूजाअर्चा ते करू लागले. घोसरवाड, कारिकोळ येथील पालख्याही तेथे येत. काही काळ दर अमावस्येचे भजनही तेथेच होई व दादा तेथे जात असत.

गोपाळराव कुलकर्णी यांचे घरी एका समंधाची बाधा होती. दिवस रात्री हा समंध वाड्याच्या माडीवरून हिंडल्या चालल्याचे सुस्पष्ट आवाज सर्वांना ऐकू येत. त्यामुळे गोपाळराव कुलकर्णी, त्यांची कुटुंबीय मंडळी घाबरून जात व या त्रासामधून आमचे रक्षण करा अशी महाराजांस प्रार्थना करीत.

एकदा दादांना संचार झाल्वर हा समंध दादांचे पुढे येऊन उभा राहिला व ' अरे मला जबरदस्तीने संन्यास देऊन यांनी माझी इस्टेट लुबाडली आहे रे, मी समंध होऊन यांना छळून यांचा नष्टांश करेन ' असे सांगू लागला.

तेव्हा दादांनी त्याला ' आता या घरात नाथ महाराजांचा मुक्काम आहे. तुला येथे राहणेस परवानगी नाही. घराबाहेरील समोरच्या झाडावर रहा. तुला या घरातून वर्षाला योग्य ती खंडणी मिळेल ' असे सांगितले. त्याप्रमाणे त्याने गोपाळरावाकडून वचन घेतले व तो समंध घराबाहेर गेला.

काही कालानंतर एके वर्षी गोपाळराव ही खंडणी देण्यास विसरले. त्यावेळी भजनासाठी दादा हातकणंगले येथे गेले असता ' अरे माझी खंडणी मला मिळालेली नाहीरे ' अशी तक्रार करीत तो येऊन उभा राहिला. तेव्हा दादांनी गोपाळरावास विचारले.

भजनासाठी शंभर, दोनशे लोक जमलेले होते. एवढ्या लोकात चूक कशी कबूल करावी या विचाराने ते म्हणाले ' खंडणी चुकेन कसा ? नेहमीच्या वेळी दिलेली आहे ! '

त्यावेळी, हा संवाद चाललेल्या सोप्यापासून, दोन चार दालने दूरवर असलेल्या स्वयंपाकघरात, गोपाळरावांच्या पत्नी स्वयंपाक करीत होत्या. हातातील भाकरी नाचवीत त्या किंचाळत बाहेर आल्या व म्हणाल्या. 'हा खोटं बोलतोय रे माझी खंडणी मला दिलेली नाही!' समंधाच्या संचाराने त्या घुमू लागल्या. किंचाळू लागल्या.

तेव्हा गोपाळरावांनी आपली चूक कबूल केली व खंडणी देण्याचे मान्य केले.

त्यावर, 'जा आता तुझ्या जागी बैस जा' असे सांगताच, बंद वाड्याच्या मोठ्या दरवाज्याचा आडणा खाऽदिशी आपोआप उघडून तो समंध बाहेर पडला!

एवढे लोक तिथे जमलेले पण वाड्याचे दार लावायला जाण्याची कोणास छाती होईना. गोपाळरावांचे वाड्याचे परसात एक वृद्ध भटजी पूजाअर्चा करून राहिला होता. त्यास बोलावून आणून त्याचेकडून सर्वांनी दार बंद करून घेतले. एवढी भयंकर भीति हा प्रकार पाहून सर्वांना वाटत होती.

* * *

बेळगाव येथील कलेक्टर ऑफीसमधले श्रीपतराव शिरट्टीकर नावाचे एक गृहस्थ दादांचेकडे भजनासाठी येत असत. शिरट्टीकरांचे घरी अनेक तऱ्हेच्या बाधा होत्या. त्यांना व कुटुंबियांना प्रपंचात नेहमी त्रास होत असे. हा त्रास होऊ नये म्हणून त्याला एक ताईत दादांनी मंत्रून दिला होता. तो त्याने आपल्या जानव्यात बांधलेला होता.

शिरट्टीकर एकदा सांगलीस आले व स्नानासाठी कृष्णाबाईस गेले. नदीला पाणी खूप होते त्या पाण्यास ओढही होती. श्रीपतरावास चांगले पोहोता येत नसे म्हणून गडबडीने त्यानी काठावर बसूनच स्नान आटोपले व ते परत फिरले. या गडबडीत त्यांचे गळ्यातील जानवे व तो ताईत दोन्ही हारवले. कोणासही न सांगता ते आपल्या मित्रपरिवारात रंगले. जेवणखाण झाले.

दुपारचेवेळी दादा झोपले असता त्यांना संचार झाला व 'अरे शिरट्टीकरास बोलाव पाहू' असे सांगू लागले.

शिरट्टीकर पुढे येताच 'अरे तुझे जानवे कुठे आहे?' हाच पहिला प्रश्न त्यांनी त्यास विचारला. तेव्हा घडलेली हकिगत सांगून तो म्हणाला 'महाराज

ते जानवे व तो ताईत दोन्ही हरवले आहेत. आमचा पूर्वीचा त्रास पुन्हा सुरू होईल कृपा करून नवा ताईत तयार करून द्या.'

'अरे नवा ताईत करून द्यायला परवानगी नाही रे, तोच सापडेल. नदीवर जाऊन शोध घेजा' असे सांगितले. तेंव्हा सकाळी हरवलेले ते जानवे व ताईत शोधण्यासाठी शिरट्टीकर विष्णूघाटावर गेले. बरोबर शंभूनाना कुंभोजकर यांनाही घेतले आणि जेथे आंघोळ केली होती तेथे शोधास प्रारंभ केला.

इकडे दादांचे अंगी संचार होताच देवाने इतर भक्तांना सांगितले 'अरे शिरट्टीकराचे जानवे आणून देतोरे' असे सांगून थोडा वेळ त्यांचा संचार दहा एक मिनिटे संथ लयीत चालू राहिला.

इकडे शिरट्टीकर व शंभूनाना कुंभोजकर दोघे जानवे शोधीतच होते. त्यांच्या-जवळ एक लहान मुलगा आला व त्याने विचारले,

'तुम्ही काय शोधता आहा?'

'जानवे आणि ताईत शोधीत आहो.' असे त्यास या दोघांनी उत्तर दिले.

तेंव्हा 'थांबा हं मला जानवे सापडते का मी बघतो.' असे म्हणून त्या मुलाने पाण्यात बुडी मारून ओंजळभर वाळू वर काढली तो त्यात ते जानवे व ताईत होता तो दिला.

त्याच क्षणी दादांनी इकडे जोरात संचार होऊन सांगितले, 'अरे त्यांना जानवे देऊन आलो बघा.'

थोड्याच वेळात शिरट्टीकर व शंभुनाना दोघे परत आले. त्यांनी तेथे घडलेली हकिगत लोकांना सांगितली. व येथील लोकांनी त्यांना इकडे घडलेल्या सूचना सांगितल्या. यामुळे सर्वासच आश्चर्य वाटले.

* * *

एकदा गोपाळराव कुलकर्णी, गोविंदराव घोरपडे आणि कोल्हापूर, सांगली येथील सर्व भक्त मंडळींनी मिळून गाणगापूरला दत्तदर्शनासाठी जावयाचे असे ठरविले.

सर्वांनी प्रथम हातकणंगले येथे जमावयाचे व तेथून पुढील प्रवासासाठी जावयाचे असे ठरले होते त्याप्रमाणे सर्व भक्त मंडळी हातकणंगले येथे जमली. जेवणखाण आटोपून सर्वजण आता बाहेर पडणार एवढ्यात एक वेडसर भिकारी गोपाळराव कुलकर्णी यांचे दारात आला व जेवण मागू लागला.

तेव्हा गोपाळरावांनी आपल्या सौभाग्यवतीस हाक मारून त्याला जेवण वाढा असे सांगितले व आपणाला गाडीने पुढे गाणगापुरास जावयाचे आहे. असे म्हणून ते गडबडीने इतर आवरा आवर करू लागले.

तेव्हा तो वेडसर भिकारी त्यांना म्हणाला, 'काहे को तुम जाते हो? गाडी तीन घंटे लेट है' हे त्याचे उद्‌गार दादांनीही ऐकले व ते गोपाळरावांना म्हणाले, 'आपल्याला जायला उशीर झाला अगर गाडी चुकली तरी चालेल पण याला आधी जेवायला घाला.'

तेव्हा गोपाळरावांनी त्या भिकाऱ्याला एका पत्रावळीवरून प्रथम भात आणून वाढला व ते आमटी आणण्यासाठी आत गेले. तोवर त्याने सगळा भात खाऊन टाकला. आमटी वाढून गोपाळराव भाकरी आणण्यास आत गेले तोवर आमटीच पिऊन टाकली. मग भाकरी खाऊन हात धुतले. व पत्रावळ चुरगाळून तीच तोंडात घातली.

आणि सर्वांपुढे बसून तो भिकारी म्हणाला माझ्या तळहातावर कापूर लावा. लोकांनी कापूर लावला. जळता कापूर उचलून त्याने आपल्या डोक्यावर ठेवला त्याबरोबर डोक्यावरचे केस जळू लागले. मग लोकांनी लगबगीने तो विझवला.

त्याचे हे सारे खेळ दादा पाहात होतेच. दादा त्या भिकाऱ्याला उद्देशून म्हणाले, 'तू कोण आहेस हे मी ओळखले आहे!' तेव्हा तो दादांचेकडे पाहात पाहात तेथून एकदम पसार झाला. या प्रकारानंतर इतरांनाही थोडी कल्पना आली व सर्वजण त्या भिकाऱ्याला शोधू लागले परंतु आसपास कोठेही त्याचा पत्ता लागला नाही. या सर्व प्रकारानंतर गोपाळराव रेल्वे स्टेशनवर सर्वांची तिकिटे काढण्याकरिता गेले ते जाऊन चौकशी करतात तो गाडी खरोखरच तीन तास उशीरा येणार होती!

* * *

दत्तोपंत कुलकर्णी कुंभोजकर यांची मुलगी चंद्राबाई यांचे लग्न उदगावचे कुलकर्णी मोरेश्वरपंत यांचेशी झाले. त्यांना मूल होई परंतु ते फार काळ जगत नसे. तेव्हा नाथांचा आशीर्वाद घ्यावा या कल्पनेने मुलास घेऊन त्या घोसरवाड येथे आल्या व भक्तिभावाने त्यांनी देवास प्रार्थना केली.

दादांनी संचारात 'या मुलाला मी पोंगडीत टांगले आहे. याला धक्का लागत नाही बा' असे सांगून भंडारा दिला. त्या आशीर्वादाप्रमाणे चंद्राक्कांचा हा एकच मुलगा-गजाननराव जगला. त्याच्या आधीची व नंतरचीही त्यांची सर्व अपत्ये मृत्यू पावली. उदगावकर घराण्यावर महाराजांची कृपा असून गजाननराव उदगावकर आजही अप्पाचेवाडी व घोसरवाड येथे यात्रेस येत असतात.

* * *

दादांचा सांगलीस मुक्काम होता त्या वेळी संचारावस्थेत 'अरे, देशाचा एक हत्ती जाणार रे.' असे आपल्या भक्तांना सांगितले.

दुसरे दिवशीच लो. टिळकांचे महानिर्याण झाल्याची वार्ता कळली.

तसेच ह. भ. प. कोटनीस महाराजांचे मृत्यूपूर्वी 'अरे, माझ्या भक्त परंपरेमधला एक अधिकारी भक्त जाणार रे' असे सांगितले होते.

* * *

दादांचा मुक्काम सांगलीस असला म्हणजे ते उदगावकरांचेकडे घरी जात असत. चंद्राबाई उदगावकर ह्या ह. भ. प. गोविंदराव केळकर-मामा यांचेकडे नित्य कीर्तन ऐकण्याकरिता जात असत. त्यामुळे दादांचा व ह. भ. प. गोविंदराव केळकर मामांचा चांगला परिचय झाला होता. शिवाय संप्रदायाच्या-दृष्टीने केळकरमामा हे चिमड सप्रदायीच. 'अखंड कीर्तन व नामस्मरणाने संप्रदायातील केळकरमामा अधिकारी पुरुष ठरतील' असा आशीर्वाद ती.दादांनी त्यांना दिला होता. ते त्यांचे उद्‌गार संपूर्णतया खरे ठरले. चाळीस वर्षे केळकर मामानी अखंड कीर्तनाची परंपरा चालविली व त्यांचे पश्चात त्यांचे सुपुत्र श्री. राम गोविंद केळकर यांनीही ती अखंड चालविली आहे. ( श्री. राम गोविंद केळकर यांनी ती. कै. दादांचेवरून केलेली आरती शेवटी दिली आहे. )

* * *

कलाप्पा कऱ्हाडे या नावाचे कोल्हापूर येथे शनिवारात राहाणारे गृहस्थ सांगलीला दादांचेकडे येत असत. त्यानी 'आपल्याला मुलगा केव्हा होईल ?' असे एकदा विचारले. तेव्हा 'अरे तुला मुलगा होईल. आशीर्वाद आहे जा' असे देवाने सांगितले.

काही दिवसानंतर त्याची बायको एकाएकी खूप आजारी पडली. तिच्या अंगावरून जाऊ लागले. ती अगदी अत्यवस्थ झाली. आता डॉक्टर, वैद्य आणण्याशिवाय गत्यंतर नाही असे घरातले लोक सांगू लागले.

तेव्हा कराडे यानी, 'सांगलीला नामांकित वैद्य आहेत त्यांचेकडे जाऊन औषध घेऊन येतो' असे घरी सांगितले व ते तडक रात्री भजनाकरिता दादांचे-कडे आले.

भजनानंतर संचार होताच कराडे यानी बायकोला केव्हा बरे वाटेल असा प्रश्न विचारला. तेव्हा 'अरे मर जाती है रे' असे उत्तर मिळाले.

त्यावर कराडे म्हणाले, 'महाराज मला मुलगा होईल असा आशीर्वाद तूच दिला आहेस. आणि ही बायको मरेल असे तूच सांगतोस मग मी गरोदर राहून मला मुलगा होणार आहे काय ?'

तेव्हा हे बोलणे ऐकून स्वारी हसू लागली. व म्हणाली 'औषध दे म्हणजे बरे होईल जा.'

त्यावर कराडे म्हणाले 'मी औषध मुळीच देणार नाही. तुझ्या सामर्थ्यावर बरी कर. तेवढ्यासाठी कोल्हापुराहून इथपर्यंत मी आलो आहे.'

तेव्हा 'अरे तू परत घरी जाईतो बायको बरी होते जारे. हा घे भंडारा मुलगाही होईल जा.' असे सांगून त्याला स्वारीने भंडारा दिला.

तो घेऊन कराडे यांनी दुसरे दिवशी दोन बाटल्यात एकात कुंकू व दुसऱ्यात भंडारा घालून त्यात पाणी घालून त्या दोन्ही बाटल्या औषधाच्या म्हणून सांगून घरात नेऊन दिल्या. व तासातासाने थेंब थेंब औषध घालण्यास सांगितले.

थोड्या अवधीतच कराडे यांचे पत्नीस बरे वाटू लागले. त्या हिंडू फिरू लागल्या.

पुढे त्यास मुलगाही झाला. त्यांनी त्याचे नाव अप्पासाहेब असे ठेवले. हे अप्पासाहेब कराडे हालसिद्धाचे भक्त असून ते दर यात्रेस अप्पाचे वाडीस येत असतात.

* * *

कुरुंदवाड येथील गुंडू बगकुद्रे हे गृहस्थ घोसरवाड येथे देवाला येत असत. ते तंबाकूचे प्रसिद्ध व्यापारी होते. त्यांना व्यापारात मोठे नुकसान येऊन त्यांचे

घरदार लिलाव झाले. त्यांच्या दोन मुलींची लग्ने झालेली होती त्यांचे नवरे अकस्मात वारले.

आपत्तीवर आपत्ती येऊ लागल्या तेव्हा वणकुद्रे घोसरवाडास दर अमावास्येस देवास येऊ लागले. घोसरवाडला एका यात्रेच्या वेळी दादांना संचार झाला असता ते देवाला विनंती करू लागले की, 'महाराज, या विपन्न परिस्थितीमधून मला बाहेर काढा.' त्यावर दादांनी त्याला समोर बोलावून विचारले, 'अरे तुझ्याकडे येडूर येथील वीरभद्राची मूर्ती गहाण म्हणून आणून ठेवली होती काय बोल? ती मूर्ती तू वितळवून टाकली आहेस की नाही सांग?'

जमलेल्या लोकांपुढे मूर्ती वितळवून टाकली आहे हे सांगण्याचे वणकुद्रे टाळाटाळ करू लागला व त्याने मुद्दामच 'नाही, नाही' असे उत्तर दिले. त्यावेळी यात्रेस त्याची पत्नीही आलेली होती. तिचे अंगी एकदम जोरात संचार झाला व ती नाचत नाचत वीरासन घालून दादांचे पुढे येऊन बसली. व 'अरे याने माझा मुखवटा मोडलेला आहे हा खोटे बोलतो. माझा चमत्कार मी त्याला दाखवला असतानाही न जुमानता त्याने मुखवटा वितळवून टाकला. त्याचा आता नर्ष्टांश केल्याशिवाय राहणार नाही' असे ती म्हणू लागली.

'हा संचार वीरभद्राचाच असेल तर देवाचे गुंड खेळून दाखव' असे दादांनी तिला सांगताच संचारावस्थेत एखाद्या चांगल्या झाडाप्रमाणे ती गुंड खेळली.

सर्व प्रकार पाहून वणकुद्रे याला पश्चाताप झाला व 'महाराज माझे हातून चूक झाली. धनलोभाने मी असा वागलो. आपण मला क्षमा करावी व मार्ग दाखवावा, अशी त्याने प्रार्थना केली.

'अरे होता तसाच वीरभद्राचा मुखवटा तयार करून बसव म्हणजे तुझा त्रास कमी होईल' असे त्याला दादांनी सांगितले. तेव्हा वणकुद्रे म्हणाले महाराज 'माझी परिस्थिती तर सध्या अगदि खालावलेली. मुखवटा तयार करायला पैसे कुठून आणू?'

त्यावर संचारातच दादांनी त्याला सांगितले, 'मडगावला जा. तिथे तुझ्या एका मित्राकडून पाच हजार रुपये कर्ज मिळेल. त्यातून व्यापार कर.

नक्की फायदा होईल. फायदा हाती येताच आधी मुखवटा कर. परिस्थिती सुधारेल बा !'

त्याप्रमाणे वणकुद्रे भंडारा घेऊन मडगावला गेले. तेथे एका जुन्या व्यापारी मित्राने त्यांना पाच हजार रुपयांची मदत केली. त्यातून त्यांनी पुढे व्यापार केला. त्यात त्यांना फायदाही झाला. वचन दिल्याप्रमाणे वीरभद्राचा मुखवटा करून ठेवताच त्यांची परिस्थिती पूर्वीप्रमाणे सुधारली.

हालसिद्धनाथांचे सांगण्याने आपले पूर्वीचे वैभव आपल्याला लाभले यासाठी त्यांनी देवाला चांदीचे मोर्चेले करून वाहिले होते.

* * *

या अनुभवामुळे गुंडू वणकुद्रे व त्यांची मित्रमंडळी घोसरवाडास अमावस्येस येऊ लागली. श्रीपतराव कुलकर्णी, गावकर, हरिभाऊ फाटक, कुरुंदवाडकर राणीसाहेबांचे बंधू मामासाहेब काळे अशी अनेक मंडळी त्यांत प्रमुख होती.

कुरुंदवाडकरांना त्यावेळी अपत्य नव्हते. तेव्हा महाराजांना मुलगा केव्हा होईल असे मामासाहेबांनी संचाराचे वेळी विचारले.

तेव्हा एकदा संचारात 'अरे, घाटावरचा गणपती वाड्यात शिरलायरे जा' असे सांगून त्यांनी भंडारा दिला.

त्याच वर्षी कुरुंदवाडकरांना मुलगा झाला.

* * *

कारिकोळ येथील देवीची पालखी घोसरवाड, कुरुंदवाड येथे आली होती. या पालखीचे वैशिष्ट्य असे असते की देवाची इच्छा असेल त्याच मार्गाने ती धावत जाते.

एकदा ही पालखी कुरुंदवाडकर सरकारांचे वाड्यातच शिरली. पालखीबरोबर दादा होते. दादांना तेथे संचार झाला व खेळण्यासाठी हत्यार मागू लागले. नरवणे या आडनावाचे एक फौजदार तेथे होते. देवाच्या खेळाची परीक्षा पाहण्यासाठी त्यांनी कोरे करकरीत पाते असलेली धारदार तलवार मुद्दाम काढून खेळावयास दिली.

दादांचा त्यावेळी हत्याराचा खेळ फारच जोराचा झाला व हत्यार परत करतांना ते म्हणाले 'अरे सहा महिन्याचे आत या फौजदाराला हद्दपारी होईल बा !'

नरवणे फौजदार हे श्रीमंतांच्या नात्यातील गृहस्थ होते. त्यामुळे त्यांचे सर्वत्र अधिकार चालत असत. त्यांचे विरुद्ध कोणीच काही करू शकत नसत. म्हणून ते गर्वाने म्हणाले 'माझी हद्दपारी होणे शक्यच नाही !'

परंतु पुढे सहा महिन्यात अशा अनेक घटना घडत गेल्या की त्यात नरवणे गुरफटतच गेले. अनेक आरोप त्यांचेवर झाले. फिर्याद आले. व खुद्द अण्णासाहेबांनीच त्यांस हद्दपारीचा हुकूम काढून हाकलून लावले.

* * *

कुरुंदवाडकर सरकारांचेकडे सोनीकाका नावाचे एक कारभारी होते.

एकदा गुंडू वणकुद्रे यास, अरे सोनीकाकाकडे जाऊन अमूक अमूक तारखेस तुला नोकरीवरून काढून टाकतील असे सांग ' – अशी आज्ञा झाली.

कारभाऱ्याकडे जाऊन ही गोष्ट कशी सांगावी ? या विचाराने वणकुद्रे यानी प्रथम थोडी टाळाटळा केली. दोन तीनदा असाच हुकूम झाला पण वणकुद्रे कारभाऱ्याकडे गेले नाहीत. तेंव्हा 'आता जाऊन सांगतोस की तुझ्या मागे घोडा सोडू ? ' असे विचारले. तेंव्हा गुंडू वणकुद्रे यांनी समक्ष सोनीकाकांना जाऊन सांगितले.

सोनीकाकांनी ती तारीख आपल्या डायरीत टिपून ठेवली व देवाचे सांगणेची प्रचीति पाहाणेचे ठरविले.

काही दिवस गेले. देवाने सांगितलेल्या दिवशी सोनीकाका नोकरीवरून कमी झाले नाहीत. तेंव्हा त्यानी गुंडू वणकुद्रे यास बोलावून आणले व 'अरे काय तुझा देव सांगतो ? मी तर नोकरीवर आहेच की ! ' असे उद्गार काढले.

त्याच दिवशी गुंडू वणकुद्रे घोसरवाडला दादांचेकडे भजनासाठी आले. भजन होताच दादांना संचार झाला तेंव्हा वणकुद्रे म्हणाले, 'तीन तीनदा हुकूम देऊन कारभाऱ्याकडे जाऊन निरोप सांगण्यास सांगितलेस. त्याप्रमाणे तारीखवार निरोप सांगून आलो. सोनीकाका तर नोकरीवर राहिलाच. उगाच तुझ्या शब्दाला वाईटपणा आणि माझ्यासारख्या गरिबाला संकट अशी तोंडफोड कशासाठी केलीस ? '

तेंव्हा हसत हसत देवाने सांगितले ' अरे, फक्त दोन दिवस त्याच्या नोकरीची मुदत वाढलीय रे ! दोन दिवसानंतर नोकरीवरुन नक्की जातोय बघ. ' त्याप्रमाणे गुंडू वणकुद्रे परत कुरुंदवाडास येऊन दोन दिवसात काय काय घडते ते पाहात राहिले.

एक दोन दिवसातच वाड्यात काही घटना घडल्या व राणीसाहेबांनी आजच्या आज सोनीकाकास नोकरीवरून काढून टाका असा हट्ट धरून त्यास तडकाफडकी काढून टाकले.

सांगितल्याप्रमाणे देवाचे शब्द खरे ठरले.

*　　*　　*

काशिनाथ उर्फ आण्णा भटजी हे अधूनमधून देवास येत असत. त्यांना पहिल्या पत्नीपासून दोन मुलगे व दुसऱ्या बायकोपासून एक मुलगा व एक मुलगी अशी चार अपत्ये होती.

अकस्मात एकापाठोपाठ एक असे त्यांचे तीनही मुलगे मरण पावले. तेंव्हा अतिशय दुःखी होऊन ते देवाकडे आले. व संचार झाल्यावर ' देवा माझ्या घर ही आपत्ती का आणलीस ? ' असा प्रश्न केला.

' अरे दुसऱ्याचा नाश करण्यासाठी श्रावणाचा जप केलास की नाही बोल ? तोच जप तुझ्यावर उलटला आणि तुझा नाश झाला. हे खरे की नाही बोल ? ' महाराजांनी संचारात असे खडसून विचारताच आबा भटजींनी असा जप केल्याचे कबूल केले.

*　　*　　*

घोसरवाड येथील छंदाला कंटाळून नाथमहाराज अप्पाचीवाडी येथे आले. प्रारंभी ते निपाणीच्या आसपास हिंडत फिरत होते. निपाणीकर सरकारांच्याकडे अनेक गाई होत्या. गुराख्याच्या रूपाने गायी राखण्याचे काम करीत महाराजांचे या भागात वास्तव्य होते.

महाराजास भूक लागताच गायींच्या स्तनांतून दुधाच्या धारा आपोआप सुरू लागत. ते दूध प्राशन करून महाराज राहात होते. हा चमत्कार इतर नोकरांनी पाहिला व त्यांनी निपाणीकरांकडे चहाड्या केल्या. तेंव्हा सरकारांनी या गुराख्याकडील दुभत्या गायी काढून घेतल्या व त्याला दूध न

देणाऱ्या भाकड गायी राखण्याचे काम दिले. पण आश्चर्य असे की या गायीसुद्धा महाराजांची भुकेची वेळ होताच पान्हा सोडू लागल्या.

हे चमत्कार पाहून महाराजांची परीक्षा पाहाण्याकरिता एका नोकराने तांब्याभर रुईचा चीक काढून आणून 'दूध घ्या' म्हणून महाराजांपुढे आणून दिला. महाराजांनी तो पिऊन टाकला.

यापुढे या भागात आपले वास्तव्य अप्पाचेवाडी येथेच करावयाचे ठरवून चिखलीवरून ते अप्पाचे वाडीस जाणेस निघाले. वाटेत वेदगंगा नदी लागते. त्यावेळी नदीस पूर आला होता. पलिकडे नावेशिवाय जाणे शक्य नव्हते. त्यानी नावाड्यास हाक मारुन पलिकडे पोहोचविण्यास सांगितले. त्यावेळी त्याने नकार दिला. तेव्हा महाराजांनी आपल्याजवळचे घोंगडे पाण्यावर टाकले व त्यावर बसून ते पैलतीराला गेले.

या चमत्काराने त्यांचा आसपास सर्वत्र लौकिक झाला. अप्पाचेवाडी येथे सध्या जेथे सदर आहे तिच्या मागच्या बाजूस ते समाधी लावून बसत असत. असंख्य गोरगरीब, शेतकरी त्यांचे दर्शनास येत असत. त्याच जागेवरून त्या लोकांच्या प्रश्नांचा न्याय निवाडा महाराज करीत असत. धर्म सांगत. भक्ति-मार्गाचा उपदेश करीत. [ अप्पाचेवाडी येथेही शेजारीच मरुळसिद्ध व भागूबाई यांची स्थाने आहेत. ]

पुढे निपाणीकरांना अप्पाचेवाडी येथील महाराजांची कीर्ती समजली व ते महाराजांचे सेवक बनले. निपाणीकरांना पुत्र संतान नव्हते. त्यासाठी ते अप्पाचे-वाडी येथे येऊन महाराजांची सेवा चाकरी करीत. 'ज्याची जगभर कीर्ति होईल असा पुत्र आम्हाला द्या' अशी मनोभावे ते प्रार्थना करीत. त्याप्रमाणे महाराजांचे आशीर्वादाने निपाणीकरांना मुलगा झाला तेव्हा त्याचे नाव त्यांनी अप्पासाहेब असे ठेवले.

जोतिबा हे महाराष्ट्रातले सर्वात प्रसिद्ध तसेच प्राचीन दैवत आहे. एकदा या देवालयामधील मूळ लिंग मूळ ठिकाणापासून बाजूस सरकले. ते आपल्या पूर्वीच्या ठायी जावे यासाठी असंख्य भक्तानी जपतप अनुष्ठाने केली पण काही उपयोग झाला नाही. हिंदुस्थानामधले अनेक राजेराजवाडे येथे जमले व आपल्या पूर्वपुण्याईवर पाणी सोडून 'मूळ स्थानी या लिंगाने बसावे, अशी प्रार्थना

करू लागले. तरीही काही उपयोग झाला नाही. ही वार्ता निपाणी येथील अप्पासाहेब सरकारांना कळली. तेव्हा ते प्रथम अप्पाचेवाडी येथे गेले व हे काम करण्याविषयी महाराजांकडून परवानगी घेतली.

महाराजांनी त्यास ' तुझ्या हस्ते लिंग मूळ स्थानी बसेल ' असा आशीर्वाद दिला. पण तेथे जमलेले लोक तुझी मिरवणूक काढतील ती काढून घेऊ नको असेही सांगितले.

अप्पासाहेब निपाणीकर जोतिबास गेले व त्यांनी लिंगाची पूजा करून मूळ ठिकाणी बसण्याबद्दल प्रार्थना करताच जोतिर्लिंग पूर्वीच्या ठिकाणी आपोआप जाऊन बसले.

अप्पासाहेब निपाणीकरांचे हातून हे अलौकिक कृत्य घडलेले पाहाताच जमलेल्या राजेरजवाड्यांना अतिशय आनंद झाला व त्यांनी अप्पासाहेबास उचलून अंबारीत घातले व त्याची मोठी मिरवणूक काढून सोहळा साजरा केला.

अप्पासाहेब नाथमहाराजांकडून परवानगी घेऊन गेल्यावर महाराजांनी इकडे आपल्या समाधीची सर्व व्यवस्था करून घेतली. तिकडे जोतिर्लिंग स्थानापन्न होताच इकडे आपण समाधी घेतली.

अप्पासाहेब जोतिबाहून परत येताच त्यांना ही हकिगत समजली व ते दर्शनासाठी तातडतोब आले. महाराज्याच्या जागी समाधीस्त झाले होते ती जागा उकरू लागले. तेव्हा महाराजांनी त्यास दृष्टांत देऊन उकरणे बंद कर असे सांगितले. समाधी अवस्थेत राहूनच या ठिकाणी येथून पुढे भक्तोद्धाराचे काम करीन असे सांगितले.

पुढे निपाणीकरांनी येथील समाधीस्थानास व देवस्थानास इनामे देऊन पूजा अर्चेची व्यवस्था केली.

जोतिबा व अप्पाचीवाडी येथील यात्रेत समान वैशिष्ट्य आहे. हस्त नक्षत्रावर जोतिबाची पालखी फिरते. त्याच नक्षत्रावर इकडे महाराजांनी त्याच वेळी समाधी घेतली आहे. त्याच तिथीला व नक्षत्रावर अप्पाचीवाडी येथे घुमटात समाधीवर गलिफ घातला जातो व मोठा उरुस होऊन प्रसाद वाटला जातो.

महाराजांनी समाधी घेण्यापूर्वी आपल्या भक्तांना बोलावून दूध पिण्याची सोन्याची वाटी, हातातील काठी, भंडाऱ्याची पिशवी, आपले कांबळे, निशाण

एकेकास दिले व संभाळून ठेवण्यास सांगितले. तसेच या भक्त घराण्यांना यात्रेतील मानमरातब ठरवून दिले.

अप्पाचीवाडी येथील अप्पा खोत (वड्डु) यांचे घरी देवाचे कांबळे, भंडाऱ्याची पिशवी, दुधाची सोन्याची वाटी मिळालेली असून त्यांना येथे मोठा मान आहे.

महाराजांनी आपल्या समाधीसाठी जागा अगोदरच निश्चित करून तेथे मुसल्मानी दर्ग्यासारखा घुमट बांधून घेतला होता. त्याचा ताम्रपटात उल्लेख आहे. पुजारी, बोते, दिवटे, कमते, मुल्ला वगैरे सर्व सेवेकऱ्यास उत्पन्ने कायमची दिलेली आहेत.

* * *

हालसिद्धनाथ महाराज मनुष्यरुपाने संचार करीत असता ते काही काळ कंकणवाडी येथे वास्तव्य करून होते. त्यांचे बरोबर नेहमी गायी असतच. या गायींपैकी गंगा आणि गौरा या दोन गायी चरत चरत एकदा हुक्केरीचे भागात गेल्या. त्या चांगल्या धष्टपुष्ट गायी पाहाताच तेथील मुसल्मानांनी पकडून त्यांना ठार मारले व मांस शिजत घातले.

इकडे महाराजांनी अंतर्ज्ञानाने सर्व प्रकार ओळखला व हुक्केरी येथील फकिरास आपणापुढे बोलावून घेतले व गायींची चौकशी केली. तेव्हा ते फकीर घाबरून गेले व गयावया करून प्रार्थना करू लागले.

महाराजांनी त्यांना क्षमा केली व आपल्या आवडत्या गायींना 'गंगा, गौरा' अशी हाक मारली. त्या हाकेबरोबर गायी जिवंत होऊन महाराजांचे-पुढे हजर झाल्या. हा चमत्कार पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले व महाराजांचे सेवक बनले. हुक्केरी येथील फकिरांचा अप्पाचेवाडी येथील उरुसात मान असतो. त्याप्रमाणे हे फकीर अप्पाचेवाडीस दर यात्रेत (उरुसात) येऊन देवाची सेवा करून जातात.

* * *

हालसिद्धनाथ महाराज पूर्वी जेथे ध्यानस्थ बसत असत ती जागा पूर्वी जंगलमय होती. वाघापूर येथील भक्त मंडळी या जंगलातील पाय वाटेने महाराजांचे दर्शनासाठी येत जात. यापैकी एका भक्ताचे घराण्यावर

महाराजांनी पूर्ण कृपा केली व सांगितले की 'मी समाधी घेतल्यानंतर अप्पाचे-वाडी येथे या जागी यात्रा भरू लागेल. या यात्रेत येथे येऊन तू भाकणूक करीत जा. तू जे सांगशील ते ते खरे होईल.'

त्याप्रमाणे अप्पाचीवाडी येथे अश्विनी नक्षत्रावर नवरात्र बसवून कर बांधली जाते व मृग नक्षत्रावर यात्रा फुटते व रोहिणी नक्षत्रावर भाकणूक होते. भाकणूक म्हणजे भविष्य कथन. वाघापूरच्या भक्ताला यावेळी देवाचा संचार होतो व तो पुढे घडणाऱ्या विशेष भविष्याचे सूचक मार्गदर्शन करतो. तसेच धनधान्य, पाऊसपाणी, रोगराई, लढाई, सामाजिक, राजकीय परिस्थिती याबाबतही सांगितले जाते. प्रामुख्याने शेतकरी भक्तांचेसाठी ही भाकणूक असते. आपला अवतार होताच रेवणनाथ महाराज प्रथम सहनसारूक या शेतकऱ्याकडे वाढले. म्हणून त्यास शेतकरी वर्ग प्रिय असावा.

त्याचप्रमाणे रोहिणी नक्षत्रावरच भाकणूक का याचाही थोडा अधिक विचार करता येतो तो असा:—

रोहिणी, हस्त, श्रवण ही देव नक्षत्रे आहेत. या नक्षत्रावर कोणत्याही चांगल्या गोष्टी बोलल्या, केल्या असता फलदायी होतात.

तसेच थोर साधुसंत आपल्या जन्म नक्षत्राच्या दहाव्या नक्षत्रावर समाधी घेतात. हालसिद्धनाथ महाराजानी हस्त नक्षत्रावर समाधी घेतलेली आहे. यावरून त्यांचे जन्म नक्षत्र रोहिणी हेच असावे.

भगवान श्रीकृष्णही रोहिणी नक्षत्रावरच जन्मास आले. याही बाबतीत श्रीकृष्ण व हालसिद्धनाथ यांचेतील साम्य ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

भगवान श्रीकृष्ण हे आठवा अवतार तर रेवणनाथ महाराज हेही नाथ परंपरेतील आठवा अवतार.

श्रीकृष्णाला घोंगडी, पावा, दूध, गाय, बाल्गोपाळ अत्यंत प्रिय त्याप्रमाणेच रेवणनाथ महाराजासही घोंगडी, पावा, दूध, गाय, बाल्गोपाळ या गोष्टी प्रिय.

श्रीकृष्णाचे बालपण अनेक खडतर परीक्षातून व दिव्यामधून गेले. पण अखेरी सर्वावर मात करून, दुष्टांचा संहार करून, साधूसंताचे संरक्षण करून श्रीकृष्णाने धर्म संस्थापनेचे कार्य केले. त्याप्रमाणेच रेवणनाथ महाराजांनाही अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या व दुष्ट शक्तींचा पराभव करून

त्यानीही गोरगरीब भक्तांचा उद्धार केला व त्याकाळात धर्म संरक्षणाचेच कार्य केले.

या विवेचनाचे ओघातच आणखीही काही गोष्टींचे स्पष्टिकरण सांगता येईल.

रेवणनाथ महाराजांना भंडारा अत्यंत प्रिय आहे. तो या संप्रदायाचे बोधचिन्हच आहे. भंडाऱ्याचा रंग पिवळा आहे. गुरु मंडळाचा रंग पीत-पिवळा असतो. तो शुद्ध सत्वगुणी रंग आहे. नाथ परंपरेत गुरुमंडळास सर्वात अधिक महत्त्व आहे.

हालसिद्ध नाथास ढोल, झांजा, पावा ही वाद्ये प्रिय आहेत. विशेषतः ढोलांचा आवाज फार आवडतो. यात्रेच्यावेळी, पालखीचेवेळी शेकडो भक्त ढोल वाजवीत असतात.

ढोलाचे नादात ब्रह्मनाद सामावलेला आहे. तोच अनहत नाद असल्याने इतर सर्व नाद त्यात लुप्त होऊन जातात. अहं ब्रह्म, तद् ब्रह्म असाच ध्वनी त्यातील प्रत्येक ठेक्यातून निर्माण होतो. लक्षपूर्वक त्या आवाजाकडे मन एकाग्र केल्यास लय आपोआप लागते. ढोल वाजविणे हा नाथ सेवेचाच एक मार्ग आहे.

* * *

हालसिद्धनाथ महाराज सदेह अवतारकार्य करीत हिंडत असता त्यांनी रायबाग येथील धनगर घराण्यावर कृपा केली. व अप्पाचीवाडी येथील यात्रेत तुझा मान राहील असा आशीर्वाद दिला.

त्याप्रमाणे रायबाग येथील धनगरांना दुधाची घागर आणून यात्रेची कर बांधण्याचा व तोडण्याचा मान आहे.

काही ठिकाणाहून गायीचे व बकरीचे दुधाची घागर यात्रेचे वेळी आणणेची त्या त्या गावांची प्रथा आहे. हे दूध आणत असता ठराविक ठिकाणी आपोआप उतू जाते. या नवापविता आपोआप उतू जाणाऱ्या दुधावरून व त्या जागावरून शुभ अशुभ फले वर्तविली जातात व ती खरी ठरतात. असो, याप्रमाणे हालसिद्धनाथ महाराजानी आपल्या हयातीतच यात्रेचेवेळी, रायबाग येथील धनगरांना कर बांधणेचा व वाघी-वाघापूर येथील भक्तास भाकणूक करणेचा मान दिलेला आहे. या परंपरा आजतागायत चाललेल्या आहेत.

अप्पाचीवाडी येथे हालसिद्धनाथ महाराज आपले वास्तव्य करून राहिले. लक्ष्मण वेंकाण्णा खोत यांचे पूर्वजांचेकडे ते एकदा साधूच्या वेशाने भिक्षेसाठी दुपारचे वेळी आले. त्यावेळी खोत घराण्याची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. जेवणाखाण्याची त्यांना भ्रांत पडलेली असे. कसे तरी मोलमजुरी कष्ट करून ही माणसे पोट भरीत.

दुपारचे वेळी साधूमहाराज भिक्षेसाठी आलेले आहेत. त्यास काही तरी भिक्षा घातली पाहिजे म्हणून घरच्या मंडळींनी धान्य वगैरे पाहिले तो काहीच शिल्लक नव्हते. घराच्या परसदारी चार मक्याची धाटे आली होती त्यास कणसे डोलत होती. ती कोवळी कणसे काढून, चेचून, त्यात थोडे दूध घालून ते अन्न त्यांनी साधूस आनंदाने वाढले. हा त्यांचा भक्तिभाव पाहून हालसिद्धनाथास आनंद झाला. महाराजांनी आपल्या झोळीतून मूठभर नाचणे काढून त्यास प्रसाद म्हणून ओटींत घातले व येथून पुढे तुमची भरभराट होईल असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे खोत घराण्याची पुढे चांगली भरभराट झाली. आज अप्पाचेवाडी येथील सधन शेतक-यांपैकी ते एक असून दर तीन वर्षांनी ते भंडारखाना आनंदाने घालत असतात.१

* * *

महाराजांच्या आशीर्वादाने व प्रसादाने खोत घराण्याचा उत्कर्ष होऊ लागला. या घराण्यातील पूर्वजापैकी एकास सरकारी गुन्ह्यात गोवण्यात आले. त्याला अटक करून पायात लोखंडी बेड्या अडकवून तुरुंगात टाकण्यात आले. हा गृहस्थ नाथमहाराजांचा भक्त होता.

आपणाला या कटात विनाकारण गोवण्यात आले याचे त्याला फार दुःख होत असे. पुढे यात्रा जवळ आली तेव्हा आपल्या दुर्दैवाने यंदा यात्राही चुकणार म्हणून तो शोक करू लागला व देवा मला यात्रेत तुझे दर्शन घडू दे म्हणून प्रार्थना करू लागला.

इकडे यात्रेच्या आधले रात्री त्याच्या पायातील खोडा आपोआप तुटला तुरुंगाची दारे आपोआप उघडली गेली व तो तेथून पळत सुटला तो थेट अप्पाचीवाडी येथे यात्रेच्या वेळी बरोबर येऊन हजर झाला. त्याच्या पाया-बरोबर अर्धी तुटून आलेली बेडी अद्यापि खोतांचे घरी देव्हाऱ्यावर आहे.

पुढे या गुन्ह्याची चौकशी झाली पण त्यात खोतें घराण्यातील या इसमाचे नावदेखील कोठे आले नाही.

* * *

एके वर्षी यात्रेच्या वेळी कर बांधण्याच्या तिथी दोन पडल्या. त्यामुळे रायबागच्या लोकांना कोणत्या दिवशी कर बांधण्यास जावे याचा संभ्रम पडला. दुसरे दिवसाचीच तिथी खरी असे मानून ते त्याप्रमाणे तयारीने आपल्या गावाहून निघाले.

इकडे अप्पाचेवाडीचे पुजाऱ्यांनी पंचांगातील पहिली तिथी बरोबर मानून यात्रेची सिद्धता केली होती त्याप्रमाणे सर्व तयारी करून रायबागच्या मानकऱ्यांची ते वाट पाहू लागले. कर बांधण्याची वेळ टळून चालली तरी रायबागच्या मानकऱ्यांचा पत्ता नाही! तेव्हा कर कोणी बांधावी याची चर्चा सुरू झाली व शेवटी आपल्याच पुजाऱ्याने कर बांधावी असा निर्णय गावकऱ्यांनी घेतला.

तेवढ्यात एक गोरापान उंचापुरा धनगर डोक्यावर घोंगड्याची खोळ (नारळाचे तोरण व खांद्यावर दुधाची घागर) घेऊन गडबडीने तेथे आला. मी रायबागहून आलो. आमचे बाकीचे लोक मागून येत आहेत. वेळ झाला म्हणून मी पुढे आलो असे सांगून दुधाची घागर ठेवून कर बांधून तो निघून गेला. गावकऱ्यांनी मग देवाची आरती वगैरे केली यात्रेला आरंभही झाला.

काही वेळाने रायबागचे मानकरी तेथे येऊन हजर झाले. पाहातात तो कर बांधून आरतीही झालेली! आमचा मान पुजाऱ्यांनी मुद्दाम डावलला म्हणून ते सर्वजण वाद घालू लागले. भांडण जोरात होण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा पुजाऱ्यांनी त्यांना घडलेली हकिगत पुनःपुन्हा सांगून ती दुधाची घागर दाखवली! तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटले. आपलीच तिथी चुकीची होती हे कळून त्याना पश्चात्ताप झाला. देवानेच धनगराचे रूपाने येऊन कर बांधून यात्रा सुरु करून दिली होती हे सगळ्यांना आपोआप समजले!

* * *

अप्पासाहेब निपाणीकर यांचे घराण्याशी या देवाचा संबंध असलेने नवरात्रात देव त्यांचे घरी येतात. त्यावेळी त्यांचा आहेर असतो. तसेच कुर्ली येथे

अप्पया शिंत्रे हे मोठे हालसिद्ध भक्त होऊन गेले. मूळ अप्पासाहेब निपाणीकरच या घराण्यात जन्माला येईल असे देवाने सांगितले होते. म्हणून शिंत्रे घराण्यालाही अप्पाचीवाडी येथे मान आहे. हालसिद्धनाथाची यात्रा शिंत्रे मोठ्या उत्साहाने साजरी करतात.

* * *

अप्पाचीवाडी येथे भीमाबाई नावाची एक स्त्रीभक्त होऊन गेली. अथणी तालुक्यातील मोळे येथील तिचे घराणे. ही बाई लिंगायत होती. हिचे अगदी लहानपणीच लग्न झाले होते. तथापि बालपणापासूनच तिचे मन परमार्थाकडे लागले होते, समजू लागल्यापासून तिने पंढरपूरची वारी धरली होती. वयात येताच संसार बंधनात पडण्याऐवजी तिने आपल्या नवऱ्याचे दुसऱ्या एका मुलीशी लग्न लावून दिले व आपण परमार्थसाधना करीत राहिली. अप्पाचीवाडी येथे जाऊन राहण्याबद्दल तिला पुढे दृष्टांत झाला. त्याप्रमाणे आपल्या घर-प्रपंचाचा त्याग करुन, संन्यास घेऊन, पुरुष वेश धारण करून ही भीमाबाई अप्पाचेवाडी येथे सेवेसाठी येउन राहिली.

तिने नाथमहाराजांच्या समाधीजवळच आपला मठ बांधला. समाधीची आसपासची जागा लोटून झाडून ती स्वच्छ करी. तिने शंभर दीडशे गायी देखील पाळल्या होत्या. आल्या गेल्या भक्ताची जेवणाखाणाची सोय करणे, गायीगुरांना वैरणपाणी करणे, समाधी व मठाची व्यवस्था करून नाथांचे स्मरण करणे असा तिचा नित्य क्रम होता. भीमाबाईला परमेश्वर कृपेमुळे वाचासिद्धीही प्राप्त झाली होती.

एकदा अप्पाचे वाडीस नाथांचे दर्शनास कागलचे बापूसाहेब सरकार (सीनिअर) हे आले होते. त्यांना मुलगा नव्हता. ' अरे, महाराजांच्या या गायींना चरण्यासाठी कुरण दे म्हणजे तुला मुलगा होईल' असे भीमाईनी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी गायींसाठी कुरण दिले व पुढे त्यांना मुलगा झाला.

* * *

गोविंदपंतदादा यांना अप्पाचीवाडी येथे जाण्यासाठी हुकूम झाला. त्याबरोबर ते अप्पाचेवाडीस घोड्यावरून निघाले. यापूर्वी ते अप्पाचेवाडीस आलेले नव्हते त्यामुळे प्रथम रस्ता चुकून शेजारच्या दुसऱ्या गावीच गेले. पुन्हा तेथून

परतून चौकशी करीत करीत अप्पाचेवाडीस रात्री एक-दोनचे सुमारास येऊन पोहोचले. तेथे येताच त्यांनी देवदर्शन वगैरे घेतले. ओळखपाळख कोणाचीही नव्हती. त्यामुळे समोरच्या धर्मशाळेत घोंगडी टाकून ते न जेवताखावा झोपी गेले.

इकडे भीमाबाईंचे मठामध्ये भीमाबाईच्या बहिणीचा मुलगा कृष्णा (हल्लीच्या भीमाचे वडील ) गायी राखण्यासाठी भीमाबाईने आपल्याजवळ ठेऊन घेतला होता. त्याचे वय १०।१२ वर्षाचे होते. तो भीमाबाईजवळच झोपला होता. तो झोपेतच 'भीमाबाई, माझा भक्त आला आहे त्याची व्यवस्था कर की. माझ्या घोसरवाडच्या भक्ताची व्यवस्था कर की' असे बोलू लागला. त्याचे बडबडणे ऐकून भीमाबाई उठली व तिने कृष्णास जागे करून 'तू काय सांगतो आहेस?' असे विचारले. त्यावर 'मी तर झोपलोच आहे मला काहीच माहीत नाही!' असे सांगून तो पुन्हा झोपी गेला. घोरू लागला व लगेच वर सांगितल्याप्रमाणे पुनःपुन्हा सांगू लागला. तेव्हा भीमाबाईने उठून धर्मशाळेत जाऊन 'घोसरवाडचे कोणी आले आहे काय?' अशी चौकशी केली.

तेव्हा घोसरवाडहून गोविंदपंतदादा आलेले तिने पाहिले. मध्यानरात्र झालेली. या ब्राह्मणास आता काय खावयास द्यावे? असा विचार ती करू लागली त्याचवेळी कृष्णाचे तोंडून पुन्हा 'शिंक्यावर दुधाचा तांब्या आहे ते दूध दे की' असे उद्गार ऐकले. तिने गडबडीने मठात जाऊन पाहिले खरोखरीच शिंक्यावर दुधाचा एक तांब्या चुकून शिल्लक राहिला होता. वास्तविक भीमाबाई शिल्लक राहिलेले सर्व दूध विरजून टाकीत असे. आजच एक तांब्या शिल्लक राहिलेला पाहून तिलाही नवल वाटले. तिने गोविंदपंत दादांना उठवले व दूध प्यावयास दिले.

ही दादांची अप्पाचेवाडीस पहिली भेट होय. याचवेळी त्याना यात्रेस न चुकता येण्याचा आदेश मिळाला.

*     *     *

या नाथमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे गोविंदपंतदादा अप्पाचेवाडीस यात्रेस येऊ लागले. तेथेही त्यांचा हत्याराचा खेळ सुरू झाला.

कुरली येथील गावकामगार पाटील याना हत्यार खेळावयास देणेचा मान आहे.

फर तुटल्यानंतर हत्यार खेळावयास देण्याची येथे प्रथा नव्हती. परंतु एकदा बेकाण्णा खोतांचे घराजवळ पालख्या येताच दादांना संचार झाला व ते खेळण्यासाठी हत्यार मागू लागले. 'फर तुटल्यावर हत्यार देण्याची पद्धत नाही' म्हणून पुजारी खेळावयास हत्यार देईनात तेव्हा रस्त्यात पडलेला एक मोठा दगड घेऊन तो डोकीत मारून घेऊन दादा खेळू लागले. तेव्हा मात्र सर्वजण घाबरले व त्यांचेपुरते हत्यार खेळावयास देण्यात आले. जोरात खेळ झाला. तसेच येथे गुंड खेळण्याची प्रथा नव्हती. तेव्हा दादांनी घोसरवाडहून अमावस्येय शास्त्रोक्त पद्धतीने एका चांगल्या लोहाराकडून अंघोळ पूजा करून शुचिर्भूतपणे गुंड तयार करवून घेतले. व ते गुंड येथे आणून दिले. त्याप्रमाणे येथे हत्यार व गुंड असा दुहेरी खेळ सुरु झाला.

पुढे अनेक चमत्कार घडून आले व गोविंदपंतदादा यांना येथे हत्यार खेळण्याचा पहिला मान मिळाला. त्याप्रमाणे जवळ जवळ पन्नास पंचावन्न वर्षे त्यांनी देवाची सेवा केली.

* * *

अप्पाचीवाडी येथे आवणे नावाचा एक पैल्वान होता. तोही देवाचा भक्तच होता. पण दादांच्या गुंड खेळाबद्दल त्याच्या मनांत संशय निर्माण झाला व 'गोविंदपंतदादा गुंड खेळतात तसे मी ही खेळून दाखवतो. त्यात काय अवघड आहे ?' असे म्हणून त्याने दादांचेप्रमाणे आपल्या पाठीवर गुंड मारून घेतले. दादांनी त्यानंतर संचारात आपल्या डोक्यात गुंड मारून घेण्यास सुरवात केली. तो खेळ पाहाताच आवणे गुंड टाकून पळून गेला.

पुढे लगेच त्याच्या सर्वांगावर फोड उठले. त्या जखमांतून रक्त पू वाहू लागले. औषध घेईल तसे त्या जखमा अधिकच वाढू लागल्या. महाव्याधी झाल्याप्रमाणे त्याची अवस्था झाली.

तेव्हा त्याला फार पश्चाताप झाला. 'देवा माझे हातून चूक झाली. माझ्या अपराधांबद्दल क्षमा कर.' म्हणून तो प्रार्थना करू लागला. तेव्हा त्याला 'एक भंडारखाना जेवण वाढून घाल व भंडारा लाव म्हणजे तुझ्या जखमा बऱ्या होतील' असे देवाने सांगितले. त्याप्रमाणे त्याने वाढून घालताच. तीन दिवसात सर्व जखमांना खपल्या पडल्या व तो बरा झाला.

* * *

गोविंदपंतदादा अप्पाचीवाडी येथे येऊ लागताच येथील हालाप्पा पुजारी (मुत्याप्पाचे वडील) व वेंकाण्णा खोत या भक्तमंडळींचे त्यांना चांगले सहाय्य झाले. त्यांचे मदतीने दादांनी अप्पाचेवाडीस यात्रेचेवेळी जेवणाचा कार्यक्रम सुरू केला.

अप्पा वेंकाण्णा खोत यांचे घरी यात्रेचे वेळी राहणेस जागा देण्याची प्रथा दादांचे कारकिर्दीतच सुरू झाली व आजपावेतो हीच प्रथा परंपरेने पुढे चालू आहे.

* * *

हालाप्पा पुजारी असतांना कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज अप्पाचेवाडीस देवदर्शनास आले. त्यांना मूलबाळ नव्हते. म्हणून त्यांनी गादीस कौल लावला त्यावेळी 'मूल होईल' असा कौल मिळाला.

नंतर राजाराम महाराजांनी वाघापुऱ्यास मुद्दाम बोलावून आणण्यास सांगितले. त्यावेळी देवाची परवानगी घेऊन छ. राजाराम महाराज व छ. सौ. ताराराणीबाईसाहेब यांचेकरिता वाघापुऱ्याने अंगी संचार झाला व त्याने भाकणूक केली. 'तुमचे घरी पाळणा हालेल' एवढेच सांगणेस हुकूम आहे असे त्याने सांगितले. त्याप्रमाणे पुढे त्यांना मुलगी झाली.

छ. राजाराम महाराजांनी देवास पांढरा घोडा वाहिला. तो यात्रेच्यावेळी छबिन्यात असे. हालाप्पा पुजारी हा घोडा घेऊन घोसरवाडास यात्रेस येत असे.

* * *

अप्पाचीवाडी येथे यात्रेचेवेळी वाघापुरे आदि लोकांना मानाची कर मिळते त्याप्रमाणे दादांनाही येथे ती मानाची कर मिळू लागली.

१९२४ साली दादांची एक मुलगी अक्कूबाई ही निधन पावली. यात्रेच्या दिवशीच तिसरा दिवस होता. या अशौच काळात यात्रेत कसे जावे ? या विचाराने दादांनी यात्रेस जावयाचे रहीत केले.

तिसऱ्या दिवशी रात्री बरोबर बारा वाजता दादांना एकदम संचार झाला. व ते घोसरवाडहून पळत सुटले. त्यांचे बरोबर आणखी दोन इसम कपडे घेऊन

पळू लागले. कुन्नूरच्या नदीवर येऊन त्यांनी स्नान केले व पुन्हा धावत पळत अप्पाच्यावाडीस भाकणुकीचे वेळेला बरोबर खेळासाठी येऊन हजर झाले.

* * *

नणदी येथे दादांचे बंधू श्रीपतराव हे राहात होते. १९२९ ला दादांचा मुक्काम त्यांचेकडे होता. त्यावेळी दादा मधुमेहाचे व्याधीने आजारी पडले. त्यातच पायाला बलम होऊन नारू झाला. पाय सुजून गँगरिंग झाले. पाय काळानिळा होऊन हालचाल करता येईना. अशातच डायबेटीस कोमा झाला. डॉक्टरांना बोलावून प्रकृती दाखवताच केस हातची गेलेली आहे फार तर दोन तास हा रोगी जगू शकेल असे त्यांनी सांगितले व औषध इंजक्शन न देताच निघून गेले. दादांना वेदना असह्य झाल्या. ते बेशुद्ध पडले त्यांना घोर लागला.

नणदीकर बाळासाहेब सरकार हे परगावी गेले होते. ते त्याचवेळी नणदीस परत आले. त्यांना दादांची ही हकिगत कळताच ते भंडाऱ्याची पिशवी घेऊन आले व त्यांनी दादांना भंडारा लावला. तशा अवस्थेतच दादांना एकदम संचार झाला. इतर लोकांना वाटले हा सर्व शेवटच्या अवस्थेतील प्रकार असावा. म्हणून सर्वजण रडू लागले. त्यावेळी जोरात संचार सुरू होऊन 'अरे कैलासाला जाऊन चौदा वर्षे आयुष्य वाढवून आणले आहे रे. का भिता ?' असे देवाने सांगून भंडारा दिला. त्याच दिवशी रात्री गँगरिंग झालेला पाय घोट्याजवळ फुटला व त्यातून सर्व रक्त-पू वाहून गेले व दादांचे प्रकृतीस आराम पडू लागला. मात्र अशक्तपणा फार आला होता. हिंडणे-फिरणे अशक्य झालेले होते.

पुढे दोन महिन्यानीच अश्विन महिन्यात अप्पाचेवाडीची यात्रा आली. उठवा बसवाही येत नव्हते, असा अशक्तपणा असल्याने दादांनी यात्रेला जाऊ नये, यात्रेची दगदग त्यांना सोसणार नाही असे सर्वजण म्हणू लागले. नित्य नियम म्हणून घरचे कोणीतरी जाऊन नारळ देऊन येतील असे म्हणू लागले. त्यावर दादा म्हणाले, 'मला मृत्यू आला तरी चालेल यात्रेत मला दर्शनासाठी गेलेच पाहिजे!' तेव्हा नणदीकर सरकारांची मोटार काढून औषधपाणी बरोबर घेऊन अगदी जपून अप्पाचेवाडीस फक्त देवदर्शन घडवून आणावयाचे या कल्पनेने नेण्यात आले.

दादांची मोटार अप्पाचेवाडी येथे पोळीजवळ (कमानी जवळ) पोहोचली. त्यावेळी भाकणुकीची वेळ झालेली होती. ढोलांचा आवाज ऐकताच दादांना जोराचा संचार झाला व दार उघडून त्यांनी धाडकन् उडी मारली व धावत धाऊन नेहमीप्रमाणे हत्यार व गुंडाचा खेळ ते खेळले. त्या दिवसापासून दादांचे चालणे, फिरणे पुन्हा पूर्ववत् सुरू झाले.

* * *

या आजारामधून बरे होताच दादा कुरुंदवाड येथे राहवयास आले. अप्पाचेवाडी व घोसरवाड याखेरीज अन्यत्र कोठेही जावयाचे नाही असे त्यानी निश्चित केले. कुरुंदवाड येथे त्रिन्हाडही केले.

कुरुंदवाड येथे दादांनी अध्यात्मसाधना, नामस्मरण, योगसाधना, ध्यान-धारणा या गोष्टीवर आपले लक्ष केंद्रित केले.

एके दिवशी दुपारी तीनच्या सुमारास जपासाठी बसले असता त्यानी आपल्या चिरंजिवास हाक मारली व 'केळी वगैरे फळे आणून ठेव आज एक स्वामी भेटीस येणार आहेत' असे सांगितले. त्याप्रमाणे चिरंजिवांनी सर्व व्यवस्था करून ठेवली. दुपारनंतर थोड्याच वेळात भागवतस्वामी, फाटदरे इत्यादि मंडळी दादांचेकडे भेटीस आली.

भागवतस्वामींचा व दादांचा पुढे चांगला स्नेह जमला. भागवतस्वामीही अप्पाचेवाडी येथे येऊ लागले. त्यांनी अप्पाचेवाडीस होम, हवन, रुद्र इत्यादि गोष्टी केल्या.

* * *

अप्पाचेवाडी येथील यात्रेस कारिकोळ येथील पुजारी व भक्त मंडळी येतात. दादांचे वेळी मारुती कमते हा पुजारी सर्वांबरोबर एकदा आला.

मारुती कमते कारिकोळ येथील पंचमंडळीपैकी एक जण होता. गावातील एका वाईट भानगडीत पापाचा पैसा घेऊन कारिकोळच्या देवाल्यात फरशी बसववून गडबडीने तो अप्पाचेवाडीस आला होता.

दादा भक्त मंडळींना भंडारा देत बसले होते. मारुतीने पुढे येऊन नमस्कार केल्याबरोबर, दादांना जोराचा संचार झाला व 'अरे पापाचा पैसा घेऊन माझ्या देवळात फरशी करतोस? तुझ्याबरोबर मलाही पापात घाल्तोस?' असे विचारून एक खाडकन मुसकाडीत दिली. मारुती कमते याला आपल्या

हातून घडलेल्या विपरीत कृत्याचा पश्चाताप झाला व त्याने देवाची क्षमा मागितली. यात्रा संपताच कारिकोळला जाऊन देवळामधली फरशी काढून स्वतःच्या खर्चाने नवी बसवतो असे त्याने मागून घेतले. मग त्याला क्षमा केली. पुढे त्याने स्वखर्चाने कारिकोळ येथे देवाल्यात फरशी केली.

* * *

अप्पाचीवाडी येथील यात्रा आटोपून दादा प्रथम कागल येथे जात. एकदा त्यांचा मुक्काम माधवराव मोजकर यांचेबरोबर बापू भटजी यांचे घरी होता.

बापू भटजींचे लग्न झाले होते तथापि त्यांना पुष्कळ दिवस मूलबाळ झालेले नव्हते. म्हणून त्यांनी दुसरे लग्न करावयाचे ठरविले होते. हा त्यांचा विचार ऐकून साहजिकच त्यांच्या पत्नीला फार दुःख झाले होते.

दादांना त्यांचे घरी संचार झाला व त्यानी 'दुसऱ्या लग्नाचा विचार कशासाठी करतोस?' असा प्रश्न बापू भटजींना विचारला.

'या पत्नीला मूल होत नाही. मुलासाठी दुसरे लग्न करावे' असा विचार असल्याचे बापू भटजींनी सांगितले.

'अरे दुसरे लग्न करू नको. याच बायकोपासून मुलगा होईल' असे सांगून दादांनी त्यांना आशीर्वादाचा नारळ घातला व थोड्याच दिवसात त्यांना मुलगा झाला. सध्या तो सांगलीस प्राध्यापक म्हणून काम करीत आहे.

* * *

अप्पाचीवाडी येथील यात्रेचा कार्यक्रम खूप मोठ्या प्रमाणात होऊ लागला. सांगली, कोल्हापूर, हातकणंगले, पुणे, कुरुंदवाड, कारिकोळ इत्यादी ठिकाणची असंख्य भक्त मंडळी यात्रेस येत असत. ब्राह्मण वर्गातीलही अनेक लोक येथे येत, राहात व उत्सव साजरा करीत. मात्र एकोप्याने, एकमेकांना सहकार्य करण्याऐवजी त्यात आपआपले त्यांनी गट तयार केले. आपणाला प्रिय असणाऱ्या झाडालाच प्रश्न विचारावयाचे. त्याचाच संचार खरा व इतरांचा खोटा असे मानू लागले. हे अंतस्थ कलह आपआपसातील झगड्यास कारणीभूत होऊ लागले. सुमारे एकोणीसशे सत्तावीस सालची ही गोष्ट आहे.

दादांना यात्रेत जोराचा संचार झाला 'अरे भक्तांची झाडाझाडी करतो रे. नदीला झाळू कधीच कमी पडत नाही. पुन्हा नवे भक्त जमवतो' असे त्यानी सांगितले.

त्यावर्षी अनेकांचे नारळ शेंडीतून उभे फुटले. एकेकांचे पाच पाच नारळही तसेच फुटले. पुढील दहा पंधरावर्षात खरे भक्त तेवढेच टिकले व परंपरेने यात्रेस येऊ लागले.

* * *

बेकाण्णा खोतांचे घराण्यावर नाथ महाराजांनी कृपा केल्याची हकिगत यापूर्वी आलेलीच आहे. पुढे या घराण्याचा उत्कर्ष होत जाऊन गावातील प्रतिष्ठित व घरंदाज व्यक्तिपैकी ते गणले जाऊ लागले.

बेचाळीससाली यांचे घरावर दरोडा घालण्याचे काही दरवडेखोरांनी ठरवले त्याप्रमाणे त्यांना आधी निरोपही पाठवला होता.

चोरांच्या या धाडसाला व निरोपाला घाबरून खोत मंडळींनी आपले घरदार सोडले व ते रानात जाऊन राहू लागले.

यात्रेचे वेळी दादा अप्पाचेवाडीस आले असता खोतांनी त्यांना ही हकिगत सांगितली. त्या वेळी दादांना संचार होऊन 'अरे, घराचे दार उघडे ठेवून राहा रे तुला धक्काही लागू देत नाही. माझे संरक्षण तुला आहे' असे देवाने सांगून त्यांना भंडारा दिला.

त्यावेळी खोत मंडळींना दिलासा वाटून ती गावातील आपल्या घरी येऊन राहिली. दरवडेखोरांनी एके दिवशी रात्री अचानक छापा घालण्याचे ठरवले व ते गावात आलेही. पण खोतांचे घराकडे येऊ लागताच कोणाचे डोळे गेले. कोणी कोलमडून पडले. हा चमत्कार पहाताच चोर आपल्या साथीदारासह परत निघून गेले.

* * *

अप्पाचेवाडीस दादांचे वेळेपासून यात्रा जोरात होऊ लागली. ठिकठिकाणचे लोक यात्रेस येऊ लागले.

एकदा एक अंधळा, थकलेला म्हातारा गृहस्थ वाट पुसत पुसत यात्रेसाठी आला व ओढ्याच्याकाठी बसून राहिला. त्याचेबरोबर कोणी नव्हते म्हणून तो येणाऱ्याजाणाऱ्या लोकांना 'अरे गोविंदपंतदादास भेटावयाचे आहे रे. मला पलिकडे न्या' असे विनवू लागला! त्याच्या विनंतीकडे कोणी लक्षच देईना.

तेव्हा 'अरे मीच गोविंदपंतदादा आहे चल, असे सांगून त्याला एका व्यक्तीने हाताला धरून खोताचे घरापर्यंत आणून सोडले. दादा तर तेथे भक्तांना भंडारा लावीत बसले होते. तो अंधळा म्हातारा बराचवेळ बसून कंटाळला व शेवटी म्हणाला, 'गोविंदपंतदादा ओळ्यापासून मला तुम्हीच इथपर्यंत आणले आता भंडारा द्या की?' त्यावर दादांनी विचारले, 'बाबा सकाळपासून मी इथेच बसून आहे. तुला कुणी इथे आणले?' त्यावर त्याने घडलेली सर्व हकिगत सांगितली तेव्हा दादांचेसह सर्वजणांस आश्चर्य वाटले.

* * *

एका चांभाराने इस्टेटीच्या लोभाने आपल्या भावाचा खून करून त्याला पेवात टाकले. पुढे त्याच्या बायकोच्या अंगात येऊ लागले व फार त्रास होऊ लागला. तेव्हा एका यात्रेत तो दादांचेकडे विचारण्यास आला. संचार होताच दादा ओरडले. 'त्या चांभारास आताच्या आता गावाबाहेर जायला सांगा. भावाचा खून करून मला प्रश्न विचारायला आलाय!' हे त्यांचे उद्‌गार ऐकताच तो चांभार पळून गेला.

* * *

एकदा अप्पाचेवाडीची यात्रा करून दादा घोसरवाडला परत निघाले असता, एक गोरापान उंचापुरा म्हातारा धनगर काठी टेकीत टेकीत अंगावरील घोंगडे सावरीत त्यांचेकडे आला व म्हणाला, 'अरे मी घोसरवाडला यावे म्हणतो येऊ का?'

त्यावर 'येकी यात्रा, अवश्य ये' असे सांगितले व 'तू कुठल्या गावचा!' असा प्रश्न विचारला.

तेव्हा 'मी चिखलीचा राहाणारा' असे त्या धनगराने सांगितले.

'किती वर्षे झाली तिथं आहेस?' असे सहज दादांनी त्याला विचारले. त्यावर त्याने जाता जाता उत्तर दिले 'मी होय, मी आहे की सात आठ पिढ्या' असे म्हणत तो निघून गेला.

थोड्या वेळाने दादांच्या लक्षात सर्व प्रकार आला व त्यांनी हा देवच समक्ष आला असला पाहिजे हे ओळखले. चिखली गावात माणसे पाठवून विशिष्ठ वर्णनाचा धनगर कोणी आहे काय याची चौकशी केली तेव्हा त्या वर्णनाचा एकही धनगर तेथे आढळा नाही. तेव्हा दादांनी देवाला कौल लावून प्रश्न

विचारला त्यावेळी 'आपणच आल्याचे देवाने उत्तर दिले.' त्यावेळेपासून घोसरवाड येथेही दरवर्षी मोठ्या उत्साहाने उत्सव साजरा होऊ लागला. घोसरवाडची यात्रा मोठ्या प्रमाणात होऊ लागली.

* * *

पांडुरंग कुबेर नावाचे एक गृहस्थ कोल्हापूर येथे त्यावेळी आचाऱ्याचे काम करीत असत. यात्रेच्या वेळी दादांचेबरोबर येऊन तेथील स्वयंपाक ते करीत असत. त्यांना मूलबाळ नव्हते. त्यामुळे एकदा संचार झाल्यावर त्यांनी मुलाबद्दल प्रश्न विचारला.

तेव्हा 'भक्तिभावाने येथील चाकरी करीत जा, तुला मुलगा होईल असे सांगून त्यांना दादांनी आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे त्यांना पुढे मुलगा झाला. महाराजांच्या आशीर्वादाने त्यांचा पुढे चांगला उत्कर्ष झाला. त्यांचा हा मुलगा आता कोल्हापूर येथेच मोठ्या हुद्यावर नोकरी करीत आहे.

* * *

एकोणीसशे एकेचाळीस बेचाळीसचे सुमारास दादा, भागवतस्वामी वगैरे मंडळी कागल येथे गेली होती. त्यावेळी फणसाळकर हे ज्युनिअर कारभारी होते. त्यांचेकडे सर्वांनी उतरावयाचे असे ठरले होते.

त्याप्रमाणे सर्वजण कागल येथे आले. त्यावेळी 'अरे नाडगोंडे यांचे घरी जा.' असा दादांना देवाचा हुकूम झाला त्याप्रमाणे दादा पूर्वीचा कार्यक्रम रहीत करून नाडगोंडे यांचे घरी गेले. त्या दिवसापासून नाडगोंडे घराण्याचा या देवाशी संबंध येऊन ही सर्वच मंडळी आजतागायत देवास येत असतात. या घराण्यावर देवाची पूर्ण कृपा आहे.

* * *

श्रीनाथसांप्रदायामध्ये भूतपिशाच वगैरे बाधांपासून पुष्कळ लोक मुक्त झाले आहेत, होतात. कै. दादांच्या वेळी भूतपिशाचापासून पुष्कळ लोकांना मुक्तता मिळाली आहे. त्यापैकी थोडी उदाहरणे देत आहोत.

कोल्हापूर येथे शुक्रवारात बोगार नांवाचे भांड्याचे दुकानदार होते. त्याला एक मुलगा व सून होती. त्या सुनेच्या अंगात सहा सात पिशाचांची एक

माळिका होती. यामुळे ती मरणोन्मुख झाली होती. सर्व औषधोपचार व्यर्थ जात होते. अशा परिस्थितीत ती घोसरवाड येथे येऊ लागली. दादांना संचार झाला असता त्यांनी विचारले. तेव्हा, ' तुम्ही नवीन घर " जागा घेऊन बांधले की नाही ? पाया खणत असता हाडे किती सापडली ? तेव्हा त्यानी सांगितले ' तेथे कवटीसह पुष्कळ हाडे सापडली.' त्यांच्या घरी गाईच्या सुद्धा अंगात येत असे. अंग थरथरत असे. अंगात आल्यानंतर ती गाय आसपास कोणाला येऊ देत नसे. अशा प्रकारे त्या सर्व घराण्यावर त्या जागेची पीडा होती. तेव्हा घोसरवाडास खेटे घालणेविषयी देवाची आज्ञा झाली. त्याप्रमाणे खेटे घालणेस सुरवात झाली. घोसरवाडला अमावास्येस जाणेपूर्वी त्या स्त्रीच्या इतके जोरात अंगात येत असे की घरी बेशुद्ध होऊन तिच्या नाड्या देखील लागत नसत आणि उचलून नेणेसुद्धा मुष्किलीचे होई. डॉक्टरांनी-सुद्धा हलवू नका असा सल्ला कित्येक वेळा दिला. प्रत्येक वेळी ते तसेच उचलून गाडीतून आणीत असत. इचलकरंजीहून नावेत घालून आणत असता अशी अवस्था व्हावयाची की ही बाई जगते का मरते असे होई. पण नावेत घालून नदीपार होताच थोडी शुद्धीवर येई. आणि घोसरवाडला येईपर्यंत ही पूर्णपणे शुद्धीवर येत असे. असे प्रकार कित्येक वेळा घडत असत. पण त्यानी आपले खेटे चुकविले नाहीत. २-३ वर्षे खेटे करून आपला नियम पूर्ण केला तेव्हा हळूहळू त्या बाई बरे होत होत पूर्णपणे बऱ्या झाल्या. तेव्हा त्यानी देवासाठी एक नाग व स्नानासाठी एक घागर नाथास अर्पण केली.

* * *

लाट येथील रामा अरगे यांच्या दत्तक प्रकरणाची मागे हकिगत आली आहेच. त्याची बायको अत्यंत अशक्त होऊन मरणोन्मुख झाली. तिला चालता येणे अशक्य होऊन बसले. आता ती फार दिवस जगणार नाही असे औषधोपचार करणारे डॉक्टरही सांगू लागले तेव्हा रामा अरगे यानी तिला गाडीत घालून घोसरवाडला आणले व दादांना संचार झाल्यावर तिला उचलून आणून त्यांचे-पुढे आणून ठेवले. त्यावेळी तिच्या डोक्यावर हात ठेवून दादा रागाने म्हणाले, ' अरे गुजरा हा काय त्रास देतो आहेस ? जातोस की नाही बोल ? '— ' त्यावर उठता देखील न येणारी ती बाई पिशाच्च संचार होऊन दोन तास

नाचू लागली. शेवटी दादांनी त्या पिशाच्याला ताकीद दिली की, 'एक महिन्याच्या आत झाड सोडून गेलास तर ठीक नाही तर बडगा मिळेल लक्षात ठेव' पिशाच्याने जाण्याचे वचन दिले व पुढील अमावस्येस हीच बाई पाच मैल लाटेहून घोसरवाडास चालत आली.

* * *

एकदा दादा सांगलीहून घोसरवाडला जात असतांना नृसिंहवाडी येथे देव-दर्शनास गेले. तेथे शंकरभट उपाध्ये नावाचे पुरोहित राहात होते. दादांना पाहाताच शंकरभटांनी त्यांना आपल्या घरी येण्याचा आग्रह केला. तेंव्हा घाटावरून स्नान करून दादा त्याच्या घरी गेले. शंकरभटाची एक मुलगी पुण्याला दिलेली होती. माहेरपणासाठी ती त्या वेळी त्यांचेकडे आलेली होती. ती आत घरात स्वयंपाक करीत होती. दादांनी शंकरभटाचे घरात आत पाऊल टाकताच ती आंत किंचाळू लागली व 'अरे, तू माझ्या मुळावर आलास रे! तू इकडे का आलास?' ही पिशाच्चबाधा आहे हे दादांनी जाणले. शंकरभट दादांना विनवणी करून म्हणू लागले, या माझ्या मुलीला नेहमी असा त्रास होतो. तुम्ही तिची त्रासातून मुक्तता करा. दादांनी त्या मुलीला देवाची विशिष्ट सेवा करण्यास सांगितले. थोड्याच काळात तिचा सर्व त्रास संपला व ती सुखाने संसारात रमून गेली.

भूत पिशाच्यादि बाधामधून नाथमहाराजांच्या आज्ञेने दादांनी अनेकांची मुक्तता केली. त्यांचे जीवन सुखी व समृद्ध करून त्यांचा आपल्या संप्रदायात समावेश करून घेऊन त्यांच्या जीवनाचे कल्याण केलेले आहे. अशी असंख्य उदाहरणे सांगणारे अनेक भक्त आजही हयात आहेत. केवळ वानगीदाखल वरील आठवणींचा समावेश केलेला आहे.

* * *

१९४२ साली दादांना आजारातून उठून तेरा वर्षे पूर्ण झाली. यात्रा संपलेवर देवाची पालखी खोताचे घरापुढे आल्यावर दादांना नेममीप्रमाणे संचार झाला. गुंड व हत्याराचा खेळ झालेवर दादांनी अंगांत शर्ट घालण्यास प्रारंभ केला. तेवढ्यात पुन्हा एकदा जोराचा संचार झाला व धोंगडे पांघरून घेऊन स्वारी पळत पळत खोताचे घरात शिरली. व लक्ष्मण खोतास हाताने धरून आणून भंडारा देव वसत त्या जागी आणले व म्हणाले 'अरे ह्या झाडाचे

हे शेवटचे वर्ष आहे. यापुढे झाडाची मुले व तू मिळून ही यात्रा चालवावयास पाहिजे. भंडाऱ्यावर हात मारून तसे वचन दे, तेव्हा लक्ष्मण खोतांनी सांगितले, 'माझ्या वाटणीहक्काप्रमाणे मी जबाबदारी घेईन.'

त्यावर देवाने सांगितले, 'नाही, नाही सगळी जबाबदारी तुझ्यावरच आहे. तूच पुढे होऊन हे केले पाहिजेस' असे आग्रहाने बोलून खोताकडून वचन घेतले व आपण ज्या जागी बसत असत त्या जागी भंडारा फेकला. दुसरे दिवशी दादा कुरुंदवाड येथे गेले.

पुढे आता माझे सहा महिने राहिले, चार महिने राहिले, दोन महिने, राहिले, महिना राहिला असे सांगत सर्व गोष्टींची निरावानिरव करू लागले.

आठवडा उरल्यानंतर आपल्या मुलाकडून आपल्या सर्व नातेवाइकांना, आप्तेष्टांना पत्रे लिहून बोलविण्यास सांगितले. व 'उद्या पाच जून रोजी दुपारी बरोबर तीन वाजता मी जाणार' 'असे त्यांनी जमलेल्या मंडळींना सांगितले.

पाच जून रोजी सकाळपासून घरात एकच गडबड उडाली होती. दादांनी सकाळी भटजींना बोलावून त्यांना दान वगैरे दिले व त्यांचे पायाचे तीर्थ घेतले. तुळशीची पाने कानात घातली. सर्वांना संप्रदायाप्रमाणे नित्य भजन पूजन अखंडितपणे करण्याचा आदेश दिला...दुपारी दीडचे सुमारास ते अंथरुणावर उठून बसले. माळ हाती घेऊन नित्य नामस्मरण करू लागले. त्याचवेळी त्यांचे चुलत बंधू इचलकरंजीहून आले. त्यांना हाक मारून ते म्हणाले, 'अरे जेवण करून घे आधी. मी कुणाचे जेवणाचे आड येणार नाही.'... त्यांचे चुलत बंधू जेवावयास बसले. त्या वेळी पंचांग काढून वेळ तरी पाहावी या विचाराने त्यांचे चिरंजीव शंकरराव पंचांग पाहू लागले. त्यांना उद्देशून दादा म्हणाले, 'अरे, पंचकात मी जाणार नाही रे काळजी करू नकोस.' सुमारे अडीचला पंचक संपत होते. पावणे तीन वाजले. जप करता करता दादांचे हातातील माळ एकदम खाली पडली. नंतर फक्त ते ओठांवर जप करू लागले. इतक्यात तीनचा पहिला ठोका पडला त्याबरोबर मान मागे तक्क्यास टेकली. दुसऱ्या ठोक्यास श्वास निरोधन केले व बरोबर तिसऱ्या ठोक्यास त्यांचे प्रयाण झाले. तीन वाजता आर्द्रा नक्षत्रावर दादा कैलासवासी झाले.

बाल्पणापासून दादांनी एक देवाचाच छंद घेतला. त्याची हयातभर सेवा केली. देवाची कीर्ती आसमंतात पसरवली. असंख्य भक्तांची संकटे निवारण केली. त्यांना भक्तिमार्ग दाखवला. आपणाबरोबर अनेकांचा उद्धार केला.

दादांचे चरित्र खरोखरीच एखाद्या सागराप्रमाणे विशाल व हिमालया-प्रमाणे भव्य होते. पदोपदी त्यांचे हातून चमत्कार घडून आले. त्यांनी जे जे कथन केले ते ते सत्य ठरले. त्यांनी ज्यांना ज्यांना आशीर्वाद दिला त्या व्यक्ति व कुटुंबांचे कोटकल्याण झाले. त्यांच्या हजारो आठवणी भाविक भक्तांच्या मनात आजही आहेत. त्यापैकीच ज्या ज्या आठवणी एकत्र करता आल्या व शब्दरूप देऊन मांडता आल्या त्या येथे कथन केल्या आहेत.

त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही स्मृतींची बांधलेली पूजा त्यांना व श्रीहालसिद्धनाथास मान्य होवो हीच इच्छा.

नाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

* * *

## पालखीचे चमत्कार

नाथांनी योगसामर्थ्यावर व तपश्चर्येच्या बळावर गुरुकृपेने पंचमहा-भूतावरही विजय मिळविलेला असतो. त्यामुळे जड व अचेतन अशा गोष्टी-मध्येही चैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना सहजच प्राप्त झालेले असते.

घोसरवाड येथे सावित्रीबाईच्या भक्तीला प्रसन्न होऊन बालस्वरुपात हालसिद्धनाथ महाराज प्रगट झाले. त्यामुळे बाललीला म्हणूनच तेथे पालखीचे चमत्कार पाहावयास मिळतात. कारिकोळ येथेही असे चमत्कार घडतात. पूर्वी हातकणंगले येथेही असे चमत्कार घडलेले अनेकांनी पाहिलेले आहेत.

देवाचा मुखवटा नटवून सजवून विधीपूर्वक पालखीत बसविण्यात येतो. देवाचे भक्त पालखीचा दांडा खांद्यावर धरून चालवतात. यात वैशिष्ठ्य असे, की, पालखी धरणाऱ्या व्यक्तींच्या इच्छेप्रमाणे त्यांना चालता जाता येत

नाही तर देवाची ज्या वाटेने जाण्याची इच्छा असेल त्याच वाटेने व दिशेने जाण्यास पालखीला गती मिळते. देवाला ज्या भक्ताच्या घरासमोर थांबावयाचे तेथेच ती थांबते. एरव्ही वाटेत कोठेही ती थांबत नाही. पालखी कधी अतिशय हल्की होते तर कधी अतिशय अवजड वाटते. कधी पुढच्या व्यक्तीला फिरवते तर कधी मागच्या व्यक्तीला फिरविते. जोराच्या आवेगामुळे पालखी धावत सुटते तर कधी सावकाश, संथपणे चालते.

घोसरवाड येथे सावित्रीबाईच्या समाधीच्या दर्शनास जाताना पालखी अक्षरशः जोरात पळत जाते. हाळ गावात जुनी देवळे आहेत तेथेही देवांच्या भेटीस पालखी जाण्याची प्रथा आहे. आता तेथे जाण्यासाठी नव्या वाटा तयार केल्या आहेत पण पालखी अगदी जुन्या काळातल्या पायवाटेनेच त्या त्या ठिकाणी जाते.

हालसिद्धनाथ घोसरवाड येथे येण्यापूर्वी दूधगंगेच्याकाठी पुरातन कालापासून वीरभद्राचे स्थान आहे. वीरभद्राचे भेटीसाठी हालसिद्धनाथांची पालखी जाते व तेथून वीरभद्राचीही पालखी बरोबर घेऊनच ही पालखी पुढे सावित्रीबाईचे दर्शनासाठी जाते. सावित्रीबाईचे दर्शन घेऊन पालखी गावाजवळ येऊन वेशीत थांबते. मग गावातील इनामदारांनी देवास बोलावणेस जावयाचे असते. त्यावेळी इनामदार बोलावणेस आले नाहीत तर पालखी उठतच नाही व देव लौकर गावात येत नाही.

नंतर वाड्यापुढे पालखी येते. तेथे आरती होते. प्रसाद वाटला जातो. मानाप्रमाणे भक्त व सेवकांना विडे दिले जातात व नंतर पालखी देवळात जाते.

पालखीचे वेळी ढोल, झांजा, पावे, शिंगे वाजविली जातात. ढोल विशेषतः धनगर लोक वाजवतात.

पद्धतीप्रमाणे पालखी उत्सवाचे व सणाचे वेळी मोठ्या थाटामाटात वाजत गाजत जात येत असते.

तसेच देवळामधून महाराजांची पालखी बाहेर पडताच ती वाड्यामध्ये प्रथम भागूबाईचे दर्शनास जाते. नंतर शेजारीच असलेल्या विठोबाच्या दर्शनास जाते. वरील क्रम कधीही चुकत नाही.

तेच देवाचे मनात एखाद्या भक्ताच्या घरी जाण्याची इच्छा असल्यास पालखी अचानक धावत सुटते व त्या भक्ताच्या घरासमोरच बरोबर जाऊन उभी राहाते.

पुणे येथील भक्त श्री. खंडेराव साठे व श्री. दाते, यांना पालखीच्या अशा चमत्काराबद्दल मनात शंका होती म्हणून त्यांनी एकदा मुद्दाम पालखी धरली. पालखी पुढे कोठे जावयाची आहे, याची त्यांना मुळीच कल्पना नव्हती. ते पालखी घेऊन उभे राहताच एका बोळामधून पालखी धावत निघाली. लक्ष्मण शिंदे नावाच्या एका भक्ताने पालखीतील देव माझ्या घरी आला तर पालखीत देवासमोर एक रुपाया ठेवून प्रसाद सर्वांना वाटेन असा नवस मागून घेतला होता. नेमकी त्या लक्ष्मण शिंदे याच्याच घरासमोर पालखी जाऊन उभी राहिली. त्याने नवस मागून घेतल्याप्रमाणे देवाची आरती करून प्रसाद वाटला व देवापुढे पालखीत रुपाया ठेवला. त्यानंतर पाठीनेच पालखी माघारी सरकत सरकत इरीशा मगदूम याच्या घरासमोर येऊन उभी राहिली. हा अनुभव घेतल्यावर श्री. साठे व श्री. दाते. या दोघांचीही खात्री पटली.

* * *

जयसिंगपूर येथील एक प्रसिद्ध वकील देखील अधूनमधून घोसरवाड येथे देवास येत असत. त्यांचेही मनांत पालखीच्या चमत्काराबद्दल कुतूहल होते. तेव्हा दादांनी त्यांच्या स्नेह्यांना व वकीलानाच पालखी धरणेस सांगितले. त्या लोकांनी पालखी धरताच जवळजवळ दोन तास गरगर फिरत होती. इतरांनी त्यांच्या खांद्यावरून पालखीचा दांडा काढण्याचा प्रयत्न केला तरी तो निघेना. या चमत्काराने त्या मंडळींना पालखीच्या संदर्भात देवाच्या सामर्थ्याची खात्री पटली व त्यांच्या मनातील शंका दूर झाली.

* * *

घोसरवाड येथे गोकुळाअष्टमीचा उत्सव मोठ्या प्रमाणात होत असे. उत्सव समाप्त झाल्यावर पालखी काढून नगर प्रदक्षिणा होऊन मगच सांगता केली जात असे. एके वर्षी या पालखीत कोणीतरी हालसिद्धनाथांच्या पादुका आणून ठेवल्या. टाळ मृदंग वाजवीत दिंडी नेहमीच्या मार्गाने चालली तो

टाळमृदंग वाजविणारे एका बाजूस ठेवून पालखी ही एकदम चौकात निघाली ती थेट गोविंदपंतदादांच्या घरासमोर येऊन उभी राहिली. दादांनी आरती करून प्रसाद वाटला मग पालखीची नगर प्रदक्षिणा पूर्ण झाली.

* * *

कारिकोळ येथील पालखी कुरुंदवाड येथे येऊन मग घोसरवाड येथे जात असे.

कुरुंदवाड येथे महादेव औट या नावाचा एक ताकदवान पहिलवान होता. सगळ्या गावात हौदाने तो पाणी नेऊन घालीत असे एवढी त्याची ताकद होती.

एकदा त्याला व त्याच्या स्नेह्याला पालखीचा हा चमत्कार खोटा वाटला म्हणून परीक्षा पाहाण्यासाठी त्याने पालखी आपल्या खांद्यावर घेतली. त्यावेळी पालखी एवढी जड झाली की त्याला पुढे पाऊलही टाकता येईना. इतरांनी पालखीचा दांडा काढून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तो दांडाही त्याच्या खांद्यावरून निघेना. थोड्याच वेळात त्याला आपली चूक कळून आली व त्याने देवाची क्षमा मागितली तेव्हा लगेच पालखी एकदम हलकी होऊन भक्ताच्या घराकडे धावतच गेली.

* * *

कारिकोळ येथील कमते घराण्यामधील ऐंशी वर्षांची वृद्ध स्त्री देवाची पालखी दारासमोर येताच आरती करीत असे. तिच्या दारासमोर देव, पालखीचे वेळी न चुकता प्रत्येक वेळी जात असे.

पालखी दारासमोर येऊन उभी राहाताच म्हातारी आरती घेऊन येई त्याच-वेळी पालखी हळहळू मागे सरकू लागे...त्यावर ती म्हातारी देवावरून हात ओवाळून आपली बोटे कपाळावर मोडून देवाला म्हणे. 'देवा माझी म्हातारीची परीक्षा बघतोस होय रे !' तिने असे विचारल्यावर पालखी पुन्हा तिच्या पुढे येऊन उभी राही. मग ती आरती करी प्रसाद वाटी. नंतर पालखी पुढे जात असे.

अशा तऱ्हेची असंख्य पालखीच्या चमत्काराची उदाहरणे घडलेली आहेत. व आजही घोसरवाड, कारिकोळ येथे घडत आहेत. पालखी चमत्काराचा महिमा अनेकांनी पाहिलेला व अनुभवलेला आहे.

* * *

## नाथसंप्रदातील साधकांसाठी काही नियम व माहिती

१. हालसिद्धनाथाच्या कृपेने अखंड परंपरा चालू असलेल्या या संप्रदाया मध्ये भक्तिमार्गासच अधिक प्राधान्य आहे.

२. नामस्मरण, पूजा–अर्चा, सेवा हाच मार्ग या देवास अधिक प्रिय आहे.

३. चिमड संप्रदायामधील गुरुभजन व पंचपदी नित्य म्हणण्याचा प्रघात आहे.

४. गुरुभक्ति ही सर्वात महत्त्वाची असून गुरुची आज्ञा प्रमाण मानणे हाच महत्त्वाचा नियम आहे.

५. प्रत्येकाने आपआपला कुलधर्म व कुलाचार अवश्य पाळला पाहिजे. प्रथम कुलदैवताची उपासना करावी व नंतर उपास्य दैवताची आराधना चालू ठेवावी.

६. ऐहिक व पारलौकिक यश मिळवणे, प्रपंच व परमार्थ दोन्हीही साधणे हाच या देवाचा मुख्य आशीर्वाद आहे.

७. साधकभक्ताने प्रत्येक अमावस्येस व यात्रेस देवाचे दर्शनासाठी येण्याचा नियम पाळावा. त्या नियमापासून त्याची श्रद्धा वाढत जाते. त्याला अनुभव येत जातात व त्याच्या मनोकामना सफल होतात.

८. गुरुउपदेश घेण्याची इच्छा असलेल्या साधकाने संप्रदायातल्या अधिकारी व्यक्तीकडूनच तो घ्यावा.

९. परद्रव्य विषासमान मानावे. परस्त्री मातेसमान मानावी. परअन्न शक्य तेवढे वर्ज्य करावे.

१०. गुरुचरित्र, नवनाथ या ग्रंथांची पारायणे करावीत.

११. नाथ परंपरेत अन्नदानास विशेष महत्त्व दिलेले आहे. गोरगरीब व भक्त-गणास अन्नदान करावे.

१२. हालसिद्धनाथास अंबिल विशेष प्रिय आहे. (कोणाही गरीब भक्तास हा प्रसाद करता येईल हा त्यामागील उद्देश आहे.) अंबिल प्रसाद म्हणून वाटावी.

१३. नम्रता, सदाचार, निर्व्यसनीपणा, [illegible] या गोष्टीकडे साधकाने कटाक्षाने लक्ष द्यावे.

१४. अखंड नामस्मरणामुळेच सर्व तऱ्हेच्या अडिअडचणी आपोआप दूर होतात. मनोविकार व प्रबळ भावना, वासना यावर खात्रीने जय मिळविता येतो.

♡ ♡ ♡

॥ श्रीनाथ प्रसन्न ॥

## रेवणनाथ गुरु परंपरा

रेवणसिद्ध– हालसिद्धनाथ– काडसिद्ध

- नारायणमहाराज, निंबरगी
  - रघुनाथप्रिय साधु महाराज
    - रामभाऊ महाराज यरगट्टीकर
      - नारायण महाराज
        - दत्तोपंत कुलकर्णी कुंभोजकर
        - गोविंदपंत कुलकर्णी घोसरवाडकर (दादा)
          - व्यंकटेश कुलकर्णी घोसरवाडकर
          - शंकरराव कुलकर्णी शिपूरकर (घोसरवाडकर)
          - आप्पाजी कुलकर्णी घोसरवाडकर
        - मल्हारपंत कुलकर्णी घोसरवाडकर
      - हणमंतराव कोटणीस महाराज
  - भाऊसाहेब उमदीकर महाराज
    - गुरुदेव रानडे


* * *

॥ श्रीनाथ प्रसन्न ॥

# कै. गोविंदपंतदादा घोसरवाडकर यांची कुंडली

श्रीशके १७८९ कार्तिक शुद्ध ११ शुक्रवार उत्तरा भाद्रपदा नक्षत्र प्रथम-चरण मीन रास दुपारी १२ वाजता. ता. १८ नोव्हेंबर सन १८६७

## लग्नकुंडली




स्पष्ट ग्रह

| ग्रह राशी | र. ६ | चं. ११ | मं. ७ | बु. ७ | गु. १० | शु. ७ | श. ७ | रा. ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंश | २४ | ६ | २१ | ११ | ७ | ३ | ८ | १८ |
| कला | ३० | ३० | ५१ | १ | ४४ | ४१ | | ५३ |

निर्याण काल–ता. ५ जून १९४२ दुपारी ३ वाजता.

* * *